कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ३० मे २०२६

किंमत ४ ₹

शिवराय-सावरकरांच्या नावालाच भाजपचा विरोध

उरण : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त देशभरात गौरव केला जात असताना, उरणमध्ये मात्र भाजपच्या स्थानिक नगरसेवकांनी सावरकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावालाच विरोध केल्याने संतापाची लाट उसळली आहे. उरण नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत मांडण्यात आलेल्या दोन महत्त्वाच्या नामकरण ठरावांना भाजपच्या सर्व १२ नगरसेवकांनी विरोध दर्शवल्याने शहरात भाजपच्या भूमि केविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. सोमवार, दि. १८ मे रोजी नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत पालवी हॉस्पिटलसमोरील चौकाला •> पान २ वर

सुरेश घरत यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम



रायगड : शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांचा गुरुवारी (दि. ४) वाढदिवस आहे. यानिमित्त वरसोलीमध्ये रक्तदान व मोफत नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. चित्रलेखा पाटील यांच्या सहकार्याने लायन्स क्लब अलिबाग व रक्तबंध सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आणि लायन्स हेल्थ फाऊंडेशन यांच्या सौजन्याने हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. अलिबाग तालुक्यातील वरसोली कोळीवाडा येथील खंडोबा मंदिरामधील सभागृहात •> पान २ वर

रायगडातील तब्बल 1121 गावे पोलीस पाटलांविना

प्रमोद जाधव
। रायगड ।

अपुऱ्या मनुष्यबळामुळे पोलीस आणि महसूल प्रशासनाला थेट जनतेपर्यंत पोहोचण्यात अनेक अडचणी येत आहेत. ग्रामीण भागात पोलीस, महसूल विभाग आणि नागरिक यांच्यामधील महत्त्वाचा दुवा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पोलीस पाटील पदांची रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर रिक्तता निर्माण झाली आहे. जिल्ह्यात मंजूर असलेल्या एक हजार ९८९ पदांपैकी तब्बल एक हजार १२१ पदे रिक्त असल्याने अकराशेहून अधिक गावे सध्या पोलीस पाटीलविना आहेत. परिणामी, कार्यरत पोलीस पाटील यांच्यावर अतिरिक्त गावांचा भार पडत असून, ग्रामीण •> पान २ वर

अतिरिक्त गावांचा भार कार्यरत पोलीस पाटलांवर

कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर



> रायगड जिल्ह्यातील पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरण्यात यावीत, यासाठी संघाच्या वतीने वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. जिल्हास्तरावरून माहिती मागविण्याचे कामही करण्यात आले. मात्र, अद्यापपर्यंत ही पदे भरली गेलेली नाहीत. त्यामुळे कार्यरत पोलीस पाटील यांच्यावर मोठ्या प्रमाणावर कामाचा ताण पडत आहे. शासनाने ही पदे तात्काळ भरावीत.
>
> – विकास पाटील, अध्यक्ष, रायगड पोलीस पाटील संघ

मार्गदर्शनाच्या विळख्यात भरती प्रक्रिया

रायगड जिल्ह्यातील पोलीस पाटीलांची रिक्त पदे भरण्यासाठी प्रशासनाकडून प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र, या भरती प्रक्रियेबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन मागविण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे भरती प्रक्रिया मार्गदर्शनाच्या विळख्यात अडकून पडल्याची चर्चा असून, अद्याप त्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

रायगडमध्ये तिघांचा बुडून मृत्यू

पेज नदीत दोन तरुणांचा, तर पाताळगंगा नदीत कामगाराचा दुर्दैवी अंत

। नेरळ/ रसायनी । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात गुरुवारी घडलेल्या दोन वेगवेगळ्या दुर्घटनांमध्ये नदीपात्रात बुडून तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. कर्जत तालुक्यातील पेज नदीपात्रात पोहण्यासाठी गेलेल्या दोन तरुणांचा पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाला, तर रसायनी येथील पाताळगंगा नदीत पोहण्यासाठी गेलेल्या एका परप्रांतीय तरुणाचा मृतदेह शुक्रवारी शोधमोहिमेदरम्यान बाहेर काढण्यात आला. या घटनांमुळे जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.

कर्जत तालुक्यातील वारे येथील रहिवासी अजय भास्कर म्हसे (३३) आणि त्याचा पुणे येथील मित्र सुनील प्रजापती (३५) हे दोघे अंजप परिसरातील पेज नदीपात्रात पोहण्यासाठी गेले होते. गुरुवारी सायंकाळी पाचच्या सुमारास दोघेही नदीत उतरले. मात्र, नदीतील पाण्याची खोली आणि प्रवाहाचा योग्य अंदाज न आल्याने दोघेही पाण्यात बुडाले.घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. मोठ्या प्रयत्नांनंतर दोघांना नदीबाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी रायगड रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले. स्थानिक तरुणाचा नदीत बुडून मृत्यू झाल्याने कर्जत तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून, नदीतील पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, रसायनी येथेही अशीच एक दुर्दैवी घटना घडली. पाताळगंगा नदीवरील बंधाऱ्यावर पोहण्यासाठी गेलेल्या संचित नावाच्या २९ वर्षीय परप्रांतीय तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. संचित हा एमआयडीसी टाकीजवळील पाताळगंगा नदीपात्रात पोहण्यासाठी गेला होता. पोहत असताना पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो बुडाला.

सायंकाळची वेळ आणि अंधार वाढल्यामुळे स्थानिक नागरिक व रसायनी पोलिसांना त्याचा शोध घेण्यात अडचणी आल्या. यानंतर रसायनीपोलिसांनीहेल्पफाऊंडेशनची मदत घेतली. शुक्रवारी सकाळी हेल्प फाऊंडेशनच्या पथकाने पाताळगंगा नदीत सर्च ऑपरेशन राबवून संचित याचा मृतदेह बाहेर काढला. मृतदेहाचे शवविच्छेदन चौक ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले. संचित हा मूळचा सरस्वती, उत्तरप्रदेश येथील असल्याची माहिती समोर आली आहे.या दोन्ही घटनांमुळे रायगड जिल्ह्यात शोककळा पसरली असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नदीपात्रात उतरताना नागरिकांनी अधिक काळजी घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे. अधिक तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

वे|घ|क

रिक्षा-कारचा अपघात



रायगड : अलिबाग–बेलकडे मार्गावर शुक्रवारी दुपारी रिक्षा आणि कारचा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये रिक्षाचे प्रचंड नुकसान झाले. सुदैवाने जीवितहानी टळली. दरम्यान, या अपघाताच्यावेळी वाहतूक कोंडी झाली होती. मात्र, वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन ही कोंडी सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. रस्त्याच्या मधोमध असलेली दोन्ही वाहने बाजूला घेऊन दोन्ही मार्गावरील वाहतूक पूर्ववत सुरु ठेवण्यावर भर दिला. मिळालेल्या माहितीनुसार, बेलकडेकडून अलिबागकडे रिक्षा •> पान २ वर

घरफोडीत ऐवज लंपास



पेण : पेण तालुक्यातील आमटेम पाचआंबेवाडी येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून तब्बल ४ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. काही दिवसांपूर्वी साळीदे बुर्डी येथे झालेल्या घरफोडीनंतर पुन्हा चोरीची घटना घडल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी वसंती विष्णनाथ तांबोळी या वाढदिवसानिमित्त २७ मे रोजी पनवेल येथे गेल्या होत्या. त्यावेळी अज्ञात •> पान २ वर

अपघातामध्ये पादचारी जखमी

रायगड : अलिबाग–रेवस मार्गावरील चोंढी नाका येथे शुक्रवारी सायंकाळी अपघात झाला. या अपघातमध्ये वयोवृध्द पादचारी गंभीर जखमी झाला आहे. जखमीला उपचारासाठी रुग्णालयात पाठविण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, पाण्याने भरलेला टँकर घेऊन चालक अलिबाग–रेवस मार्गावरून जात होता. चोंढी नाका येथे सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास आल्यावर त्या टँकरची एका कारला धडक लागली. या धडकेत रस्त्यावरून जाणाऱ्या वयोवृध्द पादचाऱ्याला •> पान २ वर

अचानक नगर जाणार पाण्याखाली



। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ गावाच्या हद्दीलगत असलेल्याममदापूरग्रामपंचायतीतील खांडा परिसरातील अचानक नगर येथील रहिवाशांवर पावसाळ्यापूर्वीच संकटाचे सावट निर्माण झाले आहे. परिसरात सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पासाठी बिल्डरकडून मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेल्या मातीभरावामुळे नैसर्गिक नाल्याचा प्रवाह बंद झाल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. •> पान २ वर

- **बिल्डरच्या मातीभरावामुळे नैसर्गिक नाला बंद**
- **पहिल्याच पावसात घरात पाणी शिरण्याची भीती**

महागाईविरोधात काँग्रेसचे जनआंदोलन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

डिझेल, पेट्रोलसह गॅसच्य किमतीमध्ये सरकारकडून भरमसाठ वाढ करण्यात आली. त्याविरोधात अलिबागमध्ये काँग्रेसच्यावतीने निषेध मोर्चा काढण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यातील काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते जनतेच्या न्याय्य हक्कासाठी शुक्रवारी सायंकाळी रस्त्यावर उतरले. यावेळी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालयासमोर जनआंदोलन केले.

यावेळी काँग्रेसचे दक्षिण विभागाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, उत्तर विभागाचे जिल्हाध्यक्ष डॉ. मनीष पाटील, जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्ष (पनवेल शहर) डॉ. श्रुती म्हात्रे, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष •> पान २ वर

पेणमध्ये भाजपच्या माजी सरपंचाला अटक

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील एका विवाहित महिलेला लग्नाचे आमिष दाखवून अनेक वर्षे शारीरिक संबंध ठेवत तिची फसवणूक केल्याच्या गंभीर आरोपाखाली भाजपचे माजी सरपंच महेश लक्ष्मण पाटील (४२) यांना पेण पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.



- **विवाहितेला लग्नाचे आमिष दाखवून अत्याचाराचा आरोप**
- **न्यायालयाकडून तीन दिवसांची पोलीस कोठडी**

पीडित महिलेने पेण पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, डिसेंबर २०१८ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संशयित महेश पाटील यांनी लग्नाचे आश्वासन देत तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध ठेवले. मात्र, प्रत्यक्षात लग्न न करता तिची फसवणूक केल्याचा आरोप महिलेने केला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पेण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिल्पा वेगुर्लेकर करीत आहेत. दरम्यान, राजकीय क्षेत्रातही या घटनेची जोरदार चर्चा सुरू असून, आरोपीवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

कृषीवल माध्यम प्रायोजक

पी एन पी कलाविकास मंडळ अलिबाग
अंतर्गत
चित्रलेखाताई पाटील पुरस्कृत
ग्रामीण रंगभूमी
आयोजित



निर्माता – प्रकाश चंद्रसेन पाटील व
हेमंत शांताराम पाटील
लेखक – यशवंत माणके
दिग्दर्शक – राजन पांचाळ
३० मे २०२६

PNP CYRUS POONAWALLA SCHOOL
NAGAON CBSE CURRICULUM (SINCE 2017)

LEARNING,GROWING,
THRIVING, TOGETHER,


ADMISSION OPEN
NURSERY TO X

Located in a non-industrial, nature-friendly setting, the school provides a calm and healthy atmosphere that supports focused learning and overall well-being.



HOLISTIC DEVELOPMENT

The institution places clear emphasis on the holistic development of students, ensuring equal importance to academics, physical fitness, and life skills.






SWIMMING FOR ALL

A major highlight is the half Olympic-length swimming pool, where free swimming classes are provided to all students, promoting fitness and confidence from an early age.

Best Sports Facilities in Alibag

In addition, the school boasts extensive sports facilities, including a basketball court, tennis court, and a football ground, giving students opportunities to actively engage in sports and develop teamwork, discipline, and leadership.



9822771540/9272594803/9168137591
pnpedusoc@gmail.com www.cyruspoonawallaschool.com
Opp. Hiranandani Sands, Near Mahendra Colony, Nagaon Khari Rd,
Nagaon Village, Taluka, Alibaug, District. Raigad - 402204.

अवैध उत्खनन कारवाई कागदावरच!

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

मुरूड तालुक्यात नियमांना पायाखाली तुडवत खुलेआमपणे माती व दगडांचे अवैध उत्खनन सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या बेकायदेशीर उत्खननाविरोधात मिठागर येथील सामाजिक कार्यकर्ते महेश ठाकूर यांनी आक्रमक भूमिका घेत लढा उभारला आहे. उत्खनन थांबवण्यासाठी त्यांनी उपोषणाचा इशाराही दिला होता. मात्र, उपोषण मोडीत काढण्यासाठी मुरूड तहसीलदारांकडून केवळ कागदी कारवाईचा दिखावा करण्यात आल्याचा आरोप ठाकूर यांनी केला आहे. विशेष म्हणजे, कारवाईचे आश्वासन देऊनही संबंधित ठिकाणी आजही अवैध उत्खनन सुरू असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महेश ठाकूर यांच्या म्हणण्यानुसार, मुरूड तालुक्यातील उसडी येथील गट क्रमांक १६९/१ आणि १७० या मिळकतीमध्ये अस्लम इस्माईल कादिरी या धनदांडग्याकडून शासनाची



कोणतीही परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर माती आणि दगड उत्खनन करण्यात आले. या अनधिकृत उत्खननामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचा धोका निर्माण झाला असून, परिसरातील नैसर्गिक रचनाही धोक्यात आली आहे.

या प्रकाराविरोधात ठाकूर यांनी मुरूड तहसीलदारांकडे लेखी तक्रार अर्ज सादर केला होता. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली गेली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या ठाकूर यांनी अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारत तहसील प्रशासनाला इशारा दिला. याबाबत त्यांनी मुरूड तहसीलदारांना अधिकृत पत्रही दिले होते.

दरम्यान, २६ मे रोजी उपोषणाच्या पवित्र्यात असताना मुरूडचे तहसीलदार आदेश डफळ यांनी उपोषण थांबवण्यासाठी कारवाईचे आश्वासन देणारे लेखी पत्र ठाकूर यांना दिले. संबंधित मिळकतीमध्ये झालेल्या उत्खननाची ईटीएस मोजणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल पाठविण्यात आल्याचेही त्यांनी पत्रात नमूद केले. तसेच मोजणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर किती प्रमाणात उत्खनन झाले हे स्पष्ट होईल आणि त्यानंतर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे आश्वासनही प्रशासनाकडून देण्यात आले होते.

मात्र, प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही बदल झालेला नसल्याचा आरोप ठाकूर यांनी केला आहे. संबंधित जागेवर आजही अस्लम कादिरी यांच्याकडून बेकायदेशीरपणे माती आणि दगडांचे उत्खनन सुरूच असल्याचे त्यांनी सांगितले. महसूल विभाग आणि पोलिसांचा कोणताही धाक उरलेला नसल्याने संबंधित धनदांडगे खुलेआम नियम धाब्यावर बसवून उत्खनन करत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. अवैध उत्खनन रोखण्याऐवजी प्रशासनाकडून केवळ कागदोपत्री कारवाईचा देखावा करण्यात आला असून, प्रत्यक्षात दोषींना अभय दिले जात असल्याची तीव्र नाराजी महेश ठाकूर यांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्याविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी तसेच दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

- **मुरूड तहसीलदारांकडून धनदांडग्यांना अभय?**
- **प्रशासनाच्या भूमिकेबाबत महेश ठाकूर यांची तीव्र नाराजी**

रायगडच्या घाटात बसचा अपघात

- **सुदैवाने मोठी दुर्घटना टळली**

। महाड । प्रतिनिधी ।

किल्ले रायगड माणगावमार्गे येणाऱ्या एका खासगी बसला रायगड घाटात एका वळणावरती अपघात झाला, संरक्षण कठड्याला ठोकून बस थांबल्याने पुढील मोठी दुर्घटना टळली. या बसमध्ये ४० प्रवासी प्रवास करत होते. चालकाच्या दुर्लक्षामुळे हा अपघात झाल्याचे प्रवाशांकडून बोलले जात होते. पुनाडे येथील स्थानिक ग्रामस्थांनी तात्काळ धाव घेत प्रवाशांना बसमधून बाहेर काढले.

मुंबई-गोवा महामार्गावरती माणगाव या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वाहन चालक निजामपूर रायगड अशा मार्गाने प्रवास करत असतात. अशाच प्रकारे पालघर ठाणे येथून ४० पर्यटकांना घेऊन निघालेली एक खासगी बस निजामपूरमार्गे रायगड येथे जात असताना पुनाडे गावच्या हद्दीमध्ये घाटात उंच ठिकाणी एका वळणावर चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस संरक्षण कठड्याला आदळून अपघात



झाला. सुदैवाने या वेळी मोठी दुर्घटना टळली. अन्यथा बस जवळपास ६०० ते ७०० फूट दरीत कोसळून मोठे जीवितहानी झाली असती. यावेळेस पुनाडे येथील ग्रामस्थांनी धाव घेऊन प्रवाशांना बाहेर काढून, त्यांना चहा नाश्त्याची व्यवस्था करून त्यांना पाचाड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचारासाठी दाखल केल्याची माहिती पुनाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जयेश लामजे यांनी दिली आहे. या अपघातामध्ये कोणालाही मोठी दुखापत झाली नाही. मात्र, सुदैवाने संरक्षण कठडा असल्याने सदर बसला मोठा अपघात होताना टळला असून, ४० प्रवाशांचे प्राण वाचले आहेत.

विधान परिषदेच्या १७ पैकी १५ जागांवर मविआचे एकमत

- **काँग्रेस ८, शिवसेना ४ तर एनसीपी ३ जागांवर लढणार**

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यातील १७ जागांसाठी होत असलेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे १७ पैकी १५ जागांवर एकमत झाले असून दोन जागांवरही लवकरच निर्णय होईल. काँग्रेस पक्ष चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव-लातूर-बीड या जागा लढवणार आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्ष पुणे, ठाणे व सांगली-सातारा या ३ जागा आणि शिवसेना (उबाठा) रायगड, जळगाव, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर या ४ जागा लढवत आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

विधान परिषदेच्या जागा वाटपासंदर्भात महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये पार पडली. या बैठकीला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (श.प.) कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे, शिवसेना (उबाठा) नेते खासदार अनिल देसाई, आमदार अंबादास दानवे, आमदार मिलिंद नार्वेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अदिती नलावडे, माजी आमदार मिलिंद अण्णा कांबळे उपस्थित होते.

बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, विधान परिषदेच्या निवडणुकीतही सत्ताधारी पक्षाकडून पैशाचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. विरोधकांचे नगरसेवक पळवले जात आहेत, ५-५ लाख रुपये ऍडव्हान्स दिले आहेत. बाप बडा ना भैय्या सबसे बडा रुपय्या' चा खेळ सुरु आहे. सत्ताधारी मित्रपक्षांमध्येही पळवापळवी सुरु आहे. लोकशाहीचा उत्सव असलेल्या निवडणुकीचा भाजपा महायुतीने घोडेबाजार बनवला आहे. भाजपा महायुतीच्या दंडेलशाहीविरोधात महाविकास आघाडी निवडणुकीच्या रिंगणात उभी आहे.

पान १ वरून

११२१ गावे पोलीस पाटलांविना

भागातील कायदा व सुव्यवस्थेच्या व्यवस्थापनावर ताण वाढला आहे.

गाव, वाड्या-वस्त्यांमधील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ग्रामीण भागात पोलीस पाटील हे अत्यंत महत्त्वाचे पद मानले जाते. एखादी घटना घडल्यास त्याची तात्काळ माहिती पोलीस ठाणे तसेच महसूल प्रशासनाला देण्याची जबाबदारी पोलीस पाटील पार पाडतात. त्यामुळे नागरिक आणि प्रशासन यांच्यातील मध्यस्थ दुवा म्हणून पोलीस पाटील यांच्याकडे पाहिले जाते.

रायगड जिल्ह्यात एकूण दोन हजार ११८ महसुली गावे असून ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजारांहून अधिक आहे. मात्र, एवढ्या मोठ्या क्षेत्रासाठी सध्या केवळ ८६८ पोलीस पाटील कार्यरत आहेत. गावांमधील कायदा व सुव्यवस्था, गुन्ह्यांची माहिती, महसूल प्रशासनाला मदत, निवडणुकांमधील सहकार्य, आपत्कालीन परिस्थितीत मदत, शांतता राखणे, दरोडे किंवा इतर गुन्हेगारी प्रकारांवर लक्ष ठेवणे, गैरवर्तन अथवा दुर्लक्षाच्या घटनांची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवणे अशा अनेक जबाबदाऱ्या पोलीस पाटील पार पाडतात. ग्रामीण भागात शांतता आणि सामाजिक समन्वय टिकवून ठेवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. मात्र, मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याने एका पोलीस पाटील यांच्याकडे दोन ते तीन गावांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. त्यामुळे गावांमधील गुन्हेगारी घडामोडी, कायदा व सुव्यवस्थेची माहिती आणि अन्य प्रशासकीय बाबी वेळेत पोलीस व महसूल विभागापर्यंत पोहोचवताना कार्यरत पोलीस पाटील यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. जिल्ह्यातील सात उपविभागीय कार्यालयांच्या अखत्यारित मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. अलिबाग, कर्जत, माणगाव, रोहा आणि महाड उपविभागीय कार्यालयांत दीडशेहून अधिक पदे रिक्त आहेत. तर श्रीवर्धन आणि पनवेल येथे शंभरहून अधिक पदे रिक्त असून, पेण उपविभागीय कार्यालयाच्या अखत्यारित ९५ पदे रिक्त असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे.

रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर तरुण बेरोजगार आहेत. बेरोजगारीचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. फक्त नोकऱ्यांची आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही होत नाही. ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पोलीस पाटीलांची रिक्त पदे शासनाने तात्काळ भरावीत.

- सुरेश घरत, तालुका चिटणीस, शेकाप

रिक्त पदांवर दृष्टीक्षेप

उपविभाग कार्यालय - मंजूर- भरलेली- रिक्त

अलिबाग - २७५ - १२० - १५५, पेण - १६८ - ७३ - ९५
पनवेल - २०७ - ९३ - ११३, कर्जत - ३५७ - १८९- १६९
माणगाव - २७० - १०१- १६९, रोहा - २८२ - १२२- १६०
महाड - २७३ - १२१ - १५२, श्रीवर्धन - १५७- ४९ - १०८
एकूण- १९८९- ८६८- ११२१

अचानक नगर जाणार पाण्याखाली

त्यामुळे आगामी पावसाळ्यात पाण्याचा निचरा न झाल्यास पहिल्याच पावसात अनेक घरांमध्ये पाणी शिरण्याची भीती व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, कर्जत-नेरळ-कल्याण राज्य मार्गालगतून वाहणारा नैसर्गिक नाला ममदापूर ग्रामपंचायतीतील खांडा भागातून पुढे जातो. मात्र, 'अलायन्स ग्रुप' या बांधकाम व्यावसायिकाने गृहप्रकल्पासाठी केलेल्या मातीच्या भरावामुळे हा नाला अडवण्यात आला आहे. नाल्याच्या जागी मोठ्या प्रमाणावर माती व दगड टाकण्यात आल्याने पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्णपणे थांबला असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण असून, पावसाळ्यात डोंगर व उंच भागातून येणारे पाणी थेट घरांमध्ये घुसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वित्तहानीसह जीवितासही धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर रहिवाशांनी एकत्र येत कर्जत तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच नेरळ विकास प्राधिकरणाकडे लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. पावसाळ्यापूर्वी तातडीने पर्यायी जलनिस्सारण व्यवस्था करण्यात यावी, अन्यथा नागरिक आंदोलन छेडतील, असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

सुरेश घरत यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

शिबीर घेतले जाणार आहे. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, लायन्स क्लब अलिबागचे अध्यक्ष प्रदीप नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, अलिबाग नगरपरिषदेचे जल व निचरा विभागाचे सभापती अनिल चोपडा आदी मान्यवरांच्या उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. शिबिराच्या सुरुवातीला शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांचा अभीष्टचिंतन सोहळा साजरा केला जाणार आहे. त्यानंतर रक्तदान व नेत्र चिकित्सा शिबिराचे उद्घाटन केले जाणार आहे. महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अश्रु ग्रंथी, तिरळेपणा या नेत्रविकारावर मोफत उपचार व शस्त्रक्रिया केल्या जाणार असल्याची माहिती वरसोली येथील सुरेशकाका घरत मित्रमंडळाच्यावतीने देण्यात आली आहे.

... भाजपचा विरोध

''स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर चौक'' तसेच एन.आय. हायस्कूल समोरील चौकाला ''जागतिक कीर्तीचे राजे श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक'' असे नाव देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. मात्र, हिंदुत्वाचा झेंडा खांद्यावर घेऊन राजकारण करणाऱ्या भाजप नगरसेवकांनीच या ठरावांना विरोध करून स्वतःच्याच विचारसरणीचा विरोधाभास उघड केल्याची चर्चा सुरू झाली आहे. संसदेत, विधानसभेत आणि प्रत्येक निवडणुकीत त्यांच्या नावाचा वापर करणाऱ्या भाजपने उरणमध्ये मात्र त्यांच्या नावालाच विरोध केल्याने ''दिल्लीत एक आणि गल्लीत एक'' अशी जोरदार टीका नागरिकांतून केली जात आहे. या सर्व प्रकारामुळे उरणमध्ये भाजपविरोधात तीव्र नाराजी निर्माण झाली असून, ''शिवराय आणि सावरकर यांच्या नावाने मतं मागायची आणि प्रत्यक्षात त्यांच्या नावालाच विरोध करायचा,'' असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत.

घरफोडीत ऐवज लंपास

चोरट्यांनी त्यांच्या घराच्या मुख्य दरवाज्याचे लोखंडी कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील लोखंडी कपाटाचे लॉकर फोडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेण्यात आली. या चोरीमध्ये दोन तोळ्यांची सोन्याची चेन, एक तोळ्याचा सोन्याचा हार, सोन्याची नथ तसेच एक लाख रुपयांची रोख रक्कम असा एकूण ४ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे. ही घटना २७ मे रोजी रात्री ११ ते २८ मे रोजी पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान घडल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक चव्हाण पुढील तपास करत आहेत.

रिक्षा-कारचा अपघात

घेऊन चालक जात होता. दरम्यान, शुक्रवारी (दि.२९) दुपारी कुरुळ-अलिबाग बेलकडे फाट्याजवळ आल्यावर रिक्षा आणि कारची जोरदार धडक झाली. या धडकेत रिक्षाच्या समोरील भागाचा चेंदामेंदा झाला. सुदैवाने रिक्षाचालक बचावला. या अपघातामध्ये कोणीही जखमी नसल्याची माहिती समोर येत आहे. कारच्या धडकेने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अपघात झाल्यावर दोन्ही मार्गावरील वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती.

अपघातामध्ये पादचारी जखमी

कारची जोरदार धडक लागली. यामध्ये पादचारी गंभीर जखमी झाला असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून उपलब्ध झाली. यावेळी काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. मात्र, मांडवा पोलिसांसह वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमीला उपचारासाठी रुग्णालयात पाठवून वाहतूक सुरळीत केली.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे वरंडे ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद जमिन मिळकत ही आमचे अशिल यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री सतिश त्रिंबक पराड वगैरे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतींचे वर्णन

गट क्रमांक	क्षेत्र (हे. आर.)	आकार(रू. पैसे)
१८५	०-२८-८० पो. ख ०-०६-६० ०-३५-४०	५.३३

वरील मिळकती बाबत अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, साठेकरार, भाडेपट्टाकरार खरेदी मेन्टेनस, मेहेर कर्ज वगैरे बाबतचा कसलाही हक्क व हितसंबंध अथवा विक्री व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

अलिबाग
तारीख २९/०५/२०२५

Mrs. REKHA K. WAGH
ADVOCATE
R/o- B-6, Jewels of Alibag
Vidyanagar, Alibag,
Dist- Raigad,
Mob 9850811391

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप प्रादेशिक कार्यालय रायगड-१

पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना

मे.गार्गी हटनेस अल्बर्टस प्रायवेट लिमिटेड, गट क्रं. २५१, २५३/४/अ, २५३/६/अ, २५३/७/अ, २५३/८, २५३/९, २५५, गाव- अतकरगाव, पोस्ट- मांदड, तालुका- खालापूर, जिल्हा- रायगड यांच्या प्रस्तावित उत्पादनातील विस्तारासाठी पीएफ रेझिन ३,००० एमटीएम ते ६,००० एमटीएम, हार्डनर/ कॅटॅलिस्ट ॲक्टिव्हेटर (कोल्ड ब्लेंडिंग) १,२०० एमटीएम ते ३,००० एमटीएम पर्यंत, आणि नवीन उत्पादन फाउंड्री उपभोग्य वस्तू (कोल्ड ब्लेंडिंग) आधिरित उत्पादने प्रस्तावित क्षमता ५०० एमटीएम च्या अनुषंगाने सदरील वाढील प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करणेकामी प्रस्ताव म. प्र. नि. मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. या संदर्भात सदर प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना उपस्थित राहता येईल.

सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर पर्यावरणविषयक जनसुनावणीचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

ठिकाण - रिशिवन रिसॉर्ट, झा ॲन्ड असोसिएटस, सर्व्हे नं. ८/१, खोपोली पेण रोड आदोशी, शिलफाटा-खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड- ४१०२०३.
दिनांक - २९/०६/२०२६ **वार** - सोमवार
वेळ - दु. १२.०० **वाजता**

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात-

प्रादेशिक कार्यालय / उप-प्रादेशिक कार्यालय रायगड-१,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,
६ वा मजला, सेक्टर-११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४.
ई-मेल : sroraigad1@mpcb.gov.in

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड अलिबाग
३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड अलिबाग.
४. प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय, ता. खालापूर, जि.रायगड.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता. खालापूर, जि.रायगड.
६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. खालापूर, जि. रायगड
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ६ वा मजला, रायगड भवन,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईन्ट, ३ रा मजला, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व),मुंबई-२२.
९. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, पश्चिम विभाग, तळ मजला, पूर्व बाजू, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१.
११. ग्रामपंचायत कार्यालये : अत्करगाव, साजगाव, होनाड, ठाणेन्हावे, देवन्हावे, खालापूर.

सही/-
(प्रशांत भोसले),
उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील सापे वामणे स्थानकावरील रेल पातळीवरील प्लॅटफॉर्मचे उच्चस्तरीय प्लॅटफॉर्ममध्ये रूपांतर करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिवायसीईडब्ल्यू-सापे-4-2026 दिनांक: 29/05/2026, एकूण अंदाजित खर्च:** ₹ 1,20,56,917.71/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 05/06/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 19/06/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 6 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सुहास सुधाकर आंबेकर २) पद्मनाम श्रीकृष्ण गोखले यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार (रू.पै.)
नागांव, ता.अलिबाग	१८७२/२	०-१६-०० जिरायत ०-००-८० पो.ख. ०-१६-८० एकुण	३.००

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५(पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक- २९/०५/२०२६

ॲड. राहूल रमेश नाईक
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that we are investigating all the rights, title and interest of Mr. Jagdish Prasad Khandelwal & Mrs. Nita Sunil Gupta in respect of lands described in the Schedule hereunder total area admeasuring in aggregate approximately 00.40.00 H-R-P lying, being and situated at Village Palav, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra.

All persons/entities including an individual, Hindu undivided family, any bank or financial institution or non-banking financial institutions, an association of persons or a body of individuals whether incorporated or not having any share, right, title, claim, benefit, demand or interest against the owners and/or in the property or any part thereof by way of sale, exchange, let, lease, sub-lease, license, assignment, mortgage (equitable or otherwise), inheritance, bequest, succession, gift, lien, charge, maintenance, easement, trust, possession, attachment, injunction, Lis-pendens, family arrangement / settlement, Decree or Order of any Court of Law, contracts/ agreements, development rights, project management rights, development management rights, FSI / TDR consumption / transfer, partnership or otherwise of whatsoever nature, are hereby required to make the same known in writing, along with documentary evidence to the undersigned at the address / email id mentioned below within 14 (fourteen) days from the date hereof, failing which, such claim/demand/objections, if any, shall be deemed to have been waived and/or abandoned. All claims/demands and objections addressed in response to this public notice should quote reference no.

SCHEDULE

All that piece and parcel of land lying, being and situated at Village Palav, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra:

(Description of Owner Land)

Sr. No.	Survey No.	Name	Area (in H-R-P)	Assessment (In Rs.)
1.	38/7/ A(Pt)	Mrs. Nita Sunil Gupta	00-20-00	0.50
		Mr. Jagdish Prasad Khandelwal	00-20-00	0.50
		Total Area	00-40-00	

Dated this 30th day of May, 2026 Signature/-

Adv. Rashmi R. Shinde
Sarita Sadan, Near JSM College,
Alibaug, Raigad 402 201,
Mob. No.-8380808002,
E-mail ID- adv.rashmishinde11@gmail.com

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- jai santoshi maa CNG Alibag वadgav 1) Fillerman 2) Housekeeping Contact No. Shubham Naik - 7774039128, Rohit Pongade - 7498131812
- **अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ** दूकानगाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- **उसर-अलिबाग येथील** गेल/एच.पी. कंपनी जवळ वेलवली बस स्टॉप नजिक नवीन इमारत (एकूण ११ सूसज्ज फ्लॅट) पार्कींग व्यवस्थेसह भाडे तत्वावर देण्याची आहे. कृपया इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा. मोबा. नं. ८४५४८६२७६७
- **तातडीची भरती, अलिबाग** रेस्टॉरंट/प्रॉपर्टी/एरिया मॅनेजर हेड शेफ, हाऊसकीपिंग, किचन हेल्पर मोफत राहण्याची व जेवणाची सोय TMS पेरोल अंतर्गत नोकरी. संपर्क : 8976709218 / 8691087302
- **घरकामासाठी कायमस्वरूपी** राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : ₹१४,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम, तसेच जेवणाची व्यवस्था करण्यात येईल. इच्छुकांनी संपर्क साधावा. ७८७५८६६५५५
- **अंकुर नर्सरी-(वाडगाव फाटा, अलिबाग पेण रोड पासून** १ मिनिटाच्या अंतरावर) अलिबाग ५ जून पर्यावरण दिनानिमित्त, सर्व प्रकारची फळझाडांची मजबूत कलमे, फूलझाडे, ईनडोअर प्लांटस, बुके प्लांटस वर भरपूर सवलत! दि. २ जून २६ ते १० जून २६ पर्यंत
संपर्क - ९४२३८९०२९५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. कोटींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. प्रसन्न माणिकलाल पारेख यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे-आर-पॉ)	आकार (रू. पै)
८८	७	०-३५-००	०- २५

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न

निवडक



माथेरानच्या प्रवेशद्वाराने घेतला मोकळा श्वास

नेरळ : माथेरानचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाका येथे विविध प्रकाराचे व्यवसाय करणारे स्टॉल आहेत. त्या स्टॉलधारकांकडून अतिक्रमण करण्यात आले असून तेथील ई-रिक्षा स्टँण्डमध्ये हे अतिक्रमण वाढले आहे. त्यामुळे पर्यटकांसाठी हे प्रवेशद्वार विद्रुप झाले होते. प्रवेशद्वार आणि ई-रिक्षा स्टँण्ड परिसरात अतिक्रमण नसावे या उद्देशाने माथेरानचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी सरसावले आहेत. माथेरानच्या प्रवेशद्वाराच्या विद्रूपीकरण विरोधात त्यांनी थेट कारवाई केली आहे. माथेरानच्या दस्तुरी प्रवेशद्वारावर ई-रिक्षा स्टँड शेजारी अनेकांनी एकाच व्यक्तीच्या दोन-दोन, तीन-तीन टपऱ्या उभारून अतिक्रमण केल्याचे समोर आले होते. त्यामुळे शहराच्या मुख्य प्रवेशद्वाराचे विद्रूपीकरण झाले होते. तसेच पर्यटकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत होता. याची गंभीर दखल घेत नगराध्यक्षांनी संबंधित अतिक्रमित टपऱ्या हटवण्याची कारवाई करण्यात आली. यावेळी पुन्हा अशा प्रकारचे अतिक्रमण झाल्यास कारवाई केली जाईल तसेच नगरपरिषद आणि वनविभागाच्या संयुक्त कारवाईला सामोरे जावे लागेल अशी कडक तंबीही देण्यात आली. शहराच्या प्रवेशद्वारावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण किंवा विद्रूपीकरण सहन केले जाणार नाही. शहरातील नागरिकांनी आणि व्यावसायिकांनी नियमांचे पालन करावे असे त्यांनी सांगितले. त्याच्या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

शेतकऱ्यांसाठी कृषी प्रदर्शनाचे आयोजन

रायगड : अलिबाग तालुक्यातील पांडवादेवी येथील पाटील ब्रदर्स हॉलमध्ये शेतकऱ्यांसाठी परिषद आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाच्या वतीने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. हवामान बदल, कृषी, फलोत्पादन, सेंद्रिय सिंचन, मार्केटींग, प्रक्रीया, ऊर्जा, शितगृह गोदाम परिषदेचे आणि सिध्देश्वर ॲग्रोटेक प्रदर्शन घेतले जाणार आहे. शनिवारी (दि.३०) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती परिषदेचे मुख्य संयोजक व महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी दिली. पणन विभागाचे संचालक शरद जरे, थळ येथील आरसीएफ कंपनीचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे, राष्ट्रीय शेअर बाजारचे मुख्य अर्थतज्ञ तिर्थंकार पटनाईक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे, एसक्यूएम इंडिया प्रा.लि.चे संचालक व हेड मार्केटींग दत्तात्रेय पेरे, रॉयल कॉलेज ऑफ सायन्स, कॉमर्स डोंबिवलीचे प्राचार्य डॉ. विवेककुमार पाटील, इंडियन ग्रीन हाऊसचे अध्यक्ष विश्वास जोगदंड, युनिर्व्हसल बायोकेमचे संचालक विश्वास सोंडकर, आदी मान्यवरांचे मार्गदर्शन राहणार आहे. यावेळी सेंद्रिय उत्पादने, कृषी औषधे, कृषी फलोत्पादनासाठी लागणारी साधने, अन्नधान्य साठवण प्रक्रीया यासाठी विविध कंपन्यांची उत्पादनांचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. दुपारी एक ते रात्री आठ यावेळेत हे प्रदर्शन भरविले जाणार आहे. या प्रदर्शनात वनविकास महामंडळ मर्यादीत अंतर्गत वेगवेगळ्या झाडांची रोपे, बीपीसीएल व आरसीएफची कृषी फलोत्पादनासाठी असलेली उत्पादने, महिला बचत गटामार्फत पापड, लोणची, वेगवेगळ्या पध्दतीचा गुळाचा चहा, खाद्य पदार्थ, सुगंधीत मेणबत्ती, अगरबत्ती, साबण, कपडे, साड्या व खाद्य पदार्थांचे स्टॉल असणार आहेत. दरम्यान शेतकऱ्यांना सेंद्रिय खत, व बियाण्यांचे नमुने वाटप केली जाणार आहेत. तसेच कृषी, फलोत्पादन, सिंचन, प्रक्रीया आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान केला जाणार असल्याची माहिती आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी दिली.

आमणोली-कोलाथरे पूल कोसळ्याची भीती

| पाली /बेणसे | प्रतिनिधी |

- **प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थ संतप्त**
- **कामाला सुरुवात न झाल्यास आंदोलन इशारा**

रायगडच्या सुधागड तालुक्यातील आमणोली-कोलाथरे मार्गावरील लोखंडी पूल सध्या अत्यंत जीर्ण, कमकुवत आणि धोकादायक अवस्थेत असून, कोणत्याही क्षणी पूल कोसळून मोठी दुर्घटना घडून जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अनेक गावांना जोडणारा व जीवन वाहिनी म्हणून उपयुक्त असणाऱ्या या पुलाची लोखंडी संरचना अनेक ठिकाणी गंजून कमकुवत झाले आहेत, तर पुलावर मोठे खड्डे व तडे पडले आहेत. या पुलावरून चालताना पूल अक्षरशः हलत असल्याने मनात भीती घेऊन नागरिक जीवघेणा प्रवास करीत आहेत. त्यामुळे या पुलावरून दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करावे लागत आहे. आमणोली-कोलाथरे धोकादायक लोखंडी पुल मृत्यूचा सापळा बनला असून नागरिकांचा जिव टांगणीला लागला आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन अटळ असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे काही दिवसांवर पावसाळा येऊन ठेपला असताना प्रशासन मात्र अद्यापही गंभीरपणे दखल घेत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली आहे. पावसाळ्यात पुलाखालील पाण्याचा वेग वाढल्यास हा पूल कोसळण्याची



शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी तसेच नोकरदार वर्गाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या मार्गाला कोणताही पर्यायी रस्ता नसल्याने नागरिकांना नाईलाजास्तव याच धोकादायक पुलाचा वापर करावा लागत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पुलाच्या दुरवस्थेबाबत अनेक वेळा संबंधित विभागाकडे तक्रारी, निवेदने आणि मागण्या करण्यात आल्या. मात्र अधिकारी केवळ पाहणी आणि आश्वासनांपुरतेच मर्यादित राहिले असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. प्रशासनाच्या या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दुर्घटना घडल्यानंतर पंचनामे आणि मदतीच्या घोषणा करण्यापेक्षा आताच आणि भरभक्कम पूल बांधा, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधींनीही केवळ आश्वासनांची खैरात न करता तातडीने निधी मंजूर करून नवीन व मजबूत पूल उभारावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, तातडीने नवीन पुलाच्या कामाला सुरुवात न झाल्यास ग्रामस्थ रस्त्यावर उतरून उग्र जनआंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासन आता जागे होणार का, की एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहणार, असा संतप्त सवाल परिसरातून उपस्थित केला जात आहे.

यावेळी यशवंत गायकवाड, मारूती गायकवाड, आनाजी मनवे, नारायण शिंदे, गौतम गायकवाड, चंद्रकांत दिने, विष्णू गायकवाड, तुकाराम दिने, मोरेश्वर बोडके, नंदू मुठ्ठल, अनिकेत गायकवाड, सुमित दिने, शेखर दिने, प्रकाश दिने, तानाजी सावंत, योगेश गायकवाड, मंगेश गायकवाड नागेश पवार आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जुन्या पुलांचा प्रश्न ऐरणीवर

दरम्यान, पुलाच्या दुर्घटनेमुळे परिसरातील इतर जुन्या पुलांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करावे लागत आहे. त्यामुळे येथील पुल सुस्थीतीत व सुरक्षित असणे गरजेचे आहे. संभाव्य धोका लक्षात घेवून भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने पुलाची तत्काळ दुरुस्ती करावी.

श्रीवर्धन आगाराच्या जीर्ण बसमुळे प्रवाशांचा संताप

| म्हसळा | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या नफ्यात असलेल्या श्रीवर्धन एस. टी. आगारातील बहुतांश बसगाड्या सध्या जीर्ण अवस्थेत असून प्रवासी वाहतुकीसाठी धोकादायक ठरत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. आगार प्रशासनाकडून या गाड्यांचा लांब पल्ल्याच्या मार्गांवर सर्रास वापर केला जात असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे प्रवाशांनी आरामदायी प्रवासासाठी जास्त पैसे मोजून आरक्षित तिकिटे काढली तरी प्रत्यक्षात त्यांना दीड



ते दोन तास बसची प्रतीक्षा करावी लागत असल्याचे चित्र श्रीवर्धन आगारात वारंवार दिसून येत आहे. वेळापत्रकाचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याने कामानिमित्त, वैद्यकीय उपचारांसाठी किंवा शैक्षणिक कारणांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांचे मोठे हाल होत आहेत.

शिवशाही बस सेवेची अवस्था तर अधिकच बिकट झाल्याची चर्चा प्रवासी वर्गात सुरू आहे. अनेक शिवशाही बसमधील वातानुकूलित (एसी) व्यवस्था बंद अवस्थेत असल्याने प्रवाशांना उकाड्यात अक्षरशः गुदमरून प्रवास करावा लागत आहे. आरामदायी प्रवासाच्या नावाखाली अतिरिक्त भाडे आकारले जात असताना सुविधा मात्र शून्य असल्याचा आरोप प्रवाशांकडून केला जात आहे.

काही बसगाड्यांचे दरवाजे, खिडक्या व आसने नादुरुस्त असून त्यावर केवळ तकलादू दुरुस्ती करून गाड्या रस्त्यावर धाववल्या जात असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.विशेषतः घाटमार्ग व लांब अंतराच्या प्रवासात अशा बसगाड्या धावत असल्याने अपघाताचा धोका वाढल्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, सोशल मीडियावरही संतप्त प्रवाशांकडून श्रीवर्धन आगार प्रशासनावर जोरदार टीका होत असून भाडेवाढ मात्र सेवा शून्य अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.जीर्ण बसगाड्या तातडीने बंद करून नवीन बस उपलब्ध कराव्यात, वेळापत्रक नियमित करावे तसेच शिवशाही सेवेची दुरुस्ती तातडीने करावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून जोर धरत आहे.

पोलिसांकडून अंमली पदार्थाचा हस्तगत

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खैरणे गाव येथे एका घरामध्ये पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने छापा टाकून तेथून गांजा या अंमली पदार्थासह गावठी दारूचा साठा असा मिळून जवळपास १७८३०० रुपये किमतीचा बेकायदेशीररित्या केलेला साठा हस्तगत केला असून या प्रकरणी चार जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. खैरणे गावातील एका घरामध्ये बेकायदेशीररित्या गांजा या अंमली पदार्थासह गावठी दारूचा साठा करून ठेवण्यात आल्याची माहिती वपोनि गजानन घाडगे याना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अनुरुद्ध गिजे, पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत, पोहवा विजय देवरे, महेश धुमाळ, सतीश तांडेल, सुनील कुदळे, शिवाजी बाबर, भूषण म्हारसे, पोशी आकाश भगत आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून जवळपास १७८३०० रुपये किमतीचा बेकायदेशीररित्या केलेला साठा हस्तगत केला असून या प्रकरणी महेश म्हात्रे (वय ३०), नागा उर्फ नागेश्वर उर्फ मनेसवार लोंगसिंग रॉगपी, वय २९ वर्षे,अभिषेक दळवी, वय २४ वर्षे व मनोज पाटील, वय २७ वर्षे याना ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात आली आहे.

मोदी तलावाशेजारी घाणीचे साम्राज्य



| तळा | प्रतिनिधी |

तळा शहरातील मोदी तलाव शेजारील असलेल्या शौचालयाचे बंदोबस्त करा याबाबतचे निवेदन संत रोहिदास नगर ग्रामस्थांकडून मुख्याधिकारी मनीषा वजाले यांना देण्यात आले. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या या तलावामध्ये संत रोहिदास नगर, सुतार आळी, कासार आळीमधील गौरी गणपतीचे विसर्जन करण्यात येते. मात्र, या तलावा शेजारी असलेल्या शौचालयाचे पाणी व मल हा थेट तलावात जात असल्याने तलावातील पाण्याला दुर्गंधी येऊन सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. तलावाच्या सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. यासाठी तीस लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला असून येथील शौचालयाचे सांडपाणी तलावात मुरत राहिल्यास तलावात घाणीचे साम्राज्य निर्माण होऊन गणेशोत्सव काळात गौरी, गणपती विसर्जनासाठी तलावात उतरणाऱ्या तरुणांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित शौचालयाचा बंदोबस्त करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी याबाबतचे निवेदन ग्रामस्थांतर्फे मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले.

खारघरमध्ये अनधिकृत बांधकामांविरोधात कारवाई

पनवेल : खारघर नोडमध्ये वाढत्या अनधिकृत बांधकामांविरोधात सिडकोने धडक कारवाई करत तब्बल ११५ झोपड्या, १२ व्यावसायिक स्टॉल तसेच पत्र्याचे अनधिकृत कंपाऊंड निष्कासित केले. सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने ही कारवाई केली. कारवाई दरम्यान सेक्टर ८ मधील अंदाजे २००० चौरस मीटर क्षेत्रावरील ४० झोपड्या हटविल्या. तर सेक्टर ११ येथे अंदाजे ४००० चौरस क्षेत्रावरील सेक्टर ३६ मधील भूखंड क्रमांक ५ए वरील ५०० चौरस मीटर क्षेत्रफळावर उभारलेले पत्र्याचे अनधिकृत कंपाऊंड जमीनदोस्त करण्यात आले. त्याच परिसरातील १२ अनधिकृत व्यावसायिक स्टॉल देखील हटविण्यात आले आहे.

नागरी प्रश्नांवर प्रहार संघटना आक्रमक

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

पालिका हद्दीतील विविध प्रलंबित नागरी प्रश्नांबाबत प्रहार सामाजिक संघटनेने आक्रमक भूमिका घेत पालिका आयुक्त मंगेश चितळे आणि महापौर नितीन पाटील यांची भेट घेतली. शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी, आरोग्य, अग्निशमन तसेच इतर मूलभूत समस्यांकडे लक्ष वेधत संघटनेने निवेदन सादर केले होते. मागण्या तातडीने मार्गी न लागल्यास बेमुदत उपोषणाचा इशाराही देण्यात आला होता.

या पार्श्वभूमीवर पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या उपस्थितीत प्रहार संघटनेची बैठक पार पडली. बैठकीदरम्यान शहरातील विविध प्रलंबित नागरी प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. संबंधित मागण्यांवर येत्या महिनाभरात



आवश्यक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आल्याची माहिती प्रहार सामाजिक संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील शिरीषकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

यावेळी पालिका प्रशासनाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त महेश मेघमाळे, उपायुक्त मुख्यालय कैलास गावडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी आनंद गोसावी, शहर अभियंता संजय कटेकर, उप अभियंता पाणीपुरवठा विलास चव्हाण तसेच मुख्य अग्निशमन अधिकारी संजय बोडके, डॉ. सुनील शिरीषकर, अजय कदम, राहुल तेलंग, पंकज मोहिते, अभिनव येलवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून पालिका आयुक्तांनी मागण्यांवर कारवाईचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे प्रहार संघटनेचे प्रस्तावित उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

रसायनीत पिण्याच्या पाण्याची गैरसोय

रसायनी : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन आजिवली गावाजवळ फुटल्याने रसायनी सह आसपासच्या परिसरातील पाणीपुरवठा ४० तास बंद होता. यामुळे रसायनीतील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय झाली. पाणी नसल्यामुळे नागरिकांनी नदी व तलावात अंघोळ केली तर नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचे जार विक्रेत्यांकडे जावून पाणी विकत घेतले आहे. यावेळी ग्रामपंचायत सदस्यांनी आपापल्या प्रभागात पाण्याचे टॅकर पाठवून पाणीपुरवठा सुरु ठेवला. यावेळी मोहोपाडा परिसरात टँकरमधील पाणी घेण्यासाठी महिला व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटली

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

अंदाजे पन्नास वर्षांपूर्वी श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी रानवली या ठिकाणी पाझर तलाव बांधण्यात आला आहे. या तलावापासून श्रीवर्धन शहराच्या जवळ असलेल्या आराठी गावापर्यंत कास्टिंग मेटलच्या पाईपने पाणी आणून साठवण टाकीमध्ये सोडले जाते. पुढे सर्वत्र पीव्हीसी पाईपलाईन टाकून शहराला पाणीपुरवठा करण्यात येतो. मात्र, कास्टिंग मेटलचे पाईप जुने झाल्यामुळे रानवलीच्या पाझर तलावाजवळ जलशुद्धीकरण प्रकल्प व संपूर्ण जलवाहिन्या बदलण्याचे काम हाती घेण्यात आले होते.

या प्रकल्पासाठी जवळजवळ २० कोटी पेक्षा जास्त पैसे खर्च करण्यात आले होते. जलशुद्धीकरण प्रकल्प व जलवाहिन्या बदलणे या कामाचे लोकार्पण करण्यासाठी तात्कालीन उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार श्रीवर्धन येथे आले होते. मात्र, या जलवाहिन्यांसाठी वापरण्यात आलेले पाईप अत्यंत निकृष्ट दर्जाचे वापरले गेल्यामुळे मागील एक वर्षाच्या कालावधीपासून जलवाहिन्या वारंवार फुटत आहेत. जलवाहिन्या दुरुस्त करण्यासाठी नगरपरिषदेचा अतिरिक्त निधी खर्च होत असल्याने नगर परिषदेचा निधी अपुरा पडत असल्याचे पाहायला मिळत आहे.

दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण

नवीन पनवेल : शिरढोण पाडा येथून एकाच दिवशी दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात २७ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. २५ मे रोजी सायंकाळच्या सुमारास अनिल मनोहर जाधव यांची पंधरा वर्षीय मुलगी तसेच राम राठोड यांची तेरा वर्षीय मुलगी यांचे अज्ञात इसमाने अपहरण केले. पंधरा वर्षीय मुलीची उंची पाच फूट, बांधा सडपातळ, रंग काळा असून अंगात पंजाबी ड्रेस लाल रंगाचा घातला आहे. तिला मराठी आणि वडारी भाषा बोलता येते. तर तेरा वर्षीय मुलीची उंची अंदाजे तीन फूट, बांधा मजबूत, रंग नीम गोरा आहे.

विनयभंग करणाऱ्या इसमास अटक

| पनवेल | प्रतिनिधी |

चालत्या मोटर सायकलवरून महिलांचा विनयभंग करणाऱ्या विकृत इसमास रबाळे पोलिसांनी अटक केली आहे. एक २२ वर्षीय तरुणी तिच्या मैत्रिणीच्या घरी जात असताना सेलिब्रेशन बिल्डिंगच्या मागील गेटसमोर, सेक्टर ०६, ऐरोली, येथे आल्या असता आरोपीने त्याच्याजवळ असलेल्या बर्गमन कंपनीच्या पांढऱ्या रंगाच्या स्कुटीवरून फिर्यादीचा पाठलाग करून त्यांच्या विनयभंग करण्याच्या उद्देशाने त्यांच्या पाठीमागील पार्श्वभाग पकडून दाबून तेथून पळ काढला. त्यानंतर फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून सदर गुन्हा दाखल करण्यात आला व त्यानुसार



वपोनि बाळकृष्ण सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सचिन गवळी व पोलीस निरीक्षक श्याम बनसोडे यांच्यासह अविनाश पाळदे, राहुल गरड, दर्शन कटके, वायंगणकर, मयूर सोनवणे, पोशि मनोज देडे व यादवराव घुले या पथकाने गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन घटनास्थळावरील प्राथमिक माहिती घेतली. घटनास्थळाचे प्राप्त सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास तसेच गुप्त बातमीदारामार्फत आरोपीचा शोध घेऊन आरोपी कृष्णा महेंद्र कनोजिया, वय २१ यास ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

कुत्र्यांना रेबिज प्रतिबंधक लसीकरण

कर्जत : शहरातील भटक्या कुत्र्यांना रेबिज प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. कर्जत शहरातील बाजारपेठ परिसरात दोन दिवसांपूर्वी एका पिसाळलेल्या कुत्र्याने काही कुत्र्यांना तसेच नागरिकांना चावा घेतल्याची घटना घडली होती. या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संशयित १० कुत्र्यांना रेबिज प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. हे लसीकरण प्राणीमित्रांच्या सहकार्याने डॉ. मनीषा गुटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या उपक्रमासाठी अजित ओसवाल आणि यतीश जाधव यांनी विशेष सहकार्य केले. खरंतर हे काम नगर परिषदेने केले पाहिजे मात्र, नगरपरिषद हातावर हात ठेवून गप्प बसली आहे.

आयात-निर्यात ठप्प होण्याची भीती | बंदरात अडकलेत ६२ हजार कंटेनर

जेएनपीए बंदरात 'काम बंद' आंदोलन

| चिरनेर | प्रतिनिधी |

मागील काही दिवसांपूर्वी पाच राज्यातील झालेल्या निवडणुका आणि सुट्टीवर गेलेल्या सुमारे साडेचार हजार टीटी वाहनचालक अद्यापही परतलेच नसल्याने जेएनपीए बंदरातील कंटेनर वाहतूक यंत्रणा अतिशय कोलमडली आहे. त्यामुळे आज स्थितीला बंदरात सुमारे ६२ हजार कंटेनर अडकून पडले आहेत.त्यातच इंधन वाढी विरोधात वाहतूकदारांच्या आजच्या संपामुळे या प्रक्रियेत आणखी भर पडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

जेएनपीएने कंटेनरची वेळेवर हाताळणी आणि वाहतूक करण्यासाठी परराज्यात निवडणुका आणि मे महिन्याच्या सुट्टीसाठी गेलेल्या टीटी वाहनचालकांना लवकरात-लवकर बंदरात आणण्यासाठी रेल्वे गाड्या बुकिंग करण्याच्या हालचाली सुरु केल्या आहेत. त्यासाठी ५० लाखाहून अधिक निधीच्या खर्चाची तरतूद करण्यात आल्याची माहिती मागील साप्ताहात जेएनपीए अधिकाऱ्यांनी दिली होती.

मात्र, आजपर्यंत कोणत्याही प्रकारच्या निधीची तरतूद झालेली नसल्याचे निदर्शनात येत आहे. त्यामुळे गेलेले वाहनचालक येणार कसे? असा प्रश्न निर्माण निर्माण झाला आहे.

मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थिती निवळताच जेएनपीएचे कंटेनर हाताळनीचे काम पूर्व पदावर येण्यास सुरुवात झाली होती. मात्र देशातील पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, केरळ, आसाम व पॉन्डीचेरी या पाच राज्यांच्या निवडणुकीसाठी जेएनपीए बंदर व बंदर परिसरातील विविध शेकडो कंटेनर यार्डमध्ये काम करणारे सुमारे साडेचार हजार टीटी वाहनचालक सुट्टीवर गेलेआहेत. तर हजारो टीटी वाहनचालक हे महिनाभराची सुट्टी कुटुंबियांसोबत घालविण्यासाठी त्यांच्या राज्यातील गावाकडे गेले आहेत. मात्र, दोन महिन्यांपासून पारगावी गेलेले वाहनचालक परतलेच नाहीत. वाहनचालक तुटवड्यामुळे हजारो कंटेनर बंदराबाहेरील सीएफएस पर्यंत पोहोचवण्यासाठी व सीएफएस मधून बंदरात आणण्यासाठी मोठी समस्या निर्माण होत आहे.

त्यामुळे आयात-निर्यातदार अक्षरशः हैराण झाले आहे. याशिवाय २ ते ३ दिवसात हाताळणी होणाऱ्या कामाला सुमारे १५ दिवस लागत असल्याने त्याचा चार्ज आयातदारांवर पडत आहे. त्यांना वेळेत कंटेनरची हाताळणी करता येत नसल्याने नाहक आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. या सुमारे ६२ हजार अडकलेक्या कंटेनरमध्ये देश विदेशातून वृतपत्र छपाईसाठी मागविण्यात येणाऱ्या विविध वृत्तपत्रांच्या कागदी रोलचे कंटेनरही मोठ्या प्रमाणात अडकून पडले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील वृत्तपत्र व्यवसायाच्या अडचणीत वाढ झाली आहे. वृत्तपत्रांचीही मोठी मुस्कट दाबी होत आहे. याचे गांभीर्य जेएनपीए प्रशासनाला तिळमात्र नसल्याचे स्पष्ट होत आहे.

> "जेएनपीए बंदरातील कंटेनर हाताळणी योग्य रीतीने आणि वेळेत व्हावी यासाठी परराज्यातील टीटी वाहनचालकांना बंदरात आणण्यासाठी ५० लाखांच्या निधीची तरतूद केल्याची माहिती जेएनपीए अधिकाऱ्यांनी दिली होती. मात्र, प्रत्यक्षात ही फसवी योजना आहे. कोणतीही आर्थिक तरतूद झालेली नसून, परराज्यातील वाहन चालक आजतगायत परतलेच नाहीत. त्यामुळे बंदरातील कंटेनर हाताळणी धिम्या गतीने चालत आहे.
> -कैलास आवटे
> ऑपरेशन मॅनेजर
> आयातदार टायटॅनिक ओशियन सर्व्हिसेस लि."

पर्यटकांनी फार्म हाऊसकडे फिरवली पाठ

| सुतारवाडी | प्रतिनिधी |

यावर्षी फेब्रुवारी, मार्च महिन्यापासून मोठ्या प्रमाणावर उन्हाळा जाणवत असून मे महिना संपत आला तरी मोठ्या प्रमाणावर उन्हाळा जाणवत आहे. त्यामुळे महत्त्वाच्या कामाशिवाय कोणीही घराबाहेर पडत नाही.

धगडवाडी, येरळ, गौळवाडी, कुडली, कामत तसेच अन्य परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर फार्म हाऊस आहेत. या ठिकाणी दरवर्षी दिवाळी सुट्टी त्याचप्रमाणे मे महिन्याची सुट्टी अशा मोठ्या सुट्ट्यांमध्ये विविध तालुक्यातील, शहरांतील, पर्यटक मोठ्या प्रमाणावर, पर्यटनासाठी येत असतात. मात्र, यावर्षी प्रचंड प्रमाणावर उष्णता जाणवत असून या परिसरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या मंदावली आहे.

१५ जूनपासून शाळा सुरू होणार असून आता गावाकडे आलेल्या चाकरमान्यांच्या परतीचा प्रवास सुरू झाला आहे. एकंदरीत यावर्षी मे महिना संपत आला तरी पर्यटकांनी येथील परिसरामध्ये असलेल्या फार्म हाऊसकडे पाठ फिरवली असल्यामुळे फार्म हाऊस मालकांचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात मंदावला आहे.

खांदेपालटाचा खेळ

कर्नाटकातील खांदेपालटावरून जो घोळ घातला गेला तो पाहता काँग्रेसचे दिल्लीपासून गल्लीपर्यंतचे तमाम नेते अजूनही १९७०-८० च्या दशकातील मानसिकतेमध्ये आहेत हे स्पष्ट झाले. तेव्हा इंदिरा गांधी किंवा नंतर राजीव गांधी हे मुख्य नेते व त्यांच्या अवतीभवती वावरणारे पक्षश्रेष्ठी म्हणवले जात. राज्यातले नेते खुलेआम बंड करून दिल्लीकडे धाव घेत. मग पक्षातल्या दोन किंवा तीन गटांतल्या वादांची खुलेआम चर्चा होई. त्या गटांचे नेते माध्यमांना एकमेकांविरुध्द बातम्या पुरवत. माध्यमे त्या अधिकाधिक चमचमीत करून छापत. महाराष्ट्रात विलासराव देशमुख, रामराव आदिक हे सतत बंडाच्या पवित्र्यात असत. त्यांना दिल्लीचीच फूस असे. मग बराच काथ्याकूट केल्यावर नेताबदल केला जाई. इंदिरा गांधींनी मधल्या काळात सगळ्यांच्या अपेक्षांच्या बाहेर जाऊन भलत्यालाच मुख्यमंत्री करण्याचा एक फंडा काढला होता. त्यातून अंतुले, बाबासाहेब भोसले, निलंगेकर असे नेते मुख्यमंत्री झाले. कोणाही बलवान नेत्याला स्थिर होऊ द्यायचे नाही हे दिल्लीतल्या नेत्यांचे मुख्य सूत्र असे. त्यानुसार मग हात-पाय बांधून नव्या नियुक्त्या होत. कर्नाटकात गेल्या सहा महिन्यांपासून हेच चालू होते. आता अखेर सिध्दरामय्या यांनी राजीनामा दिला असून त्यांच्या जागी डी.के. शिवकुमार यांची नियुक्ती होणार हे नक्की झाले आहे. मात्र या बदलानंतर सिध्दरामय्या यांचा गट नाराज असल्याचे स्पष्ट झाले असून आता ते बंडखोराच्या भूमिकेत जाऊन पक्षाला सुरुंग लावण्याचे काम इमानेइतबारे करीत राहतील. काँग्रेस मजबूत होती तोपर्यंत हे सर्व खेळ ठीक होते. पण आता पक्षाची पार दुर्दशा झालेली असूनही यांना उपरती झालेली नाही. पूर्वी शरद पवार म्हणाले होते त्याप्रमाणे काँग्रेस ही एका जुन्या गढीप्रमाणे आहे. सुंभ जळाला तरी आम्हीच राज्यकर्ते हा यांचा पीळ काही जात नाही. काँग्रेसकडे आता देशातील मोजकी तीन राज्ये शिल्लक आहेत. तेलंगणा, कर्नाटक व अलिकडेच त्यात भर पडली ते केरळ. ही तिन्ही राज्ये दक्षिणेतील आहेत हा निव्वळ योगायोग नाही.

शिवकुमारांचा क्लेम

काँग्रेसची दक्षिणेतील यंत्रणा आणि प्रतिमा अजूनही थोडीफार शाबूत आहे. दुसरे म्हणजे हिंदी-विरोध व प्रागतिक विचारांची जनता यामुळे भाजपचे गायपट्ट्याचे राजकारण अजूनही तिथे भक्कमपणे विस्तारलेले नाही. पण याचा अर्थ ते कधीच वाढणार नाही असे होत नाही. उलट कर्नाटकामध्ये भाजपने राज्य करून झाले आहे. तेलंगण आणि केरळमध्ये पक्ष खालपासून जमीन भुसभुशीत करू पाहत आहे. केरळमध्ये त्याचा एक खासदार व आता तीन आमदार निवडून आले आहेत. तेलंगणात अधिक ताकद आहे. ही स्थिती पाहता काँग्रेसने अधिक सावध असायला हवे. पण तशी ती नाही हे कर्नाटकावरून दिसले आहे. २०२३ मध्ये देशभर मोदी लाट असताना कर्नाटकात मात्र अनपेक्षितपणे काँग्रेसला २३५ पैकी १३५ जागा मिळाल्या. हे भक्कम बहुमत होते. शिवाय कर्नाटक हे आर्थिकदृष्ट्या तुलनेने सधन व प्रशासकीयदृष्ट्या उजवे राज्य आहे. बंगळुरुसारखे आयटीमधले दादा शहर याची राजधानी आहे. या स्थितीत राहुल गांधींपासून ते तळाच्या नेत्यांपर्यंत सर्वांनी मिळून आदर्श कारभाराचा नमुना काय असतो हे पेश करायला हवे होते. तशी उत्तम संधी त्यांना होती. तीच संधी त्यांना हैदराबाद व तेलंगणात होती व अजूनही आहे. भाजपच्या प्रचाराला पुरे पडायचे आणि मोदींच्या प्रतिमेला छेद द्यायचा तर त्यांना हे करावे लागेल. पण दुर्दैवाने काँग्रेसची मानसिकता अजूनही अशी आहे की, मोदींवर आज ना उद्या लोक रागावतील व आपल्याकडेच येतील. पण मोदींचा भाजप हा गेल्या शतकातल्या भाजप वा इतर विरोधी पक्षांपेक्षा वेगळा आहे. २०२३ मध्ये काँग्रेसला कर्नाटकात विजय मिळण्यामागे डी,के. शिवकुमार यांचे परिश्रम व संघटनाकौशल्य कारणीभूत होते हे खरे आहे. त्यांच्या या कौशल्यामुळे घाबरून जाऊन २०१९ मध्ये भाजपने त्यांच्याविरुध्द इडीची कारवाई केली होती. त्यांच्या बावीस वर्षीय मुलीलाही यात अडकवण्याचा प्रयत्न केला होता. शिवकुमार तर तुरुंगात गेले होते. तरीही ते इतर नेत्यांप्रमाणे शरण गेले नव्हते. काँग्रेसचा झेंडा त्यांनी उंच पकडून ठेवला होता. आपल्या या निष्ठेचे व कामाचे फळ मिळायला हवे असे त्यांना वाटत होते व त्यात गैर काही नव्हते.

भाजपला रोखण्याचे आव्हान

पण काँग्रेसचे पक्षश्रेष्ठी, विशेषतः राहुल गांधी हे आपल्या मागास, दलितांच्या राजकारणाच्या दृष्टिकोनातून या सगळ्याकडे पाहत होते. सिध्दरामय्या हे स्वतः कुरुबा किंवा धनगर समाजातून येतात. भटक्या जातींमध्ये त्यांच्या जातीचा समावेश आहे. त्यांच्या घरातील ते पहिले पदवीधर आहेत. आरंभी ते देवेगौडांसोबत जनता दलात होते. पण तिथे देवेगौडांनी आपले पुत्र कुमारस्वामी यांना पुढे करायला सुरुवात केल्यावर सिध्दरामय्या काँग्रेसमध्ये आले. तिथे ते एकदा पाच वर्षे मुख्यमंत्रीही राहिले. बहुजन, दलित, मुस्लिम यांच्यामध्ये त्यांच्याविषयी आस्था आहे. त्यांची भाषणेही उत्तम असतात. भाजपला शिंगावर घेऊ शकण्याची ताकद त्यांच्यात आहे. पण म्हणून शिवकुमार यांचे कर्तृत्वही दुर्लक्ष करता येण्यासारखे नाही. २०२३ मध्ये सत्ता आली तेव्हा पाच वर्षांपैकी अडीच वर्षे सिध्दरामय्या व अडीच वर्षे शिवकुमार मुख्यमंत्री होतील असे ठरले होते असे म्हणतात. ती अडीच वर्षे नोव्हेंबरात संपली. त्यानंतर शिवकुमार यांनी आपल्याला पद मिळावे असा आग्रह सुरू केला. पण आधी बिहार आणि नंतर बंगाल व इतर राज्यांच्या निवडणुकांचे कारण पुढे करून त्यांना थोपवून धरण्यात आले. मध्यंतरी शिवकुमार फुटतात की काय अशाही बातम्या आल्या. काँग्रेसचे सुदैवच म्हणायला हवे की तसे काही झाले नाही. मधल्या काळात भाजपनेही त्यांच्यात फोडाफोडी केली नाही हे विशेष म्हणायला हवे. कदाचित त्याचा उलटाच परिणाम होईल हे ते जाणून असावेत. काँग्रेसच्या विरोधात वातावरण तापवण्यासाठी त्यांच्याकडे इतर बरेच मुद्दे आहेत. सिध्दरामय्यानंतर आता येणाऱ्या नवीन सरकारला याचे भान ठेवावे लागेल. आपला कारभार त्यानुसार सुधारावा लागेल. शिवकुमार हे वोक्कलिग समाजाचे आहेत. कर्नाटकात वोक्कलिग व लिंगायत असे दोन प्रबळ समाज असून त्यांच्यात सत्तेची रस्सीखेच असते. माजी मुख्यमंत्री येडीयुरप्पा यांच्यामुळे लिंगायत समाज भाजपकडे झुकला आहे. त्याचा परिणाम व फायदा म्हणजे वोक्कलिग काँग्रेसच्या बाजूला आहेत. हा जनाधार वाढवता कसा येईल हे पाहावे लागेल. सिध्दरामय्या यांनी राज्यसभेची खासदारकी नाकारून राज्यातच राहण्याचे ठरवले आहे. मात्र ते शिवकुमार यांच्या पायात तंगड्या न घालता काँग्रेसलाच बळकट करतील अशी आशा आहे. अन्यथा, आपल्या हातात असलेले आणखी एक राज्य काँग्रेस घालवून बसेल. यापूर्वी ऐन निवडणुकीच्या आधी पंजाबात अमरेंद्रसिंग यांना घालवून सहा महिन्यांसाठी मागास समाजातील मुख्यमंत्री करण्यात आले. पण ते राज्य काँग्रेसने घालवले व आम आदमी पक्षाचा फायदा झाला. त्यापूर्वी राजस्थान, छत्तीसगडमध्येही आपसातील दुफळी काँग्रेसच्या मुळावर आली. कर्नाटकात काँग्रेस हे टाळू शकणार का हे पाहायला हवे.

विचार

ऊर्जेची तरतूद, पण शेतकरी चिंतेत

देशातील ऊर्जेच्या वाढत्या मागणीची पूर्तता करताना अणुऊर्जेकडे वळताना २०४७ पर्यंत ठरवलेले शंभर गीगावॅट उर्जेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये २५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक हवी आहे. दुसरीकडे, साखरेवरील निर्यातबंदीने साखर कारखाने कर्जबाजारी होण्याचा धोका निर्माण झाला. त्याच वेळी लंडनमध्ये इंग्रजांइतकीच भारतीयांची प्रॉपर्टी उभी रहात असल्याची रंजक माहिती समोर आली आहे.



महेश देशपांडे

देशातील ऊर्जेच्या वाढत्या मागणीची पूर्तता करताना कार्बन फूटप्रिंट कमी करण्यासाठी अणुऊर्जेकडे वळण्याशिवाय पर्याय नाही. २०४७ पर्यंत ठरवलेले शंभर गीगावॅट उर्जेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये २५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक हवी आहे. दरम्यान, साखरेवरील निर्यातबंदीने साखर कारखाने कर्जबाजारी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्याच वेळी लंडनमध्ये इंग्रजांइतकीच भारतीयांची मालमत्ता उभी रहात असल्याची रंजक माहिती समोर आली आहे.

भारताने २०४७ पर्यंत शंभर गीगावॉट अणुऊर्जा क्षमता उभारण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य निश्चित केले आहे; मात्र हे लक्ष्य गाठण्यासाठी केवळ राजकीय इच्छाशक्ती पुरेशी ठरणार नाही. त्यासाठी अभूतपूर्व आर्थिक गुंतवणूक, वेगवान प्रकल्प अंमलबजावणी, तांत्रिक आत्मनिर्भरता आणि दीर्घकालीन धोरणात्मक सातत्य आवश्यक असेल. 'द एनर्जी अँड रिसोर्से स इन्स्टिट्यूट' (टीईआरआय) यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात भारतासमोरील याच आव्हानांचा परामर्श घेतला आहे. या अहवालानुसार, २०४७ पर्यंत शंभर गीगावॉट अणुऊर्जा क्षमता निर्माण करण्यासाठी देशाला तब्बल २३ ते २५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागणार आहे. आजच्या घडीला भारताची अणुऊर्जा निर्मिती क्षमता केवळ ८.८ गीगावॉट इतकी आहे. सध्या सुरू असलेल्या आणि बांधकामाधीन प्रकल्पांची पूर्तता झाल्यास २०३०-३२ पर्यंत ही क्षमता सुमारे २२ गीगावॅटपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे; परंतु त्यानंतरचा टप्पा अधिक कठीण आणि निर्णायक ठरणार आहे. कारण उर्वरित कालावधीत शंभर गीगावॉटचे लक्ष्य गाठण्यासाठी दरवर्षी सरासरी ४.५ गीगावॉट इतकी नवीन क्षमता सातत्याने वाढवावी लागणार आहे. भारतीय ऊर्जा क्षेत्राच्या इतिहासात एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि एवढ्या वेगाने अणुऊर्जा विस्तार करण्याचा हा पहिलाच प्रयत्न असेल. अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे, की भारताने आतापर्यंत ज्या गतीने अणुऊर्जा प्रकल्प उभारले आहेत, त्या तुलनेत भविष्यातील अपेक्षित विस्ताराचा वेग अनेक पटींनी अधिक असेल. त्यामुळे केवळ पारंपरिक प्रशासकीय पद्धतींनी हे उद्दिष्ट साध्य होणे कठीण आहे. त्यासाठी जमीन संपादन, पर्यावरणीय मंजुरी, प्रकल्प वित्तपुरवठा, तांत्रिक उपकरणांची उपलब्धता, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि सुरक्षाविषयक मानके या सर्व बाबींमध्ये व्यापक सुधारणा कराव्या लागतील.

भारताच्या ऊर्जा गरजा झपाट्याने वाढत आहेत. औद्योगीकीकरण, शहरीकरण आणि डिजिटल अर्थव्यवस्थेच्या विस्तारामुळे विजेची मागणी सातत्याने वाढणार आहे. त्याच वेळी कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि हवामान बदलाच्या संकटाला उत्तर देण्यासाठी स्वच्छ ऊर्जेकडे वळणेही अपरिहार्य झाले आहे. अणुऊर्जेची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे ती कमी कार्बन उत्सर्जनासह मोठ्या प्रमाणात वीज निर्माण करू शकते. कोळशावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि ऊर्जा सुरक्षेला बळकटी देण्यासाठी भारताला अणुऊर्जेचा विस्तार करणे आवश्यक आहे; मात्र या क्षेत्रातील गुंतवणूक अत्यंत भांडवली स्वरूपाची असते. एका मोठ्या अणुऊर्जा प्रकल्पासाठी हजारो कोटी रुपयांची आवश्यकता भासते आणि त्याची उभारणी पूर्ण होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. त्यामुळे दीर्घकालीन वित्तपुरवठा आणि धोरणात्मक स्थैर्य ही यशाची प्रमुख अट ठरणार आहे. भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राचा आतापर्यंतचा इतिहास पाहिला, तर या क्षेत्राचा विकास तुलनेने मंद गतीने झाला आहे. यामागे तांत्रिक निर्बंध, आंतरराष्ट्रीय निर्बंध, इंधन पुरवठ्यावरील मर्यादा आणि स्थानिक विरोध अशा अनेक कारणांचा प्रभाव राहिला आहे. २००८ मधील भारत-अमेरिका अणुकरारानंतर परिस्थितीत काही प्रमाणात बदल झाला असला तरी अपेक्षित गतीने विस्तार झालेला नाही. आता पुढील दोन दशके भारताच्या ऊर्जा धोरणासाठी निर्णायक असतील. भारताने योग्य वेळी योग्य गुंतवणूक आणि धोरणात्म क निर्णय घेतले, तर अणुऊर्जा क्षेत्र देशाच्या हरित विकासाचा मजबूत पाया बनू शकते. अन्यथा, शंभर गीगावॉटचे लक्ष्य केवळ कागदावरचे स्वप्न ठरण्याची भीती नाकारता येणार नाही.

अर्थनगरीतील दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे केंद्र सरकारने ३० सप्टेंबरपर्यंत साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. देशांतर्गत बाजारात साखरेचा पुरवठा वाढवून दर नियंत्रणात ठेवण्याच्या उद्देशाने सरकारने हा निर्णय घेतला असला, तरी साखर उद्योगातील तज्ज्ञांनी अचानक घेतलेल्या या निर्णयावर तीव्र टीका केली आहे. या निर्णयामुळे देशांतर्गत बाजारात साखरेचे दर मोठ्या प्रमाणात घसरतील, साखर कारखान्यांवरील कर्जाचा भार वाढेल आणि त्याचा थेट फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसेल. देशांतर्गत बाजारात साखरेचे दर आधीच घसरू लागले आहेत. अचानक लागू करण्यात आलेल्या निर्यातबंदीमुळे जागतिक बाजारपेठेत भारतीय साखर उद्योगाची प्रतिमा खराब होईल. भारतातून मुख्यतः श्रीलंका, बांगला देश, अफगाणिस्तान, नेपाळ आणि अरब देशांना साखरेची निर्यात केली जाते. या बंदीमुळे या देशांबरोबर आधीच व्यवहार निश्चित केलेल्या व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निर्यात थांबल्यामुळे साखर कारखान्यांच्या रोख प्रवाहावर परिणाम होईल आणि शेतकऱ्यांना द्यावयाच्या 'एफआरपी' अर्थात 'फेअर अँड रेम्युनरेटिव्ह प्राइस'च्या देयकांमध्ये मोठा अडथळा निर्माण होऊ शकतो. केवळ महाराष्ट्रातील साखर कारखान्यांवर एफआरपीची सुमारे १,५५० कोटी रुपये थकबाकी आहे, तर देशभरात ही थकबाकी जवळपास बारा हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. अशा परिस्थितीत कारखान्यांना शेतकऱ्यांचे पैसे वेळेवर देणे अत्यंत कठीण होणार आहे. ऊस लागवडीचे क्षेत्र कमी होणार नसले, तरी शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनातून अपेक्षित नफा मिळणे कठीण होईल. सरकारने साखरआधारित इथेनॉल खरेदी वाढवावी, अशी मागणी साखर उद्योगातून केली जात आहे. सध्या पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण केले जाते, ते वाढवून ३० टक्के करावे, त्यामुळे साखर कारखान्यांना आर्थिक आधार मिळू शकेल, अशी मागणीही जोर धरत आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. लंडनमध्ये आज इंग्रजांइतक्याच प्रमाणात भारतीयांचीही मालमत्ता दिसून येत आहेत. मेफेअर आणि मेरीलेबोनसारख्या उच्चभ्रू भागांपासून लंडनच्या बाहेरील परिसरांपर्यंत भारतीयांचा प्रभाव वाढला आहे. चांगल्या शाळा, मोकळी जागा आणि परवडणारे बजेट लक्षात घेऊन भारतीय आता नॉर्थ लंडनमधील हॅरो, साउथ लंडनमधील क्रॉयडन आणि वेस्ट लंडनमधील हाउंसलोपर्यंत मोठ्या प्रमाणात स्थायिक होत आहेत. भारतीयांची लंडनमधील वाढती गुंतवणूक ही केवळ आर्थिक कारणांमुळे नाही, तर त्याला सांस्कृतिक मानसिकताही मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे. ज्या देशाने कधी काळी भारतावर राज्य केले, त्या देशात मालमत्ता असणे हे आज स्थैर्य, प्रतिष्ठा आणि यशाचे प्रतीक मानले जाते. मुलांचे शिक्षण, व्यावसायिक संबंध, सुरक्षित परतावा आणि पुढील पिढ्यांसाठी संपत्ती निर्माण करण्याची भारतीय परंपरा ही यामागील मुख्य कारणे मानली जातात. बहुतेक भारतीय गुंतवणूकदार तीन ते पाच कोटी रुपयांच्या बजेटमध्ये गुंतवणूक करत असून, एक ते तीन बेडरूमचे फ्लॅट सर्वाधिक लोकप्रिय आहेत; मात्र हा कल केवळ घरांपुरता मर्यादित नाही. नव्याने परदेशात स्थायिक होणारे काही लोक गुंतवणूक करत आहेत, तर काही श्रीमंत भारतीय लंडनमधील ऐतिहासिक आणि अतिमहागड्या मालमत्ता विकत घेत आहेत. आता भारतीय गुंतवणूकदार हॉटेल्स, वृद्धाश्रम, स्टुडंट हाउसिंग आणि व्यावसायिक प्रकल्पांम ध्येही मोठ्या प्रमाणात पैसा गुंतवत आहेत; जेणेकरून दीर्घकालीन उत्पन्न मिळू शकेल.

भारतीय गुंतवणूकदार केवळ दिखाव्यासाठी मालम त्ता घेत नाहीत. त्यांचा भर भाडे उत्पन्न आणि भविष्यातील किंमतवाढ यावर असतो. एका स्थानिक एजंटच्या मते, भारतीय गुंतवणूकदार पिढ्यानपिढ्यांचा विचार करून गुंतवणूक करतात. त्यामुळे ते अल्पकालीन नफ्यापेक्षा उद्यानांच्या जवळची घरे किंवा पेंटहाउससारख्या म लमत्तांना पसंती देतात. लंडन भारतीयांसाठी आकर्षक ठरण्याचे आणखी एक मोठे कारण म्हणजे ते शिक्षण आणि व्यवसायाचे जागतिक केंद्र मानले जाते. येथील इंग्रजी भाषा आणि कायदेशीर व्यवस्था भारतीयांसाठी परिचित आहे. ब्रिटिश सत्ताकाळामुळे भारतीयांना ब्रिटिश इंग्रजी आणि तेथील प्रणालीशी जवळीक वाटते. महागाई आणि वाढत्या खर्चामुळे तरुणांसाठी घर खरेदी करणे काहीसे कठीण झाले असले तरी लंडनमध्ये घर असावे, हे स्वप्न आजही अनेक भारतीय मोठ्या उत्साहाने पाहत आहेत.

चर्चा आजची

पालकांच्या खिशाला महागाईची झळ



अंतरा पारंगे

शिक्षण हा प्रत्येक कुटुंबासाठी प्राधान्याचा विषय असला तरी वाढत्या खर्चामुळे अनेक कुटुंबांचे मासिक बजेट कोलमडत असल्याचे दिसून येत आहे. फी, शालेय बस, गणवेश, वह्या-पुस्तके आणि इतर पूरक खर्चामुळे शिक्षणाचा एकूण खर्च झपाट्याने वाढत आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीचा अखेरचा आठवडा सुरू असून, येत्या शैक्षणिक वर्षासाठी शालेय वस्तूंची खरेदी करण्यासाठी पालकांची लगबग सुरू झाल्याचे दिसून येत आहे. लहान मुलांमध्ये नवीन पुस्तके, दप्तर, वॉटर बॅग आणि टिफिन मिळणार म्हणून उत्साह आहे. मात्र या वस्तूंच्या किमतींत वाढ झाल्याची चर्चा आहे. मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक साहित्य खरेदी अपरिहार्य असल्यामुळे अनेक कुटुंबांचे मासिक आर्थिक नियोजन कोलमडत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे ही दरवाढ मध्यमवर्गीय कुटुंबांवर अधिक भार टाकणारी असल्याचे दिसून येत आहे.

युद्धजन्य परिस्थितीमुळे कागदाच्या आयात आणि उत्पादनखर्चातील वाढीमुळे यंदा शालेय साहित्य तब्बल २५ ते ३० टक्क्यांनी वाढले आहे. त्यामुळे पालकांना यंदा विद्यार्थ्यांच्या शालेय साहित्याची खरेदी करताना आणखी फटका बसणार आहे. आधीच महागाईच्या दबावाखाली असलेल्या मध्यमवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी ही परिस्थिती अधिक कठीण बनत असल्याची भावना पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

जून महिन्यापासून शाळा सुरू होत असल्याच्या पार्श्वभूमीवर शालेय वस्तूंच्या खरेदीसाठी शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये पालक विद्यार्थ्यांसोबत खरेदी करताना दिसतात. शाळेत पुस्तके मोफत मिळणार असली तरी वह्यांचे विविध प्रकार बाजारात आले आहेत. बदलत्या काळानुसार मुलांना आवडणाऱ्या वस्तू देखील महाग झाल्या आहेत. मुलांचे आवडते रंग आणि कार्टूनच्या वस्तूंना अधिक मागणी आहे. परंतु, यंदा वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत. त्यामुळे नव्या शैक्षणिक वर्षात मुलांच्या शिक्षणावरील खर्च हा सर्वसामान्य पालकांसाठी खर्चिक ठरणार असल्याची चर्चा आहे.

काही शाळांकडून वह्या, पुस्तके आणि इतर साहित्य विशिष्ट दुकानांतून किंवा शाळेच्या अधिकृत विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोप काही पालक करत आहेत. त्यामुळे बाजारातील स्वस्त पर्याय उपलब्ध असूनही पालकांना जास्त पैसे मोजावे लागत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे अनेक पालक जुनी पुस्तके किंवा कमी किमतीच्या पर्यायांचा शोध घेत आहेत. राज्य सरकारने खासगी शाळांना गणवेश आणि पुस्तके विशिष्ट दुकानांमधून किंवा शाळेद्वारे विक्री करण्यास सक्ती न करण्याचे परिपत्रक जाहीर केले आहे. परंतु, अनेक इंग्रजी शाळांनी संबंधित परिपत्रकाला केराची टोपली दाखवली आहे. त्यामुळे तक्रार कोणाकडे करायची? असा प्रश्न पालक विचारत आहेत. ही दरवाढ मध्यमवर्गीय कुटुंबांवर अधिक भार टाकणारी ठरली आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच शिक्षणाचा खर्च वाढल्याने पालकांमध्ये संताप आणि चिंता दोन्ही वाढताना दिसत आहेत.

जून महिन्यापासून शाळा सुरू होत असल्याच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांमध्ये वह्या, पाठ्यपुस्तके आणि इतर शैक्षणिक वस्तूंचे भाव कडाडले आहेत. भाववाढ झाली असली तरी मुलांच्या शिक्षणासाठी शालेय साहित्य खरेदी करावेच लागत असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण असल्याचे दिसून येत आहे.

केवळ वह्या-पुस्तकेच नाही, तर शालेय गणवेशाचे भावही यंदा चांगलेच कडाडले आहेत. गणवेशासाठी लागणाऱ्या कापडाच्या किमती वाढल्या आहेत, तसेच ते तयार करणाऱ्या कारागिरांची मजुरी वाढल्याने यंदा गणवेशाचे भावदेखील वाढल्याचे बोलले जात आहे. काही ठिकाणच्या शाळांमध्ये विशेषत: प्राथमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश दिला जातो. मात्र हायस्कूल, कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना गणवेश खरेदी करावा लागतो.

गेल्यावर्षी वह्या २५० रुपये डझन होत्या, त्याच वह्या या वर्षी ३०० रुपये डझन झाल्या आहेत. छत्री गेल्यावर्षी ४०० रुपयापर्यंत मिळत होती, तीच आज ५०० रुपये झाली आहे. असेच सर्वच वस्तूचे झाले आहे. प्रत्येक वस्तूमागे गेल्या वर्षापेक्षा ५० ते १०० रुपयांनी वाढ झाली आहे. विद्यार्थी जरी शाळेत जाण्यासाठी उत्सुक असले तरी सामान्य माणूस वाढत्या महागाईने चिंताग्रस्त झाला आहे. जागतिक स्तरावरील युद्धजन्य परिस्थितीमुळे आधीच डिझेल आणि पेट्रोलच्या वाढत्या किमतींचा फटका सर्वसामान्य नागरिक सहन करत आहेत, त्यातच आता मुलांचे शालेय साहित्यही महागल्याने पालकांना दुहेरी भुर्दंड सहन करावा लागत असून मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडण्याची शक्यता आहे.

लोकसंसद

आंबेनळी घाटाची दुरवस्था

आठ वर्षांपूर्वी आंबेनळी घाटात २८ जुलै २०१८ रोजी कोकण कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांची बस दरीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात ३० कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतरही या मार्गावर अनेक लहानमोठे अपघात घडले. मात्र महाबळेश्वर ते रायगडच्या पोलादपूर दरम्यानचा ४० किमी लांबीचा हा आंबेनळी घाट महिन्याभरात घडलेल्या दोन भीषण अपघातांमुळे पुन्हा एकदा चर्चेत आला. २३ एप्रिल रोजी वाई येथील एक दांपत्य दुचाकीवरून जात असताना घाटातील एका धोकादायक वळणावर त्यांची दुचाकी संरक्षक कठड्याला धडकून ७०० फूट खोल दरीत कोसळली आणि त्यात त्या दांपत्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि आता साताऱ्यातील ८ तरुण त्यांची स्कॉर्पिओ कार १००० फूट खोल दरीत कोसळल्यामुळे जागीच मृत्यू पावले. किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेले 'पार', तालुका महाबळेश्वर हे माझे मूळ गाव असल्याने आंबेनळीचा घाटातील या रस्त्यातून प्रवास करण्याचा नेहमीच योग येतो. कालच या मार्गावरून म्हणजे प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या वाडा-कुंभरोशी ते पोलादपूर पर्यंतच्या २४ किमीच्या रस्त्यावरून प्रवास केला. सध्या घाटातील रस्त्याचे रुंदीकरण, संरक्षण कठडे बांधणी, सुरक्षा भिंती उभारण्याचे काम, पाणी वाहून जाण्यासाठी नाले, दरडीचा धोका कमी करणे इत्यादी कामे संथ गतीने सुरु आहेत. अनेक वळणावर फक्त मातीचे भराव टाकण्यात आले आहेत. यामुळे प्रवास धोकादायक बनला आहे. वाहनचालकांनी या घाटात वाहन चालवताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. कारण आपल्या हातात तेवढेच आहे.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

कामगार चळवळीचे जनक नारायण मल्हार जोशी

नारायण मल्हार जोशी हे भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक. त्यांचा जन्म ५ जून १८७९ रोजी कुलाबा जिल्ह्यातील गोरेगाव येथे झाला. त्यांचे वडील वेदविद्यासंपन्न व प्रसिद्ध फलज्योतिषी होते. नारायणरावांचे गोरेगाव येथे वेदाध्ययन व प्राथमिक शिक्षण पार पडले. वडील भाऊ महादेवराव यांच्या आग्रहावरून ते १८९३ मध्ये इंग्रजी शिक्षणाकरिता पुण्याला गेले. समाजसेवेच्या इच्छेने १९०९ मध्ये ते 'भारतसेवक समाज' या संस्थेचे सदस्य झाले. संस्थेच्या ज्ञानप्रकाश या मराठी दैनिकाच्या व्यवस्थापकीय कार्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. १९११ मध्ये त्यांनी 'सामाजिक सेवा संघ' (सोशल सर्व्हिस लीग) ही संस्था स्थापिली. या संस्थेच्या कार्याशी विविध नात्यांनी ते १९५५ पर्यंत निगडित होते. १९११-१३ या काळात त्यांनी अहम दनगर, गुजरात व तत्कालीन संयुक्त प्रांत येथील दुष्काळ पीडितांसाठी साहाय्यनिधी गोळा केला. हळूहळू त्यांनी आपले सर्व लक्ष कामगार समस्यांवरच केंद्रित केले आणि तत्संबंधीच्या सर्व उपलब्ध साहित्याचा अभ्यास केला. त्यांनी मुंबईतील कामगारवस्त्यांम ध्ये अनेक कल्याणकेंद्रे, रात्रशाळा, मोफत वाचनालये, वैद्यकीय केंद्रे, औद्योगिक प्रशिक्षणवर्ग इ. चालविले लंडनमधील टॉयन्बी हॉलच्या धर्तीवर कामगारांसाठी दोन मोठी सभागृहे बांधली. १९१७ साली भारत सरकारतर्फे मेसोपोटेमियाला भेट देणाऱ्या पत्रकार प्रतिनिधी मंडळाचे ते एक सदस्य होते. १९२१ साली त्यांनी कामगार समाचारनामकएकमराठीसाप्ताहिकसुरूकेले. जोशींनी ३१ ऑक्टोबर १९२० साली ङ्गअखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसफ (आयटक) ही भारतातील पहिली कामगार संघटना स्थापन करण्यास मदत केली, १९२९ पर्यंत ते तिचे कार्यवाहकही होते. या संघटनेमधील कम्युनिस्ट मतप्रणालीच्या कार्यकर्त्यांनी तिच्यावर आपले वर्चस्व बसविण्याचा प्रयत्न केला, तेव्हा १९२९ साली नागपूर येथील अधिवेशनात आयटकमध्ये फूट पडली आणि जोशींना आयटक सोडावी लागली. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यानी नंतर 'इंडियन फेडरेशन ऑफ ट्रेड युनियन्स' अशी निराळी संघटना काढली. पुढे १९३३ मध्ये ही संघटना 'नॅशनल फेडरेशन ऑफ लेबर' ह्या संघटनेत सामावण्यात येऊन नवीन संघटनेचे 'नॅशनल ट्रेड्स युनियन फेडरेशन' असे नाव ठेवण्यात आले. याशिवाय जोशी अनेक कामगार संघटनांशी निगडीत हो-ते. १९२६ मध्ये त्यांनी 'टेक्स्टाइल लेबर युनियन' ही कापडगिरणी कामगारांची संघटना स्थापिली तिचे ते अध्यक्षही होते. 'नॅशनल सीमेन्स युनियन' या संघटनेचेही ते बरीच वर्षे अध्यक्ष होते. गव्हर्नर जनरलच्या वटहुकुमांना विरोध करण्याकरिता त्यांनी १९३७-३८ मध्ये 'मुंबई नागरी स्वातंत्र्य संघटना' (बॉंबे सिव्हिल लिबर्टीज युनियन) स्थापन केली. या संघटनेस पंडित नेहरूंचाही पाठिंबा मिळाला. गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती रानडे व गोपाळ कृष्ण गोखले यांच्या विचारसरणीचा त्यांच्या मनावर अधिक प्रभाव होता. वॉशिंग्टन येथे १९१९ मध्ये भरलेल्या आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या पहिल्या परिषदेस उपस्थित राहण्यासाठी भारतीय कामगारवर्गाचे प्रतिनिधी म्हणून जोशींची भारत सरकारने नियुक्ती केली. अशा परिषदांच्या निमित्ताने १९२२-४८ या काळात जोशींनी सोळा वेळा युरोपीय देशांना भेटी दिल्या व भारतीय काम गारांच्या दुःस्थितीकडे जगाचे लक्ष वेधले. अनेक कामगार कल्याणविषयक कायद्यांना मूर्त रूप देण्याचे श्रेय जोशींनाच आहे. कारखाना अधिनियम (१८८१), कामगार हानिपूर्

कोस्टल रोडशेजारी वृक्षारोपण सुरु

● मान्सूनपूर्वी १५ हजार झाडे लावण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट

| मुंबई | प्रतिनिधी |

कोस्टल रोडच्या शेजारी लवकरच निसर्गरम्य बागा तयार होणार असून मुंबईकरांचा श्वास मोकळा होणार आहे. कोस्टल रोड प्रकल्पाअंतर्गत महापालिकेने मार्गाशेजारील मोकळ्या जागेवर ६० हजार झाडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी वरळी आणि ब्रीट कँडी परिसरात यापूर्वीच काम सुरू झाले आहे. मान्सूनपूर्वी तब्बल १५ हजार वृक्षांची लागवड करण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे.

सध्या मार्गालगतच्या मातीची तपासणी करून जमीन तयार करण्यात येत आहे. यानंतर कोणती झाडे या ठिकाणी सर्वाधिक काळ टिकून राहतील याची तापसणी करून लागवड सुरू केली जाणार आहे. येत्या काही वर्षांत टप्प्या-टप्प्याने ही ६० हजार झाडे लावण्याचे काम केले जाईल. याशिवाय रस्त्यालगत दोन लाख झुडुपंही उगवण्याची योजना आहे.



कोस्टल रोडच्या (दक्षिण) १०.६ किमी लांब मार्गासाठी समुद्रातून तब्बल १११ हेक्टर जमीन मिळवली गेली आहे. यापैकी ४० हेक्टर जमीन रस्ते, इंटरचेंजेस आणि पुलांसंदर्भातील पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी वापरण्यात आली आहे. उर्वरित भागात नागिरकांसाठी मोकळी जागा तयार करण्यात येणार आहे. या मोकळ्या जागेत विहार, बागा, शहरी वन आणि सायक्लिंग ट्रॅक किंवा पदपथं बनवण्यात येतील. वृक्ष लागवडीसाठी दोन नर्सरी विकसित केल्या जात आहे. वरळीमधील नर्सरी यापूर्वीच कार्यरत असून ब्रीच कँडी परिसरातील नर्सरीचं लवकरच सुरू होईल. वरळीस्थित नर्सरीमध्ये झाडं, झुडुपे आणि वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतींची चाचणी केली जात आहे. किनारपट्टीवरील खारट आणि दमट वातावरणाला कोणती झाडं सकारात्मक प्रतिसाद देतात याचा अभ्यास सुरू आहे.

एका उपक्रमांतर्गत रिलायन्स फाउंडेशनला हे काम देण्यात आलं आहे. त्यामुळे महापालिकेला यासाठी कुठलाही खर्च होणार नाही. बीएमसीचे माजी आयुक्त भूषण गगरानींच्या उपस्थितित फेब्रुवारी महिन्यात कोस्टल रोड गार्डनचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. येत्या २४ महिन्यांमध्ये सर्व लँडस्केपिंग प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे.

अशी असेल प्रक्रिया

ही पुनर्प्राप्त केलेली जमीन असल्यामुळे लँडस्केपिंग सुरू होण्यापूर्वी मातीला तयार करणे महत्त्वाचे आहे. या भागांत मुरम मातीचे थर लावून माती भरण्याचे काम करणार आहेत. जमिनीखाली ९०० मिमीमीटर जमीन या कामासाठी राखीव ठेवली होती. यापूर्वी जमीनीवर ४०० मिलीमीटर मुरमाचा थर लावला असून वृक्ष लागवडीसाठी माती आणण्याचे काम सध्या सुरू आहे, अशी माहिती महापालिकेच्या एका अधिकाऱ्याने दिली आहे.

विविध दाखल्यांसाठी सेतू कार्यालयात गर्दी

| खांब | प्रतिनिधी |

दहावी व बारावी परीक्षांचे निकाल काही दिवसांपूर्वीच लागले आहेत. तर आता पुढील शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेला वेग आला असून विविध शासकीय दाखले मिळविण्यासाठी सेतू कार्यालयात विद्यार्थी व पालकांची मोठी गर्दी वाढू लागली असल्याचे चित्र दिसून येत आहे.

महाविद्यालयीन प्रवेश, शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच विविध शासकीय योजनांसाठी उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, रहिवासी दाखला, नॉन-क्रिमिलेयर, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, डोंगरी विभाग दाखला, अल्प भूधारक दाखला आदी दाखल्यांची



आवश्यकता भासत असल्याने निकाल जाहीर झाल्यापासून दररोज सकाळपासूनच सेतू कार्यालयाबाहेर रांगा लागलेल्या पाहायला मिळत आहेत.

रखरखत्या उन्हाची पर्वा न करता पालक आणि विद्यार्थी आवश्यक दाखले वेळेत मिळविण्यासाठी धावपळ करत आहेत. काही ठिकाणी अर्ज भरणे, ऑनलाइन प्रक्रिया आणि कागदपत्र पडताळणी यासाठीही मोठी गर्दी होत असल्याने नागरिकांना तासन्तास प्रतिक्षा करावी लागत आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता प्रशासनाने अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करणे, स्वतंत्र मार्गदर्शन कक्ष सुरू करणे तसेच ऑनलाइन प्रक्रियेला अधिक गती देण्याची मागणी पालक वर्गातून होत आहे.



स्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ धोकादायक अवस्था

पनवेल : पनवेल रेल्वे स्थानकात प्लॅटफॉर्मच्या सुरुवातीलाच असलेल्या धोकादायक भागामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सकाळच्या गर्दीच्या वेळेत हजारो प्रवासी गाडी पकडण्यासाठी धावपळ करत असतात. अशावेळी एखाद्याचा पाय अडकून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानक परिसरातील तुटलेले भाग, उघडी जागा आणि असमतोल रस्ता यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. अनेकदा प्रवाशांनी याबाबत तक्रारी करूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला दिसत नाही. लोकप्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी स्थानकाला भेट देतात, पाहणीही करतात; मात्र प्रत्यक्षात समस्या कायम असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

स्मृतिदिनानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप



| पाली | प्रतिनिधी |

●भालेराव कुटुंबियांचा स्तुत्य उपक्रम

सुधागड-पालीमधील झाप गावचे रहिवासी भालेराव कुटुंबीय यांनी दिवंगत मारुती पिठाजी भालेराव यांच्या स्मृतिदिनानिमित्त एक स्तुत्य उपक्रम राबविला. विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सर्वांसमोर एक नवीन आदर्श ठेवला आहे.

फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार अविरतपणे अंगीकारून ज्यांनी अखंड आयुष्य आपल्या कृतीतून निष्ठेने सामाजिक, धार्मिक व आंबेडकरी चळवळीत काम काम केले, असे सुधागड तालुका बौद्धजन पंचायतीचे मा. तालुका उपाध्यक्ष मारूती पिठाजी भालेराव यांचा द्वितीय स्मृतिदिन बुधवारी (दि.२८) झाप येथे साजरा झाला. यावेळी उपस्थित मान्यवरांकडून मारुती भालेराव यांच्या आठवणींना उजाळा देत स्मृतीस अभिवादन केले.

यावेळी मारुती पिठाजी भालेराव यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त झाप गावातील दहावी आणि बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, शालेय साहित्य व पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. या स्मृतिदिनानिमित्त बौद्धाचार्य सी.के भालेराव, भिम महाडिक, सु. ता. बौद्धजन पंचायत मध्यवर्ती कमिटीचे अध्यक्ष दिपक भिमराव पवार, जेष्ठ मार्गदर्शक प्रभाकर गायकवाड, जयंत कांबळे, राजेंद्र वाघमारे, विठ्ठल बैकर चंद्रसेन भालेराव, मनोहर गायकवाड, महिला अध्यक्षा अस्मिता कांबळे, दिलीप मोरे, संध्या शिर्के, रंजना पवार, दिपक गवळे, भगवान भालेराव, प्रभा गवळे, भगवान भालेराव, संकेत भालेराव, नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष सुलतान बेंनसेकर, नगरसेवक आरिफ मणियार, लिलेश शिर्के, रवी घाग, मारुती लहाने, कृष्णा सीतापराव तसेच सुधागड ता. बौद्धजन पंचायत पंचायतीचे सर्व पदाधिकारी, झाप ग्रामस्थ, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून मारुती भालेरावांना श्रद्धांजली वाहिली.

छ. शिवाजी महाराज विद्यापीठात पदवीदान

| रसायनी | प्रतिनिधी |

शेंडूंग येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ तृतीय पदवीदान समारंभ शुक्रवारी (दि.२९) दुपारी विद्यापीठ परिसरातील जी. डी. बडाया ऑडिटोरियममध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी विविध विद्याशाखांतील १२६८ विद्यार्थ्यांना पदव्या व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ किसनराव बागडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या.

समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणा प्रताप यांच्या जीवनातून शौर्य, राष्ट्रभक्ती, कर्तव्यनिष्ठा आणि संघर्षाची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. पदवी प्राप्त करणे ही जीवनातील महत्त्वाची उपलब्धी असली तरी बौद्धिक आणि सामाजिक स्तरावरही स्वतःचा विकास करणे तितकेच आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतीय संस्कृतीची ओळख नैतिकता, प्रामाणिकपणा आणि सचोटी यांमध्ये असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात या मूल्यांचे पालन करण्याचा सल्ला दिला. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा आणि संस्कारांचा उपयोग समाज व राष्ट्राच्या विकासासाठी करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

समारंभाची सुरुवात विद्यापीठाचे कुलपती डॉ. केशव बडाया यांनी पदव्या व प्रमाणपत्रांना मान्यता देण्याच्या घोषणेद्वारे केली. यावेळी एकूण १२६८ पदव्या व प्रमाणपत्रांना मान्यता देण्यात आली. यामध्ये ३४ पीएच.डी., ५३५ पदव्युत्तर पदव्या तसेच विविध पदवी आणि इतर अभ्यासक्रमांच्या पदव्यांचा समावेश होता. डॉ.केशव बडाया यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रख्यात शास्त्रज्ञ आणि सीएसआयआरचे माजी महासंचालक प्रा. (डॉ.) शेखर सी. मांडे यांनी विशेष अतिथी म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महाआरोग्य शिबीर

रसायनी : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख माजी आ. मनोहर भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबीर, नेत्रचिकित्सा शिबीर, रक्तदान शिबीर आयोजित केले आहे. या शिबिरात मोफत विविध आरोग्य तपासण्या तसेच मोफत चष्मे वाटप करण्यात येणार आहेत. हे शिबीर सोमवार दि.१ जून रोजी सकाळी ९ ते ३ वाजेपर्यंत जेएनपीटी मल्टीपर्पज हॉल येथे आयोजित करण्यात आले आहे.

वडवलीची कन्या झाली मुंबई पोलीस

कापोली : श्रीवर्धन तालुक्यातील वडवली गावातील एक यशस्वी उद्योजक विजय नाक्ती यांची कन्या सानिका हिची मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे. पोलीस परीक्षा देण्यासाठी गावाहून गेल्यानंतर सानिका सुरुवातीस मुंबईतील क्लास जोडून आपले ध्येय निश्चित करण्यासाठी प्रयत्नशील होती. मात्र नंतर तिला कळले की, ज्ञानदा करीअर ॲकॅडमी पोलीस व आर्मी भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक येथे उत्तम दर्जाचे प्रशिक्षण दिले जाते. म्हणून तिने ज्ञानदा करीअर ॲकॅडमीची निवड केली. घरापासून दूर राहून तिने तिचे उद्दिष्ट पूर्ण करून पोलीस बनण्याचे स्वप्न साकार केले. आईवडीलांची साथ व स्वतःची पोलीस बनण्याची जिद्द सत्यात उतरवून समाजाच्या सेवेसाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तिचे हे पाऊल महत्त्वाचे ठरले आहे. वडवलीसारख्या ग्रामीण भागातील एका मुलीने घरापासून दूर राहून घेतलेली गरुड झेप परिसरातील तरुण-तरुणींना आदर्श ठरावी अशीच आहे.



इलेक्ट्रिक हायड्रोफॉइल फ्लाइंट बोट सुरु | वेगवान, आरामदायी प्रवास होणार

मुंबईतील जलवाहतूकीत आधुनिक बदल

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबईच्या जल वाहतुकीत आता एक मोठा आणि आधुनिक बदल पाहायला मिळत आहे. शहरात देशातील पहिली इलेक्ट्रिक हायड्रोफॉइल फ्लाइंट बोट 'Candela P१२' ची सुरुवात झाली आहे. ही फ्लाइंट बोट वेगवान आणि आरामदायी प्रवासाच्या अनुभवासह पूर्णपणे पर्यावरण अनुकूल आहे. या उपक्रमामुळे मुंबईतील जलवाहतूक एका नव्या उंचीवर पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



महाराष्ट्र सरकारने जल वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी हे विशेष पाऊल उचलले आहे. केरळनंतर आता महाराष्ट्रदेखील या दिशेने पुढे जात आहे. 'Candela P१२' नावाची ही आधुनिक इलेक्ट्रिक बोट स्वीडन कंपनी 'Candela'ने तयार केली आहे.

ही फ्लाइंग बोट मुंबईतील दोन प्रमुख मार्गावर चालवली जाईल. पहिला मार्ग गेटवे ऑफ इंडिया ते अलिबागपर्यंत आणि दुसरा गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटा गुहेपर्यंत असेल. यामुळे प्रवाशांना वेगवान, सुरक्षित आणि वेळ वाचवणारा पर्याय उपलब्ध होईल.

या बोटीची सर्वात मोठी खासियत ही हायड्रोफॉइल तंत्रज्ञानात आहे. जेव्हा बोट एका विशिष्ट वेगाला पोहोचते, तेव्हा ती पाण्याच्या पृष्ठभागावरून वर उचलली जाते आणि हवेत तरंगते. यामुळे पाण्याचे घर्षण कमी होते आणि बोट अधिक वेगाने व सहजतेने अंतर कापते.

सर्वसाधारण समुद्राच्या लाटांमुळे बोटींना झटके लागतात. मात्र या बोटीच्या डिझाइनमध्ये प्रवाशांना कोणतेही झटके खावे लागणार नाही. कारण ही बोट पाण्याच्या पृष्ठभागावरुन वर उचलून चालते. त्यामुळे प्रवाशांना झटके बसत नाही. यामुळे प्रवास अधिक आरामदायी आणि सुरक्षित असतो.

पर्यावरणासाठीही फायदेशीर

ही फ्लाइंग बोट पूर्णपणे इलेक्ट्रिक आहे. म्हणजेच ती कोणताही धूर किंवा प्रदूषण निर्माण करत नाही. ही एक शून्य-उत्सर्जन बोट आहे, जे पर्यावरणाच्या संरक्षणाच्या दिशेने एक मोठं पाऊल मानले जात आहे. यामुळे मुंबईची जलवाहतूक स्वच्छ आणि शाश्वत होण्यास मदत होईल. या नवीन तंत्रज्ञानामुळे मुंबईने जलवाहतुकीच्या क्षेत्रात एक नवी सुरुवात केली आहे.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५


(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

कै.संजय व्यंकटेश दामले, स्मरणार्थ अलिबाग



कै.सचिन पवार, स्मरणार्थ अलिबाग



सौ. अमृता मंगेश सुतार, लग्नदीनानिमित्त, मुशेत, अलिबाग



श्री अनंत केशव देवघरकर, अलिबाग

कै. मधुकर काशिनाथ पुणतांबेकर स्मरणार्थ अलिबाग

सलोनी पयेर झाली मुंबई पोलीस

| कापोली | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन गावातील सलोनी पयेर हिची मुंबई पोलीस



दलात निवड झाली आहे. सलोनीला पोलीस बनायची प्रचंड इच्छा होती. आईवडीलांची साथ व स्वतःची पोलीस बनण्याची जिद्द सत्यात उतरवून पोलीस परीक्षा उत्तीर्ण होऊन समाजाच्या सेवेसाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तिचे हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. बोर्लीसारख्या ग्रामीण भागातील एका मुलीने घरापासून दूर राहून घेतलेली गरुड झेप परिसरातील तरुण तरुणींना आदर्श ठरावी अशीच आहे. काहीतरी करून दाखवण्याचे स्वप्न उराशी बाळगून, आपण पोलीस सेवा, देश सेवा करायची अशी तिची जिद्द होती. अतिशय गरीब कुटुंबातून आलेल्या सलोनीच्या या यशाबद्दल व नवीन कारकीर्द यशस्वी होण्यासाठी गावातील अध्यक्ष मान्यवरांसह परिसरातून भरभरून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

निवडक



भगवा तलावात मृत माशांचा खच

ठाणे : कल्याणच्या प्रसिद्ध भगवा तलावाच्या पाण्यावर आणि किनाऱ्यावर शेकडो मासे मृत अवस्थेत तरंगताना दिसत असून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी, व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून तलाव परिसरात वाढलेल्या दुर्गंधीमुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली होती. बुधवारी सकाळी अनेक नागरिक तलाव परिसरात फिरण्यासाठी आले असता तलावाच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात मृत मासे तरंगताना दिसून आले आणि परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली होती. सध्या वाढत्या उष्णतेमुळे तलावातील पाण्याचे तापमान झपाट्याने वाढत असल्याने पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे माशांना श्वास घेण्यास अडचण निर्माण होऊन मोठ्या प्रमाणावर मासे मृत होत असल्याची प्राथमिक शक्यता व्यक्त केली जात आहे. भगवा तलावाचे सुपरवायझर अनिल सोनवणे यांनी सांगितले की, या घटनेची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच केडीएमसी प्रशासनाला देण्यात आली आहे. दुर्गंधी कमी करण्यासाठी आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी मागील काही दिवसांपासून तलावातून मृत मासे बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. दररोज सुमारे ६० ते ७० किलो मृत मासे बाहेर काढले जात असूनही परिसरातील दुर्गंधी कायम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महिलांची आरोग्य, नेत्र तपासणी



कर्जत : मासिक पाळी स्वच्छतेविषयी जागरूकता दिनानिमित्त धारप हॉल, नेरळ येथे कर्जत मेडिकल असोसिएशनच्या वतीने तसेच लार्सन अँड टुब्रो चॅरिटेबल ट्रस्ट, सद्भाव फाउंडेशन मुंबई, अनिल आय हॉस्पिटल व समर्थ सेवा मंडळ, नेरळ यांच्या सौजन्याने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सुमारे १०० महिलांची आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी करण्यात आली. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची प्रस्तावना कर्जत मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉ. महेश शिरसाट यांनी केली, तर अध्यक्ष डॉ. प्रशांत गांगल यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी कर्जत चे माजी अध्यक्ष डॉ. आशिष कर्वे, सहसचिव डॉ. संजीव पाटील, ज्येष्ठ सदस्य डॉ. श्रीकांत डहाके, डॉ. संजय भामरे, डॉ. आदिती कर्वे, डॉ. अर्चना शिरसाट, डॉ. जयश्री देशमुख व डॉ. शितल कराळे उपस्थित होत्या. तसेच सद्भाव फाउंडेशनच्या प्रकल्प अधिकारी सुनंदा लाड व प्रगती पाटील यादेखील उपस्थित होत्या. नेरळ पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. राहुल वरोटे यांनी कार्यक्रमास सदिच्छा भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले.

सायली पाटीलच्या जिद्दीला यश

पेण : अनेक अपयशांचा सामना करत अखेर आपल्या मेहनतीच्या जोरावर सायली वंदना विलास पाटील हिने महाराष्ट्र पोलीस दलात निवड मिळवून यशाचे शिखर गाठले आहे. तिच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सायलीने २०२३ साली प्रथमच पोलीस भरतीची परीक्षा दिली होती. मात्र त्या वेळी तिला अपयश आले. अनेकजण अपयशानंतर प्रयत्न सोडून देतात, पण



सायलीच्या मनात एकच ध्येय होते पोलीस व्हायचेच. त्यामुळे तिने हार न मानता पुन्हा जोमाने तयारी सुरू ठेवली. यानंतर २०२५ साली तिने पुन्हा परीक्षा दिली. त्या वेळीही केवळ एका गुणाने तिचे यश हुकले. इतक्या जवळ येऊनही आलेले अपयश कोणालाही खचवणारे होते, परंतु सायलीने आपली जिद्द आणि आत्मविश्वास कायम ठवला. कठोर मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास आणि शारीरिक तयारीच्या जोरावर तिने पुन्हा एकदा प्रयत्न सुरू ठवले. अखेर २०२६ साली घेतलेल्या परीक्षेत सायलीला मोठे यश मिळाले आणि तिची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली. तिच्या या संघर्षमय प्रवासाने अनेक युवक-युवतींसमोर प्रेरणेचा आदर्श निर्माण केला आहे. सायलीच्या यशाबद्दल तिच्या कुटुंबीयांनी, मित्रपरिवाराने आणि गावकऱ्यांनी आनंद व्यक्त करत तिचे कौतुक केले आहे.

किशोरवयीन मुलींना ब्युटी पार्लर प्रशिक्षण

खांब : जीवनधारा संस्था, कोलाड येथे किशोरवयीन मुलींसाठी ब्युटी पार्लर प्रशिक्षण शिबीर मोठ्या उत्साहात पार पडले. दरम्यान स्तुत्य उपक्रमाचे समाजातील सर्वच स्तरातून स्वागत होताना दिसत आहे. या शिबीरात कामतवाडी, यशवंतनगर, खोंडावाडी, कोलाडवाडी, तळवली तर्फे अष्टमी आणि वारसगाव येथील २२ मुलींनी सहभाग घेतला. सलग अकरा दिवसांच्या या प्रशिक्षण वर्गात सुचिता पाटील आणि शीतल आंब्रे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहभागी मुलींना विविध व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये हेअर कटिंग, हेड मसाज, क्लीनअप, फेशियल, मॅनिक्युअर, पेडीक्योर, मसाज, थ्रेडिंग, भुवयांची निगा,ब्लीच, वॅक्सिंग, साडी नेसणे, मेहंदी काढणे आणि मूलभूत मेकअप तंत्रे यांचा समावेश होता. प्रत्यक्ष कृतीतून शिकणे सुलभ व्हावे या उद्देशाने, दररोज प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण प्रशिक्षण कालावधीत, मुलींनी प्रचंड उत्साह, शिस्त आणि शिकण्याची तीव्र उत्सुकता दर्शविली. या उपक्रमाने कोलाड परिसरातील मुलींच्या आर्थिक सक्षमीकरणात प्रत्यक्ष योगदान दिले आहे. सर्व मुलींना प्रमाणपत्र देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

कीटकनाशक पिऊन तरुणाचा मृत्यू

ठाणे : अर्नाळा येथील शंकरपाडा येथे राहणारा मयूरेश निनाई या तरुणाचे १९ मे रोजी सकाळी प्रचंड डोके दुखत होते. डोकेदुखी तात्काळ थांबण्यासाठी तो घरात औषध शोधत होता. त्यावेळी औषधाच्या बाटलीसारखीच दिसणारी कीटकनाशकाची एक बाटली त्याच्या हाताला लागली. ही बाटली कोणती आहे हे न बघता त्याने औषध समजून त्यातील लिक्विडचे घोट घेतले. त्यानंतर काही वेळातच त्याला अस्वस्थ वाटू लागले आणि तो जमिनीवर पडला. अत्यवस्थ अवस्थेत कुटुंबीयांनी त्याला तात्काळ कांदिवली येथील शताब्दी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच मयूरेशचा मृत्यू झाला. याप्रकरणी अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पेणमध्ये बकरी ईद उत्साहात साजरी

पेण : मुस्लिम समाजाचा अत्यंत पवित्र सण म्हणून ओळखली जाणारी बकरी ईद (ईद-उल-अजहा) पेण शहरात धार्मिक वातावरणात आणि उत्साहात साजरी करण्यात आली. हजरत इब्राहिम यांनी अल्लाहप्रती असलेली निष्ठा आणि त्यागाची भावना दाखवरा हा सण साजरा केला जातो. समाजात बंधुभाव, प्रेम आणि गरजूंप्रती मदतीची भावना निर्माण करण्याचे मोठे महत्त्व या सणाला आहे.

पेण येथील वरच्या मोहल्ल्यात सकाळी आठ वाजता ईदची नमाज अदा करण्यात आली. नमाजानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी संदीप बागुल प्रवीण पाटील, संतोष पाटील उपस्थित होते.

IIFL FINANCE
CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक ३०.०६.२०२६** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **पनवेल-सेक्टर 19 जीएल - आयआयएफएल फायनान्स लिमिटेड, गिरिजा आनंद बनवली , ग्रा. मजला, दुकान क्रमांक 1/2/3, से-19, स्टेशन रोड, विजय मार्ग , नवीन पनवेल-410206,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

गोल्ड लोन खाता क्रमांक : GL38803407, GL39111110, GL40542003, GL36528964, GL34662398, GL34643708, GL37025040, GL36537449, GL37255128, GL39179447, GL41379901, GL39170208, GL39085572, GL38990615, GL39153061, GL38783547, GL40614580, GL39981566, GL38801865, GL40664799, GL40724506, GL40581334, GL37034742, GL38880390, GL39675514, GL38842489, GL39158731, GL36901975, GL37219589, GL39552106, GL39561843, GL39579078, GL47708726, GL43545149, GL36801441, GL37450847, GL37465252, GL39272487, GL39280120, GL38943706, GL39462961, GL39513564, GL38014451, GL38075382, GL44852282, GL37018894, GL36306556, GL36313696, GL39313336, GL39296070, GL36973485, GL36672768, GL37243448, GL39205375, GL38931519, GL35924419, GL43480586, GL39384174, GL39387743, GL39273230, GL39280297, GL39731074, GL38621530, GL38888414, GL36465355, GL37199282, GL39811970, GL34155197, GL40583998, GL37267216, GL39397737, GL39430442, GL44636416, GL40421772, GL38923985, GL44482579, GL40897120, GL39379275, GL34502797, GL34486678, GL33822655, GL38744323, GL40988363, GL38328618, GL38327650, GL39188543, GL35912660, GL40359340, GL39211366, GL36877620, GL40490950, GL36853868, GL39313249, GL39295759, GL34491624, GL35150310, GL34504692, GL34491079, GL34504076, GL34946729, GL38259597, GL37843964, GL39376840, GL39285362, GL38955957, GL37381190, GL36827937, GL37246314, GL37519244, GL38806511, GL37614895, GL39150184, GL38729798, GL36603633, GL44226551, GL38506680, GL38477876, GL38213077, GL36037613, GL38507163, GL39379250, GL38487971, GL39071817, GL36104503, GL19426202, GL38798026, GL38801168, GL47101927, GL37026041, GL39366047, GL39366534, GL39390907, GL38724696, GL36811203, GL41525979, GL36123193, GL47962614, GL46069119, GL39492767, GL46749746, GL39857632, GL43606562, GL45526020, GL42906543, GL44233057, GL39515857, GL36798027, GL39979935, GL44783656, GL39272571, GL39280132, GL32848868, GL32857611, GL32523726, GL26911244, GL38952711, GL39124542, GL39147925, GL36490036, GL36817774, GL36832480, GL36990457, GL41463782, GL38982367, GL39006375, GL43915058, GL37021054, GL36908436, GL39987755, GL39753161, GL39594892, GL39271611, GL39279921, GL37613958, GL38845115, GL38843750, GL39048457, GL38868539, GL36009778, GL41644074, GL43226234, GL48172789, GL47030187, GL39147712, GL39121488, GL36823962, GL40049693, GL39517446, GL39494564, GL35508928, GL35495654, GL35676240, GL48584028, GL39562166, GL39540072, GL33709839, GL33688140, GL38141268, GL42707361, GL45998581, GL45104710, GL38713242, GL38732787, GL46746313, GL43975233, GL47332327, GL36673040, GL36498150, GL37812978, GL39227157, GL36937046.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.

तारीख : ३०.०५.२०२६
स्थळ: रायगड (एमएच)

स्वाक्षरीकर्ता/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक हिमाली हेमंत जगताप, जयवंत जनार्दन सावंत, वेशाली जनार्दन सावंत, मधुकर जनार्दन सावंत, यदुनाथ यशवंत कदम, रोहिणी चंद्रकांत सावंत, प्रगती अनंत शिंदे, मानसी मनोज साळवी, रा. चौल-चंपावती, पो.चौल, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
चौल ता.अलिबाग	१०/२	०-१६-३० पो.ख.०-०७-३० एकूण ०-२३-६०	१०.०५

वर नमूद बागायत मिळकतीपैकी ०-१०-५० हे. आर. बागायत मिळकतीबाबत.

सबब सदरहू बागायत मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू बागायत मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहितआहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २९/०५/२०२६

सही/-
ॲड. धिरज जयवंत म्हात्रे
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड.

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती अंजली पांडुरंग मांजरेकर रा. अे/१०३, नवउमिया कृपा हौ. सोसा. राजाजी पथ, माधवी बंगला मागे, म्हात्रे नगर, डोंबिवली पूर्व, कल्याण-ठाणे यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
चौल ता. अलिबाग	२६६२	०-३२-५० पो.ख.०-००-६० एकूण ०-३३-१०	१८.७७

वर नमूद बागायत मिळकतीपैकी श्रीमती अंजली पांडुरंग मांजरेकर व सही हिश्शेदार श्री. वसंत हरीश्चंद्र पिळणकर यांचे मालकीहक्कात असलेले ०-२७-४० हे.आर., पो.ख. ०-००-६० हे.आर. एकूण क्षेत्र ०-२८-०० हे.आर., आकार रु.१५.८२ पैसे या मिळकतीपैकी श्रीमती अंजली पांडुरंग मांजरेकर यांचे मालकीहक्कात असलेले ०-१०-२० हे.आर. मिळकतीबाबत.

सबब सदरहू बागायत मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू बागायत मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २९/०५/२०२६

सही/-
ॲड. धिरज जयवंत म्हात्रे
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चिंचोटी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. नरेश रघुनाथ काटकर, २) लक्ष्मण दामोदर काटकर, ३) सुनंदा बळीराम गावंड ४) सुरेखा सुरेश पाटील व ५) सुलोचना नागेश वारगे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले असून तसा रितसर साठेकरार स्वाक्षरीत करण्यात आलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	स. नं./हि. नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
चिंचोटी	५७/७	०-४९-८० पो.ख ०-०३-८० ०-५३-६०	१२.६९

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ३०/५/२०२६

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१

जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. मंगेश धनशाम कवळे, २) श्री. माधव धनशाम कवळे, ३) सौ. माधुरी भिकू कामत व ४) सौ. सुगंधा चंद्रशेखर राऊत यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान जमीनमालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीन मिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही करारद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीन मिळकतीचा व्यवहार अंतिमत: पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू. पै.)
कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड.	५७	०-३७-९०	९.१२

अलिबाग,
दिनांक ३०/०५/२०२६

राजेंद्र दा. पाटील
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन - २, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड,
मो. ९८२२५२८९३१
ईमेल - adv.rdpatil@gmail.com

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे आशिल यांनी मौजे-दुरटोली, ता.रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या एकुण २.४०.००, गुंठे क्षेत्रापैकी १.८०.०० गुंठे क्षेत्र मिळकतीचे मालक श्रीमती अनुराधा राममुर्ती कदम यांचेकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन.
मौजे दुरटोली, ता. रोहा, जि. रायगड

अ.क्र	भुमापन क्रमांक	क्षेत्र	आकार
१.	६४०/१/ब	२.४०.००	२.४०

सदर मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी १.८०.०० गुंठे क्षेत्र या नोटीसीचा विषय असुन यापुढे सोयीकरीता त्यांस सदरहु मिळकत असे संबोधण्यात येईल.

सदरची मिळकत आमचे आशिलांनी मिळकतीच्या मालकांकडुन कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

तरी कोणाही व्यक्तीचे/व्यक्ती किंवा आर्थिक संस्थेचे या मिळकती संदर्भात कुठल्याही प्रकारचा दावा, हरकती, जसे बोजा, दान गहाण सरकारी निमसरकारी कंपनी बक्षीस, भाडेपट्टा वारसहक्क, लोन किंवा इतर काही हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत कागदपत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे. नमुद मुदतीत कोणाही व्यक्तीची कोणत्याही स्वरूपातील लेखी अथवा तोंडी हरकत न आल्यास आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीव्यवहार नोंदणीकृत करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे नोटीस दिली.

ठिकाण : उरण
दिनांक :- २८/०५/२०२६

ॲड. सौ.संपदा एस.मोकल
पत्ता. शॉप नं.१५ नयन अपार्टमेंट,
उरण मोरा रोड, उरण रायगड.
मो.नं (९८६९८३३३६०)

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे-उद्धर ता.सुधागड जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे-उद्धर ता. सुधागड जि. रायगड
मिळकतीचे वर्णन :-

कब्जेदाराचे नांव	स.नं./हि.नं.	क्षेत्र. हे आर	आकार रू.पैसे
श्रीमती.ताई एकनाथ गायकवाड वैगेरे ३	१३१/२	२-७२-००	१-१५

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधित तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक :- २९/०५/२०२६

सही /-
श्री. राहुल जे.भंडारी
ॲडव्होकेट
रा.पाली ता.सुधागड जि.रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे मोठे वेणगाव, ता- कर्जत, जि- रायगड येथील शेती जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) भाऊ शिवराम पालकर व २) रंभाजी शिवराम पालकर, दोघे रा- मोठे वेणगाव ता - कर्जत जि -रायगड याची खालील वर्णन केलेली मौजे मोठे वेणगाव येथील जमीन मिळकत तीचे वर्णन

सर्व्हे क्रमांक	हिस्सा क्रमांक	क्षेत्रफळ हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
९०	२	एकुण क्षेत्र - ०.५१.०० हे.आर.पॉ.	९.००

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक यांनी आमचे आशिलास सदर मिळकत कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त , वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात (७) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही है कळावे.

दिनांक ३०/०५/२०२६

ॲड भारत अंकुश सावंत
(बी कॉम. एल. एल. बी)
पत्ता- मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

Anjuman Islam Janjira Degree College of Science

Murud Janjira, Dist. Raigad 402401
Affiliated to University of Mumbai
NAAC accredited with 'B+' Grade (CGPA-2.69)

Walk in Interview

Academic Year 2026-27
For following Unaided posts

Sr. No.	Department	Post	Qualification Required	No. of Posts
1.	Computer Science	Assistant Professor	M.Sc. in Computer Science or MCA or any equivalent qualification as per UGC norms along with NET/SLATE/Ph.D.	05
2	M.Sc. Chemistry	Assistant Professor	M.Sc. in Chemistry or any equivalent qualification as per UGC norms alongwith NET/SLATE/Ph.D.	02
3.	M.Sc. Botany	Assistant Professor	M.Sc. in Botany or any equivalent qualification as per UGC norms alongwith NET/SLATE/Ph.D.	02
4.	B.Com (Accounting & Finance)	Assistant Professor	M.Com or any equivalent qualification as per UGC norms alongwith NET/SLATE/Ph.D.	03
5.	B.Com (Management Studies)	Assistant Professor	MBA/M.Com or any equivalent qualification as per UGC norms alongwith NET/SLATE/Ph.D.	03

The candidate willing to apply may send their resume along with applications on college mail id/following address by post on or before 4.00 pm till 07th June 2026.

Date of Interview: - 08th June 2026. Time: - 11.00 am

College Mail id:- aijcollege@gmail.com

Address of College: - Anjuman Islam Janjira Degree College of Science, Bazar Peth Road, Murud Janjira Raigad, 402401

Contact Number: Chairman: - 9049125556, Principal: -7038601376

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-खानाव, ता. अलिबाग, जि.रायगड येथील सर्व्हे नं. २४/४/ड, एकूण क्षेत्र ०-५१-०० हे. आर., आकार ३.०० रू. पैसे ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सदाशिव त्रिंबक डोंगरे व श्री. संजीव त्रिंबक डोंगरे रा. मु. आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त , साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख :२९/०५/२०२६

(ॲड. संजय द. म्हात्रे)
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

IIFL FINANCE
CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक ३०.०६.२०२६** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **नागोठणे-मोनालिसा कॉम्प्लेक्स - शांती नगर नागोठणे, बाजार पेठ रोड, कोकणे हॉस्पिटल समोर, ता. रोहा, जि-रायगड पिन 412106,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

गोल्ड लोन खाता क्रमांक : GL37596943, GL37580077, GL39203980, GL36255736, GL36894746, GL37540293, GL36897406, GL39177446, GL39155416, GL36767102, GL35254900, GL39179882, GL39535662, GL39173275, GL39755700, GL45152791, GL39979296, GL36635629, GL39528056, GL39561287, GL35301305, GL39512283, GL39459160, GL35741891, GL39022962, GL38859255, GL38869785, GL45476075, GL38174210, GL39279152, GL39253509, GL39167028, GL44276317, GL39178900, GL42022172, GL47435941, GL47096022, GL39400699, GL46838324, GL39351708, GL39343731, GL36559547, GL36845170, GL36969756, GL36779185, GL42718489, GL42125852, GL42428619, GL43703246, GL39469931, GL39703761, GL47778981, GL46516307, GL39528014, GL39561316, GL45055459, GL39420379, GL36627141, GL39928476, GL39483203, GL39516436, GL39129154, GL39148258, GL38333863, GL39251309, GL35533488, GL34276499, GL34269467, GL34251504, GL38787684, GL37053413, GL41608864, GL38164245, GL37057916, GL36385959, GL36876479, GL42156436, GL37295266, GL39281264, GL39258755, GL39342243, GL39350535, GL39045989, GL39517250, GL46132773, GL39494386, GL39262081, GL40046633, GL39282108, GL38502605, GL41477238, GL35562519, GL36009067, GL37437738, GL39530170, GL39646548, GL39563076, GL43969506, GL39327676, GL39356313, GL47224789, GL35126803, GL35119483, GL36985505, GL39649053, GL38787105, GL37162897, GL39726962, GL43890320, GL47503097, GL36906971, GL39475172, GL39456073, GL39591097, GL39613757, GL48651750, GL36463103, GL36466266, GL36816443, GL36832272, GL39015839, GL38758609, GL42195752, GL37023729, GL43418044, GL38769613, GL38757380, GL35364309, GL39093394, GL39091440.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे



राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षापूर्तीसाठी कठोर परिश्रमावर भर द्या. कर्तव्याकडे अधिक लक्ष द्यावं. बाकी चिंता करू नये.
- **वृषभ** : कार्यात अडथळे येतील. हितशत्रूंच्या कारवाया वाढीस लागतील. उष्णतेचे विकार उद्भवू शकतात.
- **मिथुन** : आर्थिक व्यवहारात काळजी घ्या. थोरामोठ्यांचं मार्गदर्शन हितावह ठरेल. पुरेसा संयम बाळगावा.
- **कर्क** : रेंगाळलेली कामं मार्गी लागतील. आर्थिक उलाढाल बऱ्यापैकी राहील. कौटुंबिक मतभेद संभवतात.
- **सिंह** : विचारपूर्वक आश्वासनं द्या. प्रक्रिया उद्योगात विशेष अनुकूलता राहील. वैवाहिक सौख्य लाभेल.
- **कन्या** : कामकाजात पुरेशी सतर्कता बाळगावी. व्यवसायानिमित्त प्रवास घडेल. नव्या ओळखी होतील.
- **तूळ** : मित्र, सहकाऱ्यांशी मतभेद संभवतात. आपलंच खरं हा आग्रह टाळा. मानसिक अस्वास्थ्य राहील.
- **वृश्चिक** : प्रयत्नातील सातत्य कामी येईल. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील. मतभेदाचे प्रसंग टाळायला हवे.
- **धनु** : जवळच्या व्यक्तिकडून विश्वासघात संभवतो. प्रवास शक्यतो टाळावा. अपचनाचे विकार संभवतात.
- **मकर** : प्रयत्नांना अधिक बळ मिळेल. पतप्रतिष्ठा जपण्याचा प्रयत्न करावा. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : वागण्या-बोलण्यात काळजी घ्यावी. कौटुंबिक प्रश्नांची चिंता राहील. विचारपूर्वक पावलं टाका.
- **मीन** : अनपेक्षित घटना ताण वाढवतील. व्यवसायात साधारण स्थिती राहील. प्रकृतीची काळजी घ्यावी.

स्टाईल स्टेटमेंट

ऑफिस फॅशनचे बदलते ट्रेंड्स

❊ सोहा अली खानने एका कार्यक्रमाला बबल प्रिंट पँट सूट घातला होता. त्यावर तिने निळ्या रंगाचा टॉप आणि त्याच रंगाची पादत्राणं घातली होती. तुम्हीही अशाप्रकारे पँट सूट ट्राय करू शकता.

❊ जंपसूटही आकर्षक दिसतात. थोडा ढगळ जंपसूट घ्या. त्यावर हलक्या प्रिंट्स चालून जातील. सोनम कपूरने असाच एक जंपसूट घातला होता. कंबरेला ब्लॅक बेल्ट बांधला होता. स्लिंग बॅग आणि फ्लॅट पादत्राणांनी हा लूक खुलवला होता. तुम्हीही अशी स्टाईल कॅरी करू शकता.

❊ सलवार कमीजची जागा कोणीही घेऊ शकत नाही. अत्यंत आरामदायी असा हा पोशाख कुठेही घालता येतो. ऑफिससाठी तर तो बेस्टच आहे. कंगना रनौतला हा भारतीय पेहराव खूप आवडतो. प्रवासादरम्यान कंगना ग्रे आणि निळ्या रंगाच्या सलवार कमीजमध्ये दिसली. हा ड्रेस खूप सुंदर दिसत होता. ऑफिससाठी असे रंग बेस्टच!

३० मे

दिनविशेष

- २०१५ : भूसंपादन विधेयकावर सुरू असणाऱ्या विरोधाला न जुमानता मोदी सरकारने तिसरा अध्यादेश मंजूर केला.
- २०१७ : पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देणं थांबवत नाही तोपर्यंत त्यांच्याबरोबर क्रिकेट मालिका होणार नसल्याचं केंद्रीय क्रीडामंत्री विजय गोयल यांनी स्पष्ट केलं.
- २०१८ : एअरसेल मॅक्सिस गैरव्यवहारप्रकरणी माजी केंद्रीय अर्थमंत्री पी.चिदंबरम यांना पुढील सुनावणीपर्यंत अटक न करण्याचे न्यायालयाचे आदेश.

टेक फन

हायटेक मेक अप मिरर

छोट्यांनो, घराबाहेर पडल्यावर आरश्यात बघता येत नाही. थोडाफार मेक अप करायचा असेल किंवा आवरायचं असेल तर काय करायचं, असा प्रश्न पडतो. चीनमधल्या 'श्याओमी' या कंपनीने हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी हायटेक मेक अप मिरर तयार केला आहे. यात ३००० एमएएचची पॉवर बँकही आहे. त्यामुळे मोबाईल चार्जिंगसाठीही या मिररचा वापर करता येतो. मिररच्या चारही बाजूंना खूप प्रखर असे १२ एलईडी लँप बिइस बसवण्यात आले आहेत. हा प्रखरपणा आपल्या सोयीनुसार कमी जास्त करता येतो. या आरश्यात टू एक्स मॅग्निफाईंग काच बसवण्यात आली आहे. या आरश्याचं बटण थोडा वेळ दाबून धरल्यानंतर त्यावरचा फिल लाईट सुरू होतो. पुढच्या तीन सेकंदांमध्ये आपण त्याचा ब्राईटनेस कमी जास्त करू शकतो. मिररचा वापर करून झाल्यानंतर हा फिल लाईट एका सेकंदाने बंद होतो. मिररमध्ये १० टक्के बॅटरी शिल्लक राहिल्यानंतर त्यावरचे लाईट्स आपोआप बंद होतात. मेक अप करताना हे लाईट्स सुरू ठेवता येतात. यामुळे तुम्ही खूप चांगल्या प्रकारे मेक अप करू शकता. सलग एक तास हे लाईट्स सुरू रहातात.

आरोग्यमंत्र

लक्षणांकडे लक्ष ठेवा

कुष्ठरोग हा शब्द आजही अंगावर काटा आणणारा आहे. हा एक गंभीर आजार असून भारतात त्याचं प्रमाण कमी झालेलं असलं तरी अद्याप समूळ उच्चाटन झालेलं नाही. मुख्य म्हणजे समाजातील काही वर्गांमध्ये आजही यासंदर्भातील काही गैरसमज पहायला मिळतात. मात्र कुष्ठरोग अनुवंशिक नसतो त्याचप्रमाणे तो दैवी प्रकोपही नसतो. स्पर्श केल्याने तो पसरत नाही. वेळीच उपचार झाले तर कुष्ठरोग बरा होतो. या पार्श्वभूमीवर कुष्ठरोगाच्या प्राथमिक लक्षणांची माहितीही घ्यायला हवी.

❊ भुवयांचे केस गळणं हे याचं प्राथमिक लक्षण आहे. ❊ कोणतीही जखम दीर्घकाळ भळभळती राहणं हे देखील कुष्ठरोगाचं लक्षण असू शकतं. त्वचेवर डाग दिसणं आणि या जागी कोणताही स्पर्श न जाणवणं हे कुष्ठरोगाचं लक्षण आहे. त्वचेवरील हा डाग रंगहीन असतो. या ठिकाणी सुई टोचली तरी कोणत्याही वेदना जाणवत नाहीत. ❊ हातापायांची बोटं बधीर होणं, नसांमधील संसर्ग कमी होणं हे कुष्ठरोगाचं प्रमुख लक्षण आहे. हातापायांची बोटं बधीर झाल्याने रुग्ण स्पर्शज्ञान अनुभवू शकत नाही. ❊ हातापायातील ताकद कमी होणं, वस्तू पकडण्याची हातांची क्षमता कमी होणं हे देखील कुष्ठरोगाचं प्रमुख लक्षण आहे. ❊ या रुग्णांना डोळ्यांची उघडझाप करताना अडचण जाणवू शकते. ❊ कुष्ठरोग पुढच्या अवस्थेत पोहोचल्यानंतर श्वसनसंस्थेमध्ये संसर्ग उत्पन्न होतो, कफ साठून राहतो आणि रुग्णाची स्थिती उत्तरोत्तर खालावत जाते. यात रुग्णाचा अंत होतो. म्हणूनच वेळेत निदान होणं अत्यंत गरजेचं असतं.



पंचांग

शनिवार, ३० मे २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अधिक ज्येष्ठ शु. १४, चंद्रराशी : तूळ,
नक्षत्र : विशाखा, योग : शिव,
सूर्योदय ६.०३, सूर्यास्त ७.१०

फॉरवर्ड्स

क़द उनकां छोटा हैं पर सायें बहुत लंबे पाल रखें हैं..

किराये क़ी रोशनीं हैं औऱ लोग़ कहतें हैं क़ी सुरज संभाल रखें हैं...!

फॅशन पॅशन

❊ कॅज्युअल लूकसाठी लोफर्स कॅरी करा. यामुळे तुम्हाला खूप आरामदायी वाटेल. रस्ट रेड, ऑलिव्ह ग्रीन तसंच पिवळ्या रंगातल्या शेड्स तुमचा लूक खुलवतील.

❊ उन्हाळ्यात गॉगल मस्ट आहे. चेहऱ्याला साजेसा गॉगल घाला. हटके रंगाच्या ऑफ बीट फ्रेम्स निवडताना अजिबात घाबरू नका. ट्रेंडी डिझाइन्सवर भर द्या.

❊ डोक्यावर छानशी टोपी घाला आणि गप्पा टप्पा करत ब्रंचचा आनंद लुटा.

करिअरवाटा

ऑटोमोबाईलमध्ये भरपूर संधी

सध्या वाहननिर्मिती उद्योगाची व्याप्ती वाढत आहे. अशा परिस्थितीत या क्षेत्रात गुणात्मक तसंच संख्यात्मक वाढ होण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचं ज्ञान असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता भासत आहे. एखाद्या कारचं नवं मॉडेल विकसित करताना शेकडो अभियंते रात्रंदिवस काम करत असतात. परंतु भारतामध्ये ऑटोमोबाईल तंत्रज्ञानामध्ये पीएच.डी. केलेल्या तंत्रज्ञांची चणचण जाणवत आहे. या उद्योगाशी संबंधित असणाऱ्या ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (एआरएआय) या संस्थेनं ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजीमध्ये डॉक्टरेट करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचं ठरवलं. एआरएआयच्या अखत्यारीत काम करणाऱ्या अकॅडमी फॉर एज्युकेशनल प्रोग्राम्स तसंच अन्य काही संस्थांतर्फे हा उपक्रम राबवला जातो. सुरुवातीला लेखी परीक्षा, तोंडी मुलाखत देऊनच इथे प्रवेश घेता येतो. ऑटोमोबाईल हा विषय घेऊन एम.ई. किंवा एम.टेक. झालेल्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमास प्रवेश घेता येतो. पुण्यामध्ये आणि चेन्नईमध्ये तसंच अन्य काही महत्त्वाच्या शहरांमध्ये ऑटोमोबाईल विषयातील बी.टेक आणि एम.टेकचे अभ्यासक्रम उपलब्ध होत आहेत.



खेचाखेची

नीट

पत्रकार: आत्ता नीटमध्ये जी गडबड झाली आहे, त्यावर आपलं काय म्हणणं आहे?

नेता: पहिले तर 'नीट' घ्यायलाच नको. सोडा किंवा पाणी मिसळून घ्यायला पाहिजे...

.
.
.
.

याहून अधिक मी काही बोलू शकत नाही.

वेगळं काही

रशियातल्या एका विद्यार्थ्याने इंस्टाग्रामवर विशिष्ट शैलीत सही करून देण्याचा व्यवसाय सुरू केला. यातून त्याने पाच महिन्यात ३०,५०० डॉलर्स मिळवले. इवान कुजिन या रशियन विद्यार्थ्याची स्वाक्षरीही सर्वसाधारणच होती. पासपोर्ट तयार करण्यापूर्वी त्याला स्वाक्षरी बदलायची होती. यासाठी त्याने मैत्रीण अनास्तासिया डोरची मदत घेतली. तिला कॅलिग्राफीचं ज्ञान होतं. तिने या मित्राची खास स्वाक्षरी तयार केली. इथूनच इवानच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. मग त्याने डिझायनर स्वाक्षऱ्यांचा ऑनलाईन व्यवसाय करायचं ठरवलं. यासाठी त्याने राइट टाईट नावाने इंस्टाग्राम हँडल तयार केलं. यात त्याने अनास्तासियालाही सहभागी करून घेतलं.

फॅशन पॅशन

निवड प्रावरणांची

वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी वेगवेगळ्या प्रकारची प्रावरणे वापरावी लागतात. थोडं नियोजन असेल तर तुम्ही प्रत्येक कार्यक्रमासाठी परफेक्ट लूक मिळवू शकता. कसं ते पाहू...

❊ फॅमिली गेटटुगेदर- अशा कार्यक्रमांसाठी सनड्रेस, स्कर्टस, पलाजो आणि क्रॉप टॉप हे पर्याय तुम्ही निवडू शकता. याशिवाय तुम्हाला आरामदायी वाटणारा कोणताही पेहराव या कार्यक्रमात घालू शकता. ❊ बर्थडे पार्टी- अशा कार्यक्रमांना मिनी स्कर्ट, स्लिप ड्रेस, ह्युब ड्रेस, केप्री, पलाझो हे पर्याय निवडू शकता. या ड्रेससोबत तुम्ही हँगिंग इअररिंग्ज, एथनिक रिंग्ज वापरू शकता. याशिवाय रोप सँडल, टिपटॉप सँडल आणि किटन हिल्स वापरू शकता. ❊ फेस्ट- या कार्यक्रमासाठी आपल्याकडे लेटेस्ट आणि इतरांपेक्षा वेगळा ड्रेस असेल याची काळजी घ्या. अशा कार्यक्रमांसाठी लेटेस्ट ड्रेससोबत स्लिप आणि नेट ड्रेस, मिनी विथ शॉर्ट टॉप, लाँग गाऊन हे पर्याय सर्वोत्तम आहेत. एथनिक ज्वेलरी, चेन ज्वेलरी या आउटफिटवर उठून दिसतात. ❊ आउटिंग- या प्रसंगी शॉर्टस, क्रॉप टॉप, केप्री हे पर्याय उत्तम.



सुडोकू ११०

८	३	२					९	
७				८	३			
१				९		२	३	
					७	१		५
६								४
४		८	६					
	६	७		२				९
			३	१				६
	१					८	५	३

टीप -

❊ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


❊ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

❊ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १०९चे उत्तर

८	३	१	२	४	९	७	६	५
७	९	६	५	१	८	३	४	२
२	५	४	७	३	६	८	१	९
४	७	२	६	५	३	१	९	८
६	१	९	४	८	७	२	५	३
५	८	३	९	२	१	४	७	६
९	२	८	१	७	५	६	३	४
१	४	५	३	६	२	९	८	७
३	६	७	८	९	४	५	२	१

शब्दकोडे क्रमांक ११०



आडवे शब्द :-

१) पोशाख चढविणे
५) खोटे नाणे
८) भारी कपड्याच्या आंत लावलेले हलके कापड
१०) मौज करणे
१२) विहीर
१३) एकसारखे,नेहमी
१५) मनाचा ओढा
१६) विपत्तीची कहाणी
१८) रमापती
२१) साखरेची फुगीर वडी
२४) सरस-नीरस अशी भावना
२८) व्रत
३०) पौराणिक कहाणीतील राजा-राणीचे गाव
३३) माळ धारण करणारा
३४) गुमान,तक्रार न करता.
३५) मेलेला
३६) जोराने आवळणे
३७) मंत्रीमंडळ
३९) फुलातील पुंकेसर
४३)एक श्वास रोग
४५) निवासस्थान
४६) सपाटून
४९) पाठविलेला
५१) झाडाभोवतीचा कट्टा
५२) जंगलात भटकणे
५५) अर्धांगवायू
५६) मध्यमप्रतीचा
५८) जादू
५९) येशूची प्रार्थना करण्याचा साप्ताहिक दिवस (सं)
६२) पद्धत
६३) राहण्याची जागा
५४) पंख
६५) जमीनजुमला
६७) जमिनीखाली येणारे फळ
६८) टोळीचा प्रमुख
७१) भयानक
७२) थांबवलेले,रोखलेले
७४) दहावी रास

उभे शब्द :-

१) राबता,जाणे-येणे
२) कुटुंब
३) पवित्र घर
४) सुबकपणा,नाजूकपणा
५) पुरुष
६) एक जंगली फूल
७) गोदावरीच्या तीरावरील धर्मक्षेत्र
८) सुपारी कातरण्याचे साधन
९) कणीदार
११) सामान
१४) लक्ष्मीचे एक नाव
१७) हलणे,मळमळणे
१९) सोन्याचे हरीण
२०) दरवाजा
२२) कर्ज देणारा
२३) स्तुती करणारा
२४) जरच्या बरोबरचा शब्द
२५) तमाशातील कलाकार
२६) शपथ
२७) वर्ष (ग्रा.)
२९) आंब्याची पोळी
३०) सिंहाच्या मानेभोवतीचे केस
३१) ध्रुपद, वारंवार म्हणण्याचा पदातला भाग
३२) अवस्था,स्थिती
३४) न दिसणारी जखम
३८) दात
४०) रानाकडे जाण्याचा रस्ता
४१) हस्ते-परहस्ते,सहज
४२) जादूटोणा
४४) च्या शिवाय
४५) पातळसर
४७) पालखीत बसण्याचा अधिकार असलेला
४८) बाज विणण्याची कापडी पट्टी
५०) उत्तराधिकारी
५१) पारद
५३) भटकणे
५४) मांडणी
५७) वतन मिळालेला
६०) पायजमा
६१) काढलेली सुट्टी
६३) थोडावेळ
६५) कापड,वस्त्र
६६) एक पालेभाजी
६८) ओवाळून टाकलेला जिन्नस
६९) पैसा,किंमत
७०) जिनसांची यादी
७३) धान्याचे दळून पीठ करुन मिळण्याची जागा वा यंत्र
७५) पृथ्वी
७७) अहंकार
७८) ऋण
७९) विविध
८१) श्वसनेंद्रिय

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागच्या शब्दकोड्याचे उत्तर

सु	पा	री	■	मा	रा	■	दे	■	वा	र	क	री	■	चे	क
ग	रा	■	वा	स	■	गा	व	रा	न	■	रं	■	■	ह	वा
र	■	ला	ड	■	स	डा	■	ख	र	बु	जी	चे	ह	रा	■
ण	■	ल	■	■	म	■	घ	ण	■	ज	■	टू	■	मो	द
■	सं	भ	व	नी	य	■	■	दा	य	रा	■	क	ल	ह	■
का	■	ड	र	■	सू	त्र	का	र	■	■	स	■	वा	रा	■
क	ड	क	■	क	च	■	र्य	■	म	न	मु	रा	द	■	स
■	ळ	■	त	ब	क	■	क्र	■	हि	■	दा	स	■	क	ट्टा
रा	म	रा	म	■	ता	ली	म	खा	ना	■	य	■	आ	र	■
मा	ळी	■	■	खा	■	ला	■	न	■	श	■	वा	ट	प	■
व	त	न	दा	र	■	व	र	दा	यि	नी	■	■	पा	ट	व
ता	■	ग	वा	■	मा	ती	■	न	■	चा	र	ग	ट	■	खा
र	ब	र	■	रा	स्त	■	श्रा	■	स	फे	द	■	न	वा	र
■	■	पा	रा	वा	र	■	व	सुं	ध	रा	■	सा	ग	र	■
हि	मा	ल	य	■	■	आ	ण	■	न	■	स	म	र	स	ता
म	न	■	ते	न	सिं	ग	■	गो	■	मा	य	ना	■	■	रा

कलासक्त

आयुष्याच्या संघर्षामधली उमेद आणि विचारांच्या गुंतागुंतीतून उलगडत जाणारा भावनिक प्रवास मांडणारं पी एन पी कला विकास मंडळ अलिबाग अंतर्गत ग्रामीण रंगभूमी आयोजित नाट्य महोत्सव म्हणजे तीन तालुक्यातील ग्रामीण कलाकारांचा मोठा सोहळा...! जो सध्या प्रेक्षकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे. या सोहळ्यात ग्रामीण नाटकांचा आवाज घुमताना ऐकण्याचा आणि कलाविष्कार पाहण्याचा अनुभव घेता आला. कुणासाठी हा महोत्सव सिनेमांचा अभंग समुद्र ठरला तर कुणाचे मोठ्या रंगमंचावर चालण्याचे स्वप्न पूर्ण झालं. ग्रामीण कलाकारांमध्ये उभे राहून रसिक प्रेक्षकांनी मराठी संस्कृती कथा आणि अस्मिता यांचं प्रतिनिधित्व केलं. या अनुभव प्रवासाबद्दल सांगावे तितके थोडेच. तरीही अनभिज्ञ प्रेक्षकांसाठी केलेला शब्द प्रपंच.

ग्रामीण कलाकारांसाठी पर्वणी

नाट्यप्रभा महोत्सव

राजू झावरे

दरवर्षी यात्रेनिमित्त गावच्या वीस बाय तीस फुटाच्या फळ्यांच्या स्टेजवर होणारा नाटकांचा प्रवास आज पीएनपी सारख्या अवाढव्य नाट्यभवनापर्यंत पोहोचला आहे. रंगमंचाच्या वास्तवाचा रखरखीत अग्नीनंतरचा आणि सुखासीन सावलीपर्यंतचा हा प्रवास फक्त भाई जयंत पाटील आणि चित्रलेखाताई पाटील यांच्यामुळे शक्य झाला. मराठी नाटकांचा अभंग समुद्र वाटावा तसे नाट्यप्रभा नाट्य-महोत्सवात आल्यावर वाटलं आपण नाटकाच्या अथांग समुद्रात उभे आहोत. जिकडे नजर जाईल तिकडे फक्त नाटक, नाटक आणि फक्त नाटक. तालुक्यांच्या कानाकोपऱ्यातून आलेली माणसं, भाषा, वेगवेगळ्या संस्कृती, वेगळ्या नजरा आणि प्रत्येकाच्या डोळ्यात आपल्या कथेला प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचं स्वप्न... पहिल्या दिवशी तर मी पूर्णपणे हरवल्यासारखाच झालो. आजूबाजूला नेमकं काय चाललंय... लिहायला नक्की कुठून सुरुवात करायची..? असे अनेक प्रश्न माझ्यासमोर होते.

पीएनपी कलामंचासमोर बसलेल्या प्रेक्षकांचा अंदाज घेत 'गजा आला रे..!' नं दमदार सुरूवात केली. स्वप्नसुखाचे पाहताना हे नाटक दुसऱ्या दिवसाची संध्याकाळ मनात घर करुन गेले. वेड्या भावाची वेडी माया आसु आणि हसूंची पेरणी करत प्रेक्षकांनी दाद दिली. करमरकर हाऊस हे नाटक पाहिलं आणि समजलं नाटक फक्त पाहिलं जात नाही तर ते जगलं जातं. आमच्या तीन तालुक्यात तांदळाचा म्हणजेच भातशेतीचा वरचष्मा आहे. शेतकरी आत्महत्या ही शेतकऱ्यांच्या माथ्यावरील भळभळती जखम. शेतकरी समस्यांचे ज्वलंत चित्र नाटकातून उमटले. काही झालं तरी मातीला विसरू नको हा भाऊक संदेश रंगारी भिंतीवर मातीचे ठसे उमटवण्याचा भास करून गेला.

अजून अंधार दाटून आहे, वेडा वृंदावन, दीप तुझ्या वंशाचा, विदूषक, माझं काय चुकलं?, स्वप्न सुखाचे पाहताना या नाटकांची नावं समपर्क आहेत. तथाकथित गौरवशाली परंपरांची अमानुष बाजू अन्याय, कपटीपणा या नाटकांतून मांडला आहे. या पुढेही प्राणपणाने नाट्यप्रभाच्या नाट्यसंमेलनामधून अव्याहतपणे निष्ठा जागृत ठेवत मातृभाषिक गावरान लावण्य नाट्यमहोत्सवाने तोलून धरले असल्याची जाण कलाकारांनी व्यक्त केली. तरुणाईच्या प्रश्नांना भिडणारी नाट्यकृती या माध्यमातून पहायला मिळाली.

समाजात खोलवर झिरपलेले अंधश्रद्धेमुळे एका तरुणाच्या आयुष्यात वेगवेगळं दुःख पहायला मिळाले. पीएनपी रंगमंच आणि ग्रामीण रंगभूमी या समांतर रुळांचा प्रवास खेड्यापाड्यांमध्येही उत्कर्षानं पोहोचला. कलाकारांच्या एका गावबोलीला लगडलेल्या लोकश्रद्धेचा तो देखणा आविष्कार ठरला. कस्तुरीचा दरवळ भवतालात पसरण्यासाठी निसर्गाच्या अनुमतीची गरज नसते, हवेची झुळूक हा परिमल आसमंतात पोहचवण्यास पुरेसा ठरतो. नाट्यसंस्कृती आणि लोकसाहित्याचेही तसेच असते. नाटकाचा अमोद अनादी काळापासून विभिन्न भागात आपसूक पसरत असतो. नटरंगाच्या आशिर्वादाने रंगमंच संवादी असतो. तो प्रेक्षकांना जवळ आणतो. रंगमंचावरचा रुबाब मनोरंजनापुरता मर्यादित नसतो, सांस्कृतिक परंपरेचे अभिमानत्व मिरवण्याचा थाट त्यावरच्या कलाकारांच्या अंगी मुरला जातो. नाटकांविषयी आवड असणे वेगळं आणि ती शैली व हातोटी आत्मसात करणे वेगळं. याच ग्रामीण भागातले कसबी लेखक ज्यांनी स्वतः आजपर्यंत कौटुंबिक आणि व्यावसायिक दहा नाटकं लिहिली आणि दिग्दर्शित केली ते श्री सुनील धुमाळ यांच्या माझा काय गुन्हा? या नाटकात काम करताना माझा मुलगा आदित्य म्हणतो, नाटकाच्या तालमीतून रोज काहीतरी नवीन शिकायला मिळतं. रोज तुमचं पात्र वेगळ्या पद्धतीने उलगडत जातं. नाटक करताना दिग्दर्शकाच्या दृष्टिकोनावर विश्वास ठेवणं महत्त्वाचं असतं.





आता ग्रामीण रंगभूमीच्या माध्यमातून कलाकारीचा भामक पसारा झपाट्याने वाढतो आहे. आमच्या गावाकडच्या शब्दांची गंमतच न्यारी जी बोलीभाषा विनोदी कलाकारांच्या मुखात ऐकायला मिळाली आणि रंगभूमीवर वेगळ्या शब्दांचे दाखले येताच रसिक प्रेक्षकांकडून समरसून दाद दिली गेली. अशा अस्सल शाब्दिक हिंदोळ्यावर ग्रामीण नाटक मजेत झोके घेत होतं. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या प्रेक्षक वर्गाकडून मिळणारी पोच पावती कलाकारांच्या भूमिकेची पोचपावती ठरली आहे.

प्रत्येकाला वाटायचं आमच्या नाटकाला मिळणारा प्रतिसाद खूप भावणारा आहे. असे न पाहणारा कलाकार जणू म्हणत होता काठावरी उतरली स्वप्ने तहानलेली, डोळ्यात वेदनेचा माझ्या झरा असावा, अनेक प्रेक्षक आणि नाटक एकमेकांशी जोडले गेले. मनाला भिडणारी कथा असल्याचा अनेकांनी सांगितलं जेव्हा जाणवलं की कथा स्थानिक असली, भाषा मराठी असली, तरी भावना जागतिक असतात.

आजच्या काळात माणूस भूमिका घेतो, पण त्या भूमिकेची किंमत मोजण्याची तयारी ठेवत नाही. असं म्हणतात आपली कलाकृती ही आपल्या व्यक्तिमत्त्वाची ओळख असते. एक सांगू का नाटक कोणत्याही एका विचारधारेची जाहिरात नसते तर स्वतःला आरशात पाण्याची संधी असते. कुटुंबात, सामाजिक नात्यांमध्ये आणि वैचारिक भूमिकांमध्ये निर्माण होणारे संघर्ष नाटकातून प्रभावीपणे उलगडले गेले. काही नाटकांमध्ये तर समकालीन सामाजिक वास्तवाचा आरसा दाखवत मानवता विवेकाने प्रामाणिकपणाचा आग्रह घेणारे या नाटकात प्रबोधनाची अफाट क्षमता असल्याचं मला जाणवलं. या नाट्य महोत्सवात प्रत्येक जण काही ना काही घेऊन आलेला पाहताना मला बरं वाटलं. कुणी आपली भूमिका विकायला आलाय, कुणी नाटकासाठी निर्माता भागीदार शोधतोय तर कोणी जगाला आपली संस्कृती दाखवण्यासाठी धडपडतोय. इथे आल्यावर नाट्य विश्वात आपण कुठवर आहोत हे समजतो त्याचवेळी आपल्या कथांमध्ये, आपल्या भूमिकांमध्ये किती ताकद आहे, याची जाणीव होते हाच नाट्यमहोत्सवाचा खरा अर्थ. मोठमोठे कलाकार दिग्दर्शक आणि सेलिब्रिटी मोठ्या थेटरवर कसे वावरतात, गावाकडच्या ग्रामीण कलाकाराला मनात कायम एकच प्रश्न असायचा, आपण तिथे कधी जाणार? आणि ते स्वप्न साकार केलं आमच्या चिऊताईंनी, विक्रांत वार्डे सरांनी, अनंत पांचाळ साहेबांनी आणि ग्रामीण रंगभूमीच्या सर्व सदस्यांनी.गावोगावी यात्रेच्या निमित्ताने नाटकात काम करताना नेहमी वाटायचं की आपल्या कथा भाषा आणि संस्कृती अजून कुठेतरी लांबवर पोहोचायला हवी. आपल्याही नाटकाला कुठेतरी मानसन्मान मिळायला हवा. यंदा ते स्वप्न प्रत्यक्षात उतरलं. ताईंच्या सहकार्यामुळे ही संधी मिळाली. नाट्यमहोत्सवाचं आमंत्रण मिळालं आणि ग्रामीण कलाकार शहरातल्या वातानुकूलित भव्य दिव्य रंगमंचावर पोहोचला. तिथल्या रेड कार्पेट वरचा तो पहिला क्षण शब्दातीत होता, कलाकाराचा आणि प्रेक्षकांचाही. आजूबाजूला झगम गाट आणि नाटकाचा दरारा. प्रेक्षकांकडून मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक होता. त्या क्षणी पहिल्यांदाच सेलिब्रिटी असल्यासारखं वाटलं. पण त्या भावनेपेक्षा ही मोठी भावना होती ती अभिमानाची. कोणत्याही क्षेत्रात काम करताना मातृभाषेतून मिळालेली शिदोरी नेहमीच कामी येते. नाट्यमहोत्सवा निमित्त कलाक्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारची कामं करणाऱ्या कलाकारांनी त्यांना ग्रामीण भाषेनं दिलेली ठेव मोठ्या अभिमानाने सांगितली. आज नाट्य महोत्सवाच्या निमित्ताने आपल्या कलागुणांचा पाया भक्कम करत प्रवास समृद्ध केल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केलं. नाट्य महोत्सवांना केवळ आत्मविश्वास दिला नाही तर एक चांगला भावी सुजाण कलाकार होण्यापर्यंतचा प्रवास घडवला. आज भव्य दिव्य सोहळा पाहून नाट्य श्रीमंतीचा सार्थ अभिमान वाटला. प्रत्येक कलाकाराच्या खांद्यावर नेहमी भूमिकेची पताका असते, ही पताका केवळ अस्मिता नसून आपण सांस्कृतिकदृष्ट्या सजीव असण्याची महत्त्वाची खुण आहे. मराठी रंगभूमीपासून अभिनय प्रवासाची सुरुवात केलेला कलाकार तसेच ग्राम ीण नाट्यमहोत्सवात अतिशय मेहनत घेणारा ग्रामीण रंगभूमीचा सल्लागार, प्रतीक पानकर म्हणतो मराठी नाट्य साहित्य, संस्कृती आणि इतिहासाने दिलेल्या या समृद्ध वारशाबद्दल मी सदैव कृतज्ञ असेन, ही ओळख आयुष्यभर जपेन. कारण आईच्या कुशीची ऊब या नाटकांमुळेच मिळते.

कलाकार नेहमीच मराठी नाटकांविषयी आत्मियतेनं बोलत असतो. ग्रामीण रंगभूमीचे केळुस्कर सर म्हणतात, नाटक म्हणजे माझ्यासाठी केवळ संवादच नाही तर माझ्या मातीतल्या कथांना जगभरात पोचवणारं माध्यम आहे. माझ्यासाठी नाटक ही केवळ भाषा नाही तर ती परंपरेचा वारसा संस्कृतीची ओळख आहे. तर जितेंद्र कुमार म्हणाले आकाशात झेप घेणं चांगलं आहे, पण आकाशात झेपावताना आपण आपली मूळं विसरता कामा नये.

ज्या नाटकांनी आपल्याला ओळख दिली, त्या नाटकाला विसरून अजिबात चालणार नाही. ग्रामीण कलाकारांना नाट्यमहोत्सवामध्ये नाटकांनी भरभरून दिलं. आज कलाकारांनी दाखवून दिलं की आजची पिढी नाटकांच्या पालखीची भोई आहे. ग्रामीण नाटकाचा वसा पुढील पिढीकडे सुरक्षितपणे सुपूर्द करणं ही रंगकर्मी माणुस म्हणून आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. ग्रामीण कलाकारांच्या कलाविष्काराचे हे विविध अंगी दर्शन कला रसिकांसाठी बारा दिवस सुरू आहे, की ज्याच्यात परंपरा आणि सामाजिक जाणीव जपणाऱ्या कलाकृतींचं सादरीकरण झाले.ती कला रसिकांसाठी एक मोठी परवणी ठरली. मान्यवर कला समीक्षक यांच्या उपस्थितीत प्रारंभ झालेल्या या नाट्यमहोत्सवाने संस्थेच्या सर्जनशील परंपरेची आणि समकालीन जाणीवेची पुन:श्च एकदा साक्ष दिली.

एखाद आत्तापर्यंत शंभराहून जास्त नाटकांची परस्परांची स्पर्धा सुरू असताना गावकरी मात्र उद्विग्नतऐवजी नाट्यवेडाने हरवून गेले आहेत. असं दृश्य आपण सगळ्यांनी बघितले आहे. ग्रामीण रंगभूमीला आणि बोलीभाषेला अशा तदृपतेची मुळीच नवलाई नाही. लहान गावागावातील आलेल्या कलाकारांचा रंगोत्सव पार पडला. काही वर्षांपूर्वी एकाच गावात तीन-चार नाटके तिथे रात्रभर चालत असत. नाट्य महोत्सवात पाहता आलीय ती नाट्यरंगात तल्लीन होण्याची परंपरा अनेक गावांमधून जपली आहे. भाषा संस्कृती आणि नाट्य संगीताच्या महोत्सवात आकंठ डुंबून जाणे हा शिरस्ता ग्रामीण रंगभूमीसाठी अभिमानाचा ठरला आहे. नाटकांचा जागर केवळ प्रशासकीय आखणीतून नव्हे तर लोकसहभागातून किती दमदार असतो याचे हे आदर्श उदाहरण ठरावे. नैसर्गिक संपन्नतेला कला संस्कृतीचा आवेद पोषक ठरतो. नाटकांच्या परंपरेनं नेमके ते सिद्ध केले. बारा दिवसांच्या नाट्यकल्लोळाची सांगता निमंत्रितांच्या सहभागाने झाली. रंगमंचाच्या अंगणात स्वागताचं पाट पाणी ठेवून परिचित अपरिचितांनाही खुले अवतान देण्याचे औदार्य ग्रामीण रंगभूमीने जपले आहे. एकाच वेळेस बारामती चालवलेला लोक जागर एखाद्याला आश्चर्यचकित भासू शकेल. पण हा लोकभ्रम निश्चितच नाही. अशा नाट्य आसक्तीला शहरी समीक्षांकडून प्रमाणपत्र द्यावे, हीच ग्रामीण रंगभूमीच्या कार्यकर्त्यांची मानसिकता होती. नाटकाचा ध्यास जपणे हाच या ग्रामीण रंगभूमीचा प्राण आहे. ग्रामीण लोककलांचा सक्रिय जागर काय असतो हे बघायचं प्रेक्षकांचं स्वप्न पूर्ण झालं. नाट्य परिसराला लगडलेल्या परंपरांमध्ये जुन्या आस्था आणि नव्या असोसीचा अद्भुत संगम पाहताना रंगभूमीचा सुगीचा काळ सुरू झाला आहे असं वाटलं. कलाकारांप्रती वरच्या पातळीवर फारशी कुणी दखल घेतली नाही मात्र चिऊताईंच्या मार्फत आणि ग्रामीण रंगभूमीच्या सहयोगानं उधळलेल्या पुरस्कार आणि सन्मानाची सुगंधी चिमुट कलाकारांच्या संवर्धनासाठी पुरेशी ठरली. नाट्यमहोत्सवात सहभागी झालेली नाटकं गजा आला रे (भोनंग), स्वप्न सुखाचे पाहताना (बांधण), वेड्या भावाची वेडी माया (माणकुळे), दीप तुझ्या वंशाचा (मेढेखार), अजून अंधार दाटून आहे (पेझारी), करमरकर हाऊस (मिरर थिएटर), माझा काय गुन्हा? (नांगरवाडी), विठ्ठल विठ्ठल (बोरघर), विदूषक (खिडकी), वेडा वृंदावन (पेझारी), माझं काय चुकलं (नवखार), आणि वारी (हाशिवरे) अशा नशीबवान नाट्य मंडळांना आपले नाट्यप्रयोग सादर करण्याचा मान सन्मान मिळाला.

आता पीएनपी नाट्यगृह सगळ्या गोष्टींनी परिपूर्ण आहे. इथल्या रंगभूमीवरील तुमचे मानसिक आणि भावनिक गुंतणे महत्त्वाचे ठरते. ही सक्रियता चकित करते. कलावंतांची समय सूचकता नाटकात रंग भरण्याचं काम करते. नाट्य संस्कृतीतील या गुणाला मराठीत प्रत्युत्पन्नमती असं म्हणतात. हे कलाकारांच्या गावीही नसते. करमणूक हा परंपरांचे जोडून घेणारा एक धागा आहे. एकमेव हेतू नाही. लोकरंजनातून आत्मशुद्धी असा काहीसा पवित्र भाग त्यात असतो. नाट्य संस्कृतीचा अंतस्थ जागरच या निमित्ताने केला गेला. इथे झालेल्या प्रत्येक नाटकात बेदरकार जीवनशैली, उपरोधक संवाद, लहरी स्वभाव आणि व्यसनी मानसिकतेचे भविष्य किती वेदनादायी असू शकते याचे प्रत्यंतर या नाटकांतून दिसलं. एखाद्या चिमुरड्याने साकारलेली नटाची भूमिका ही किती तादात्मतेने स्वीकारली जाते याचे ते उदाहरण ठरले. पायाला भिंगरी बांधल्यासारखे कलावंत पहायला मिळाले. भूमिकांच्या गदारोळातून पाठांतराची समस्या निर्माण होते, अशा प्रासंगिक असुविधांकडे दुर्लक्ष करून आलेल्या प्रेक्षकांनी समंजस मनोवृत्तीकडे दुर्लक्ष केले. समाजातील वास्तवाचे चित्र तातडीने रंगमंचावर आणणे ही नाटकाची आणखी एक खासीयत.

विठ्ठल विठ्ठल, वारी यांसारख्या ग्रामीण नाटकांतून काही कलाकारांनी आत्मा, देह आणि जीवन प्रवास यांचा आध्यात्मिक संदर्भ मांडत मानवी अस्तित्व, बदल, विस्थापन निसर्गाशी नाते, स्मृती, ओळख आणि सांस्कृतिक वारसा यांच्या बहुआयामी विचारांचं सादरीकरण केलं. नाट्य अंतर्गत सजावट कलाकारांनी निसर्गाशी एकात्म साधणाऱ्या वस्तू, रचना, नैसर्गिक प्रकाश आणि पर्यावरण या घटकांचा उपयोग करून अंतर्गत सजावटीद्वारे मानसिक शांततेचे अधिष्ठान निर्माण केले. ग्रामीण घर, जुना वाडा तमाशाचा फड या प्रतिमांच्या संकल्पना मधून थेटर ही केवळ वास्तू नसून भावनिक भूगोल आहे हे स्पष्ट झालं. पडद्यांच्या रिकाम्या भिंती आणि उघड्या चौकटी विस्थापनाची जाणीव अधिक तीव्र करत होती. थेटर आणि भूमिका यातील संवादातून उंचावलेला परंतु प्रेक्षकांशी जोडलेला अनुभव प्रत्येक कलाकृतीतून स्पष्टपणे जाणवत होता. स्मृती आणि रूपांतरणाचा ठसा मानलेल्या ग्रामीण कलाकारीच्या गंजलेल्या पृष्ठभागात काळाची नोंद अधोरेखित झाली.

माझ्या माहितीत गावी १९७८ पूर्वी स्त्री कलावंतांची पात्रे पुरुषच करायचे. अंधश्रद्धा, संशय, गैरसमज यातून अनेक अपवृत्तींचा शिरकाव व्हायचा. आसुरी गावकीच्या स्पर्धेचे थोडेफार ग्रहण रंगभूमीला लागत असायचे तरीही खांद्यावर उचलून कला-पथकांचा सांभाळ करण्याची दिलेरी त्यावेळी काही लोकांमध्ये लख्खपणे जाणवायची. आजवर जपलेल्या सत्व आणि तत्वांच्या भरवशावर गावागावातील नाट्यकला जपावी, कलाकारांना नवी ऊर्जा मिळावी हीच अपेक्षा ठेवून तिचा अस्सल पोत सांभाळावा म्हणून आज ग्रामीण रंगभूमीचे अध्यक्ष राजन पांचाळ, सल्लागार प्रचित पानकर, केळुस्कर सर गावोगावी जाऊन या चळवळीनं वर्तमानाची दखल घेतली. आदर्शांचे विस्मरण संस्कृती धाराशाही करणारे असते. छोटे-छोटे कलाकार जपले तेव्हाच ग्रामीण नाट्यकलेचा वेलू मोठा झाला. वाचाळता नव्हे तर कृती हाच तर ग्रामीण रंगभूमीचा खरा सांगावा धाडला आणि अंतिम झेप यशस्वी ठरली आहे.ग्रामीण कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी सागर नार्वेकर,संकल्प केळकर, जितेंद्र कुमार, तन्वी भविष्य घडविणाऱ्या वर्तमानाचा गौरव करुन, नाट्यसंस्कृतीचा पुनराविष्कार घडवून इतिहास, परंपरा आणि आधुनिकता यांचा संवाद प्रभावीपणे अधोरेखित केला आहे. नाट्य संस्कृतीचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अशा प्रकारच्या नाट्यमहोत्सवांचा नक्कीच उपयोग होईल. ●●

'एक दिन' जपानमध्ये...

१ मे २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या 'एक दिन' या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान एका रोमँटिक गाण्याचे आणि साई पल्लवीच्या संथ नृत्याचे शूटिंग जपानमधील सप्पोरो येथील बर्फाच्छादित डोंगराळ भागात हाडे गोठवणाऱ्या थंडीत करायचे होते. नृत्याची कोरिओग्राफी अगदी सोपी असली खरी अडचण निसर्गाची होती. प्रचंड बर्फवृष्टी आणि थंडीत नाचताना तिचे पाय पूर्णपणे सुन्न झाले होते. एका शॉटमध्ये तिला बर्फावर फिरून पोझ घ्यायची होती, पण पाय गोठल्यामुळे तिचा तोल गेला आणि ती थेट मऊ बर्फाच्या ढिगाऱ्यात घसरली. सुदैवाने साई पल्लवीला दुखापत झाली नाही. या अनपेक्षित पडण्यानंतरही तिने न डगमगता बर्फातूनच हसत कॅमेऱ्याकडे पाहिले. दिग्दर्शकाला तिचा तो नैसर्गिक हसण्याचा क्षण इतका आवडला की त्याने तो अविस्मरणीय किस्सा चित्रपटात तसाच ठेवला.



'तू चाल पुढं' आता रंगमंचावर

'तू चाल पुढं' ही मराठी मालिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली होती. आता ही मालिका संपली असली तरी अनेक प्रेक्षकांच्या अजूनही स्मरणात आहे. तीच कथा रंगमंचावर सादर झाली तर? प्रेक्षकांची ही इच्छा लवकरच पूर्ण होणार आहे. प्रसाद ओक यांचे दिग्दर्शन आणि भरत जाधव व विशाखा सुभेदार यांच्या मुख्य भूमिका असलेले हे नाटक लवकरच व्यावसायिक रंगमंचावर आणले जात आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात या नव्या नाटकाचे प्रयोग रंगणार असून, हे एक दर्जेदार कौटुंबिक आणि भावनिक नाटक असेल. भरत जाधव आणि विशाखा सुभेदार यांच्यातील उत्कृष्ट कॉमिक टाइमिंग आणि अभिनय या नाटकाचे मुख्य आकर्षण आहे.

या नाटकाच्या एका महत्त्वाच्या रंगीत तालमीदरम्यान एक अतिशय मजेशीर प्रसंग घडला. एका गंभीर आणि भावनिक दृश्याचे सादरीकरण सुरू असताना, अभिनेत्री विशाखा सुभेदार पात्राचे संवाद विसरल्यामुळे चुकून त्यांच्या घरच्या किराणा मालाची यादीच मोठ्याने वाचू लागल्या. गंभीर दृश्यात अचानक 'डाळ, तांदूळ आणि साखर' ऐकल्यामुळे भरत जाधव यांच्यासह रंगमंचावरील आणि बॅकस्टेजचे सर्वच कलाकार हसून लोटपोट झाले. हा किस्सा या नाटकाच्या टीमसाठी कायमचा संस्मरणीय ठरला आहे.

स्पायडर-नोयर न्यूयॉर्कला वाचवणार?

१९३० च्या दशकातील न्यूयॉर्कच्या पार्श्वभूमीवर बेन रॅयली हा एकाकी आणि वयस्कर गुप्तहेर स्वतःच्या भूतकाळाशी झगडत, शहराला गुन्हेगारीच्या विळख्यातून वाचवण्यासाठी 'स्पायडर-नोयर' बनून सुपरहिरोच्या रूपात पुन्हा उभा राहतो, हा या ॲक्शन थ्रिलर सीरिजचा मुख्य विषय आहे. ॲमेझॉन एमजीएम स्टुडिओज निर्मित आणि स्टीव्ह लाइटफूट दिग्दर्शित ही बहुप्रतीक्षित सीरिज २७ मे २०२६ रोजी प्राईम व्हिडिओ' या प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होत आहे. यात मुख्य भूमिकेत निकोलस केज (बेन रॅयली) असून, त्याला लैमोर्न मॉर्रिस, अब्राहम पॉपुला आणि ली जु ली यांची सहाय्यक कलाकार म्हणून उत्तम साथ लाभली आहे.

१९३० च्या न्यूयॉर्कचा हुबेहूब लूक देण्यासाठी लॉस एंजेलिसमधील डाउनटाउन भागात भव्य सेट्स उभारण्यात आले होते, तसेच निऑन-नुआर शैलीसाठी रात्रीचे शूटिंग जास्त झाले. चित्रीकरणादरम्यान एक रोमहर्षक किस्सा घडला; एका धावपळीच्या सीनमध्ये स्वतः स्टंट करताना निकोलस केजच्या मनगटाला दुखापत झाली, तरीही वेदना सहन करत सीन पूर्ण करून तो म्हणाला, स्पायडर-नोयर वेदनेतही पंचलाइन देतो. तसेच, थंडीमुळे धुक्याचे मशीन बंद पडल्यावर सर्व क्रूने तोंडाने फुंकर मारून धुक्याचा अनोखा इफेक्ट तयार केला, ज्याचा मजेशीर व्हिडिओ सेटवर कमालीचा व्हायरल झाला.





बालांगण



हा आहे दोन्हीतला फरक

रस्त्यावरून प्रवास करताना आपल्याला फ्लायओव्हर आणि ओव्हरब्रिज असे शब्द अनेकदा ऐकायला मिळतात. बऱ्याच वेळा आपण हे दोन शब्द एकच समजतो आणि फरक न जाणून घेता त्यांचा वापर करतो. पण तुम्हाला माहिती आहे का की, उड्डाणपूल आणि ओव्हरब्रिज या शब्दांचा अर्थ वेगवेगळा असून वेगवेगळ्या गरजांनुसार ते बांधले जातात? चला, आज याविषयी जाणून घेऊ या.

❊ उड्डाणपूल म्हणजे काय?

उड्डाणपूल हा एक प्रकारचा पूल असून तो रस्ते किंवा रेल्वे रुळांवर बांधला जातो. त्याचा मुख्य उद्देश कोणत्याही अडथळ्याशिवाय वाहतूक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे हा असतो. वर्दळीच्या चौकातून बरीच वाहने येत-जात राहतात. अशावेळी उड्डाणपूल बांधला तर काही वाहने खाली रस्त्यावरुन धावतात आणि काही वाहने उड्डाणपूलावरून जातात. यामुळे चौकात वाहतूक कोंडीची समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होते. उड्डाणपूल सहसा लांब पल्ल्याच्या वाहतुकीसाठी बांधले जातात. ते शहरांमध्ये किंवा बाहेरील भागात असू शकतात. वाहने जलद आणि सुरक्षितपणे जाऊ शकतील, अशाप्रकारे त्याची रचना केली जाते.

महत्त्वाचे काही...

❊ ओव्हरब्रिज म्हणजे काय?

ओव्हरब्रिज हा देखील एक प्रकारचा पूलच आहे, परंतु त्याचे मुख्य काम पादचाऱ्यांना किंवा कमी वेगाने जाणाऱ्या वाहनांना रस्ता किंवा रेल्वे मार्गावरून मार्ग उपलब्ध करून देणे हे असते. तुम्ही अनेकदा रेल्वे स्थानकांजवळ पादचाऱ्यांसाठी बांधलेले पूल पाहिले असतील. ते ओव्हरब्रिज असतात.

ओव्हरब्रिजचा उद्देश सुरक्षितता सुनिश्चित करणे हा असतो. हे पूल वर्दळीचे रस्ते किंवा धोकादायक रेल्वे रुळ ओलांडण्याचे टाळण्यासाठी कामी येतात. ओव्हरब्रिज सामान्यतः उड्डाणपुलांपेक्षा लहान असतात आणि पादचाऱ्यांना आणि सायकलस्वारांना सामावून घेण्यासाठी डिझाइन केलेले असतात.

बिस्मथ

बिस्मथ हे एक वेगळे आणि उपयुक्त धातू खनिज आहे. त्याचा रंग चंदेरी पांढरा असतो. पण ते हवेत राहिले की त्यावर गुलाबी, निळे किंवा हिरवट चमकदार रंग दिसू शकतात. हे खनिज शिसे, तांबे, टिन किंवा जस्त यासारख्या खनिजांबरोबर मिसळलेले आढळते. जगात चीन, मेक्सिको, बोलिव्हिया आणि पेरू या देशांमध्ये बिस्मथ मोठ्या प्रमाणात मिळते. भारतात बिस्मथ फार मोठ्या प्रमाणात सापडत नाही, पण राजस्थान, झारखंड आणि काही धातू खाणींमध्ये इतर खनिजांबरोबर थोड्या प्रमाणात मिळते. बिस्मथ शुद्ध करण्यासाठी खडकांमधून धातू वेगळे केले जातात. प्रथम खडक मोडून त्यावर उष्णतेची प्रक्रिया केली जाते. त्यानंतर वेगवेगळे धातू वेगळे केले जातात. त्यामुळे बिस्मथ अधिक स्वच्छ करून शुद्ध स्वरूपात मिळवता येते. ही प्रक्रिया कारखान्यांमध्ये केली जाते.

खनिजांची माहिती

पोटदुखी, अजीर्ण किंवा जुलाब यासाठी दिल्या जाणाऱ्या काही औषधांमध्ये बिस्मथचे काही घटक वापरले जातात. त्यामुळे पोटाला आराम मिळण्यास मदत होते. बिस्मथचा उपयोग सौंदर्यप्रसाधने, रंग आणि काही विशेष धातूची मिश्रणे तयार करण्यासाठी होतो. काही यंत्रांमध्ये आणि सुरक्षिततेसाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणांमध्येही बिस्मथचा उपयोग केला जातो. बिस्मथ तुलनेने लवकर वितळते. त्यामुळे आग लागल्यावर आपोआप काम करणाऱ्या काही सुरक्षितता उपकरणांमध्ये ते वापरले जाते.



बिस्मथला इतर जड धातूंइतके विषारी मानले जात नाही. त्यामुळे काही ठिकाणी शिस्याऐवजी बिस्मथचा वापर केला जातो. बिस्मथ हे कमी परिचित पण उपयुक्त खनिज आहे. औषधे, उद्योग, सौंदर्यप्रसाधने आणि सुरक्षितता उपकरणांमध्ये त्याचा उपयोग होत असल्यामुळे त्यालादेखील महत्त्व आहे.

पोटात कावळे का ओरडतात?

कधीकधी अचानक तुमच्या पोटातून आवाज येता का? पोटात गुडगुड वाजते का? थोडक्यात पोटात कावळे ओरडतात का? खरंतर सगळ्यांनाच कधी ना कधी हा अनुभव येत असतो. म्हणूनच यामागील कारण आज जाणून घेऊ या.



हे होते कशामुळे?

मुलांनो, पोटातून येणारा हा आवाज भूक लागल्याचे लक्षण आहे. पोट रिकामे असते तेव्हा स्नायू आकुंचन पावतात. यामुळे आतील वायू आणि पचन द्रव बाहेर काढता येतो. स्नायूंच्या या हालचालीमुळे पोटातून आवाज येतो. या प्रक्रियेला 'पेरिस्टॅलिसिस' म्हणतात. ही हालचाल नेहमीच सुरू असली तरी पोट रिकामे असताना आवाज अधिक मोठा येतो. रिकाम्या पोटी स्नायू आकुंचन पावतात तेव्हा या हालचालीमुळे निर्माण होणारा आवाज मोठ्याने बाहेर येतो. यामध्ये भूक लागण्याचे संप्रेरक 'घ्रेलिन' देखील भूमिका बजावते. घ्रेलिन भूकेचा हार्मोन असून तो शरीराला अन्नाची गरज असल्याचे संकेत देतो. स्वाभाविकच पोट रिकामे होताच या हार्मोनची पातळी वाढते. यामुळे पोटाचे स्नायू जलद आकुंचन पावतात. म्हणूनच गुरगुरण्याचा आवाज अधिक मोठा होतो.

हा आवाज कमी करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे काहीतरी खाणे. खाल्ल्याने हा आवाज ताबडतोब कमी होतो. अर्थात पोटाच्या स्नायूंची हालचाल सुरूच राहते.

गुणकारी अंजीर

खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि अयोग्य जीवनशैलीमुळे अनेकजण अनेक प्रकारच्या आजारांना बळी पडतात. आजार जडल्यास डॉक्टरांकडे जावे लागते. औषधे घ्यावी लागतात. हे टाळण्यासाठी तुम्ही आत्तापासून आहाराकडे लक्ष द्यायला हवे. निरोगी राहण्यासाठी तुम्ही सुका मेवा खायला हवा. तुमच्यापैकी अनेकांना तो आवडतही असेल. मुलांनो, सुकामेवा खाण्याचे बरेच लाभ मिळतात. पण तुम्हाला माहिती आहे का, की एक असेही ड्रायफ्रूट आहे हे भिजवलेले पाणी प्याल्यास अनेक समस्यांपासून मुक्तता मिळू शकते. हो, आपण अंजीरांबद्दल बोलत आहोत. अंजीरमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, कॅल्शियम, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन के, फायबर, प्रथिने, जस्त आणि लोह यासह अनेक पोषक घटक आढळतात. म्हणूनच अंजीर पाण्यात भिजवून ते पाणी पिल्यास शरीराला अनेक महत्त्वपूर्ण घटक मिळतात.

माहिती आहे?

अंजीरचे पाणी पिल्याने पचनसंस्था चांगली कार्य करते. यामुळे अन्न सहज पचते. हे पाणी डिटॉक्स ड्रिंकसारखे काम करते. दररोज सकाळी रिकाम्या पोटी अंजीर भिजवलेले पाणी प्यायल्याने दिवसभर ऊर्जावान वाटू शकते. त्यात नैसर्गिक साखर असल्यामुळे विशेष लाभ होतो.

संवाद वाढवा, मैत्र जोडा



अनेकांना नवीन व्यक्तीशी बोलताना थोडेसे घाबरायला होते. आजूबाजूला कोणी अनोळखी असेल तर अस्वस्थ वाटते आणि संभाषण सुरू करण्यास अडचण येते. तुम्हालाही असे होते का? होत असेल तरी घाबरु नका. ही एक सामान्य समस्या आहे आणि काही सोप्या टिप्सच्या मदतीने तुम्ही हा संकोच दूर करू शकता. चला जाणून घेऊ या.

मुलांनो, गोड हास्य हा कोणाशीही संभाषण सुरू करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. तुम्ही एखाद्या अनोळखी व्यक्तीकडे बघून हसता तेव्हा मैत्रीपूर्ण असल्याचे दाखवता. तुम्ही त्यांच्याकडे लक्ष देत आहात आणि तुम्हाला त्यांच्याशी बोलायचे आहे, हे या कृतीतून तुम्ही दाखवता आणि संभाषण सुकर होते.

तुम्ही छोटासा प्रश्न विचारूनही सहजपणे संभाषण सुरू करू शकता. प्रश्न विचारल्याने समोरच्या व्यक्तीला बोलावेसे वाटते आणि तुमची भीतीही कमी होते. तुम्हाला चांगले बोलायचे असेल तर आधी चांगले ऐकले पाहिजे. म्हणूनच कोणी तुमच्याशी बोलत असेल तर ते काय म्हणत आहेत याकडे लक्ष द्या.

कसे वागावे?

संबंधित प्रश्न विचारा. यावरून या व्यक्तीला आपल्या बोलण्यात खरोखर रस आहे आणि तुम्ही ते महत्त्वाचे मानता, असे समोरच्या व्यक्तीला कळते. लक्षपूर्वक ऐकल्याने संभाषण सुरू राहते आणि मैत्री वाढते.

आत्मविश्वासाचा तुमच्या संभाषणावर खूप मोठा प्रभाव पडतो. त्यामुळेच थोडे घाबरले असाल तरी आनंदी दिसण्याचा प्रयत्न करा आणि तुमचा स्वतःवर विश्वास आहे हे दाखवा. सरळ उभे राहा, स्पष्ट बोला. आवाज उत्साही ठेवा. लक्षात ठेवा, प्रत्येकजण कधी ना कधी अनोळखी असतो आणि बहुतेक लोकांना नवीन लोकांना भेटणे आणि त्यांच्याशी बोलणे आवडते. तेव्हा तुम्हीही मैत्रीसाठी हात पुढे करा.

माणूस विचार करतो म्हणजे नेमके काय करतो?

माणूस शरीराने फार ताकदवान नाही. तो ना सिंहासारखा शक्तिशाली आहे. ना पक्ष्यांसारखा उडू शकतो. तरी तो इतका प्रगत झाला. कारण त्याच्याकडे काही खास गुण आहेत. सर्वात मोठा गुण म्हणजे प्रगत मेंदू. माणूस विचार करू शकतो. योजना आखू शकतो. नवीन उपाय शोधू शकतो. त्यामुळे त्याने साधने तयार केली. दगडापासून सुरुवात करून आजच्या मशीनपर्यंत. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे माणूस आपले विचार इतरांना सांगू शकतो. ज्ञान पुढच्या पिढीकडे देऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक पिढी मागच्या पिढीपेक्षा जास्त शिकत गेली.

रंजक विज्ञान

माणूस एकटा राहत नाही. तो समाज बनवून राहतो. तो एकत्र काम करतो. शिकार, शेती, बांधकाम सगळे काही तो इतरांना सोबत घेऊन करतो. माणसाने निसर्ग समजून घेतला आणि त्यावर नियंत्रण मिळवले. आग, शेती, औषधे, तंत्रज्ञान निर्माण केले. इतर प्राण्यांची कमजोरी हेरून त्यांना वश केले. त्यांच्याकडून कामे करून घ्यायला सुरुवात केली आणि प्रगती करत राहिला. शरीराने कमजोर असला तरी मेंदू, भाषा आणि एकत्र काम करण्याची क्षमता यामुळे माणूस सर्वात प्रगत झाला. माणसाचा मेंदू एकदम मोठा झाला नाही, तर हळूहळू लाखो वर्षांमध्ये विकसित झाला. माणूस विचार करतो म्हणजे त्याचा मेंदू माहितीवर काम करत असतो. आपण काही पाहतो, ऐकतो किंवा अनुभवतो तेव्हा ती माहिती मेंदूकडे जाते. मेंदू त्या माहितीची तुलना आपल्या आधीच्या अनुभवांशी करतो, आठवणी काढतो आणि मग निर्णय घेतो. उदाहरणार्थ, गरम वस्तूला हात लावायचा का नाही हे आपण विचार करून ठरवतो. यामध्ये मेंदू हे धोकादायक आहे अशी माहिती देतो आणि आपण हात मागे घेतो. विचार करताना मेंदूमध्ये न्यूरॉन्स एकमेकांना संदेश पाठवतात. हे संदेश अतिशय वेगाने जातात. त्यामुळे आपण पटकन उत्तर देऊ शकतो. प्रश्न सोडवू शकतो किंवा कल्पना करू शकतो. विचार करणे म्हणजे मेंदूने माहिती समजून घेणे, तुलना करणे आणि योग्य निर्णय घेणे. यामुळेच माणूस शिकतो, नवीन गोष्टी शोधतो आणि पुढे जातो. इतर प्राणीही काही प्रमाणात विचार करतात. पण त्यांचा विचार जगण्यापुरता मर्यादित असतो. माणसाचा विचार मात्र अधिक पुढचा असतो. तो कल्पना करू शकतो, भविष्याचा विचार करू शकतो आणि नवनवीन शोध लावू शकतो.



बर्फ आणि आगीची अद्भूत नदी

वॅटनायोकुल ही आइसलँडच्या दक्षिण-पूर्व भागातील प्रसिद्ध हिमनदी आहे. ती युरोपमधील सर्वात मोठ्या हिमनद्यांपैकी एक मानली जाते. ती आइसलँड देशाच्या ८ टक्के भागावर पसरलेली आहे. काही ठिकाणी या नदीतील बर्फाची जाडी ९०० मीटरपेक्षा जास्त आहे. स्थानिक भाषेत वॅटनायोकुलचा अर्थ साधारण तलावांची हिमनदी असा होतो. या हिमनदीतून अनेक नद्या उगम पावतात आणि त्या आसपासच्या भागाला पाणी पुरवतात.

या हिमनदीची सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे तिच्या खाली ज्वालामुखी आहेत. त्यात ग्रिम्सव्हॉटन,बार्दरबुंगा आणि ओरायफायोकुल हे प्रमुख ज्वालामुखी आहेत. ज्वालामुखीच्या उष्णतेमुळे खालचा बर्फ वितळतो. आत मोठे पाणीसाठे तयार होतात आणि अचानक प्रचंड पूर येतो. आइसलँडमध्ये या प्रकारच्या पुराला योकुलह्लौप असे म्हणतात. ही हिमनदी सतत हलत असते. त्यातील बर्फ खूप हळूहळू पुढे सरकत राहतो. त्यातून सुंदर निळ्या बर्फाच्या गुहा तयार होतात. दरवर्षी हजारो पर्यटक त्या पाहायला जातात. काही भाग तर एखाद्या बर्फाच्या राजवाड्यासारखे सुंदर दिसतात. वर प्रचंड हिमनदी आणि खाली ज्वालामुखीमुळे ती जगातील सर्वात अद्भुत नैसर्गिक चमत्कारांपैकी एक आहे. खूप थंडी, बर्फ आणि कठीण हवामान यामुळे या हिमनदीवर कोणी राहू शकत नाही. मात्र हिमनदीच्या आजूबाजूच्या भागात छोटी गावे आणि लोकवस्ती आहे. लोक मुख्यतः मासेमारी, पर्यटन आणि शेतीशी संबंधित कामे करतात. पर्यटक, शास्त्रज्ञ आणि गिर्यारोहक मात्र तिथे काही दिवसांसाठी जातात. या हिमनदीतून निघणाऱ्या नद्यांमुळे पुढे अनेक धबधबे तयार होतात. बर्फ वितळून तयार झालेले पाणी वेगाने खाली येते. त्यामुळे आइसलँडमध्ये खूप सुंदर धबधबे दिसतात. स्वार्टिफोस हा धबधबा काळ्या ज्वालामुखी खडकांमुळे प्रसिद्ध आहे तर डेट्टीफोस हा युरोपमधील सर्वात शक्तिशाली धबधब्यांपैकी एक मानला जातो. स्काफ्टाफोस हा अत्यंत सुंदर धबधबा आहे आणि ते पर्यटकांचे आवडते ठिकाण आहे.

गोष्टी नद्यांच्या



गावाची गोडी वाढवा




मित्रांनो, 'गावाकडे चला' असं गांधीजी म्हणाले होते. गावाला गेल्यावर किती बरं वाटतं. गावात फार गर्दी नसते, प्रदूषण नसतं. गावातली नदी, हिरवळ, शेणाने सारवलेलं घर, शेती हे सगळं हवंहवंसं वाटतं. काही दिवस गावाला जाऊन आल्यावर कसं ताजंतवानं वाटतं. गावच्या हवेत ही जादू असते मित्रांनो. भारताच्या ग्रामीण भागात बरंच काही घडत असतं. इथलं वातावरण, जगणं सगळंच वेगळं असतं. शहरातल्या जीवनासारखी धामधूम इथे नसते. या सगळ्याचा अभ्यास करून तुम्ही करीअर घडवू शकता. 'बॅचलर ऑफ रूरल स्टडीज' हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही ग्रामीण जीवनाकडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघू शकता.

या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातलं जीवन तुम्हाला अगदी जवळून पाहता येईल. विकासकामांमध्ये सहभागी होता येईल. भारताच्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास होणं गरजेचं आहे. यात तुमचा हातभार लागू शकतो. शेती, सामाजिक विकास, पशुपालन, जंगलांचा विकास, पर्यावरणाचं व्यवस्थापन संबंधित विविध विषयांचा या अभ्यासक्रमात समावेश असतो. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या विविध संधी उपलब्ध होतात. सरकारी, खाजगी तसंच सार्वजनिक क्षेत्रात तुम्ही काम करू शकता.

कोण होणार? अशा विविध आघाड्यांवर तुम्ही काम करू शकता.

स्मार्ट टिप्स



अशी थांबवा उचकी

दोस्तांनो, उचकी लागली की खूप अस्वस्थ वाटतं. उचकी लागल्यावर आपण घटाघट पाणी पितो. आपल्याला वर बघायला सांगितलं जातं. उचकी थांबवण्यासाठी काही घरगुती उपायही करता येतील. उचकी लागल्यावर साखर खा. पाण्यात थोडं मीठ घालून प्या. घोट घोट पाणी प्या. हळूहळू श्वास घ्या. यामुळे बरं वाटेल.

ट्राय इट

चविष्ट पिटा पिझ्झा



मित्रांनो, पिझ्झा खायला कोणाला आवडत नाही? तुम्ही घरच्या घरी मस्त पिझ्झा बनवू शकता. यासाठी पिटा ब्रेड, स्पॅगेटी सॉस आणि मोझरेला चीज असं साहित्य लागेल. सर्वात आधी पिटा ब्रेड घ्या. त्यावर स्पॅगेटी सॉस पसरवा. थोडं चीज सॉसच्या वर पसरवा. आता हा ब्रेड ओव्हनमध्ये ठेवा. मिनिटभर बेक करा आणि खा. संध्याकाळी काय खायचं असा प्रश्न पडत असेल तर पिटा पिझ्झा हा स्मार्ट ऑप्शन आहे.

प्राणीजगत



असा आहे ॲनाकोंडा

ॲनाकोंडा हा साप असून तो ॲमेझॉनच्या जंगलात आढळतो. ग्रीन ॲनाकोंडा हा जगातला सर्वात मोठा साप आहे. त्याची लांबी जवळपास २० फूट असते. तसंच हा सर्वात वजनदार साप आहे. तो दक्षिण अमेरिकेत आढळतो.

वाचा तर खरं

वाढतायंत चक्रीवादळं



दोस्तांनो, जगभरातच अनेक वादळं येत असतात. १९७० मध्ये पूर्व पाकिस्तान म्हणजे आजच्या बांग्लादेशमध्ये 'भोला' नावाचं वादळ आलं होतं. या वादळाने बरंच नुकसान केलं होतं. १९९१ मध्ये बांग्लादेशमध्ये 'मेरियन' नावाचं वादळ आलं होतं. १९७४ च्या 'नीना' या वादळानेही कहर केला होता. अशा नैसर्गिक आपत्ती कमी करण्यासाठी आपण पर्यावरणाचा विचार करायला हवा.

निवडक

सुभाष पाटील स्पर्धा प्रमुखपदी

चिरनेर : इंटरनॅशनल इनडोअर स्टेडियम हल्दवानी नैनिताल येथे उत्तराखंड तायकवांडो असोसिएशन व तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित ओपन राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धा २९ ते ३१ मे २०२६ रोजी होणाऱ्या स्पर्धेसाठी रायगडचे सुपुत्र तायक्वांदोचे आंतरराष्ट्रीय पंच व ७ वी डिग्री ब्लॅक बेल्ट यांची यांची तायकवोंडो खेळात निस्वार्थी तायकवोंडो राष्ट्रीय स्पर्धे साठी स्पर्धा प्रमुख म्हणुन निवड झाली आहे तसेच रायगडचे सुपुत्र सुभाष पाटील यांची तायक्कांदो खेळात निस्वार्थीपणे पंच प्रशिक्षक म्हणुन देशात व परदेशात आतापर्यंत करत आलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत व त्यांच्या अनुभवाचा फायदा खेळाडू, प्रशिक्षक व पंच यांना व्हावा व भविष्यात देशातुन उत्कृष्ट पंच प्रशिक्षक व खेळाडू तयार होतील म्हणून देशातील या खेळाची अधिकृत शिखर संघटना तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांनी सुभाष पाटील यांची हल्दवानी नैनिताल येथे होणाऱ्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धा प्रमुखपदी नेमणूक केली आहे. राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल रायगड तायक्कांदो असोसिएशन, तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र पदाधिकारी, प्रशिक्षक व तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


सिंगापूर ओपनमध्ये भारताचा डंका!

सिंगापूर : दोन ऑलिम्पिक पदकविजेती पी.व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन या आघाडीच्या भारतीय बॅडमिंटनपटूंनी सिंगापूर खुल्या स्पर्धेच्या (सुपर ७५० दर्जा) उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले. पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीनेही आगेकूच सुरू ठेवली. एचएस प्रणॉयला मात्र पराभवाचा सामना करावा लागला. सिंधूने महिला एकेरीच्या लढतीत जपानच्या रिको गुंजीला २१-९, २१-१२ असे पराभूत केले. पुरुष एकेरीत दुसऱ्या मानांकित कुनलावुत विदितसर्नने माघार घेतल्याने लक्ष्यला उपांत्यपूर्व फेरीत चाल मिळाली. पहिल्या गेममध्ये लक्ष्यने दोन गुणांची आघाडी घेतली. मात्र, कुनलावुतने सामना सोडण्याचा निर्णय घेतला. प्रणॉयला चुरशीच्या लढतीत सिंगापूरच्या लोह कीन यूकडून १८-२१, २१-१६, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला. पुरुष दुहेरीत सात्विवक-चिराग जोडीने ली झे हुइ आणि यांग पो सुआन जोडीला २१-१५, ११-२१, २१-१८ असे पराभूत केले.

आयपीएलमध्ये गॉगल वापरावर बंदी

नवी दिल्ली : आयपीएलमध्ये अत्याधुनिक संवाद उपकरणांच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसाठी नवी ॲडव्हायजरी जारी करण्यात आली आहे. स्मार्ट ग्लासेस, सनग्लासेस आणि गॉगल्सच्या वापराबाबत कडक सूचना देण्यात आल्या आहेत. भ्रष्टाचारविरोधी आणि सुरक्षा विभागाने बीसीसीआयसोबत विशेष माहिती शेअर केली आहे. त्यामध्ये काही कंपन्या टी-२० लीगमध्ये सहभागी असलेल्या खेळाडू आणि संघ अधिकाऱ्यांना विशेष उपकरणे विकण्याचा प्रयत्न करत असल्याचे सांगण्यात आले आहे.आयसीसीने बीसीसीआयला सांगितले आहे की, ही स्मार्ट आयवेअर उपकरणे लाईव्ह स्ट्रीमिंग, टेक्स्ट मेसेज पाठवणे तसेच वाय-फाय किंवा मोबाईल डेटाच्या मदतीने ऑडिओ-व्हिडिओ कॉल करण्यास सक्षम आहेत. त्यामुळे सामन्यादरम्यान या उपकरणांचा गैरवापर होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. एका सूत्राच्या हवाल्याने वृत्तपत्राने म्हटले आहे, वेअरेबल तंत्रज्ञान अधिकाधिक प्रगत होत आहे. त्यामुळे गुप्त संवादाच्या पद्धतींबाबत चिंता वाढली आहे. बीसीसीआयची ही ताजी कारवाई लीगच्या पारदर्शकतेला धोका निर्माण करणाऱ्या बाबींवर सातत्याने लक्ष ठेवले जात असल्याचे दर्शवते. लीगवरील देखरेख आणखी वाढवण्यात आली आहे, कारण याच महिन्याच्या सुरुवातीला बीसीसीआयने आठ पानी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती. त्यामध्ये खेळाडू, संघ मालक आणि अधिकाऱ्यांकडून झालेल्या गंभीर प्रोटोकॉल उल्लंघनाच्या घटनांचा उल्लेख करण्यात आला होता.





श्याम लाल मीना यांचे निधन

नवी दिल्ली : भारतीय तिरंदाजीचे प्रणेते श्याम लाल मीना यांचं प्रदीर्घ आजारानंतर वयाच्या ६१व्या वर्षी निधन झालं. श्याम लाल मीना गेल्या काही वर्षांपासून यकृताच्या समस्येनं त्रस्त होतं. त्यांच्या निधनानं भारतीय तिरंदाजीच्या इतिहासातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा अंत झाला आहे. भारतीय तिरंदाजी संघटनेनं या माजी तिरंदाजाचा फोटो सोशल मीडियावर पोस्ट करत लिहिलं, १९८८ च्या सेऊल ऑलिम्पिकमध्ये भारताचं प्रतिनिधित्व करणारे ऑलिम्पियन आणि अर्जुन पुरस्कार विजेते दिवंगत श्याम लाल मीना यांना श्रद्धांजली. भारतीय तिरंदाजीतील त्यांचं योगदान आणि वारसा नेहमीच आदरानं स्मरणात राहील. ४ मार्च १९६५ रोजी राजस्थानच्या बांसवाडा जिल्ह्यातील केवडिया गावात जन्मलेल्या मीना यांनी सामान्य परिस्थितीतून पुढं येत जागतिक स्तरावर भारताचं प्रतिनिधित्व केलं. ते लिंबा राम आणि रजत हळदर यांच्यासह भारतीय पुरुष रिकर्व्ह संघाचा भाग होते, ज्या संघानं कोलकाता इथं १९८७ च्या आशियाई तिरंदाजी चॅम्पियनशिपमध्ये कांस्य पदक जिंकलं होतं.हे पदक भारतीय तिरंदाजीचं पहिलं मोठं आंतरराष्ट्रीय यश मानलं जातं आणि यामुळं संघ १९८८ च्या सेऊल ऑलिम्पिकसाठी पात्र ठरला, जो ऑलिम्पिक तिरंदाजीमधील देशाचा पहिला सहभाग होता. भारतीय क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल मीना यांना १९८९ मध्ये अर्जुन पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

इंग्लंड टी-२० मालिका

भारतीय महिला संघाकडून इंग्लंड पराभूत

|| जेमिमा रॉड्रिग्स आणि यास्तिका भाटियाची अर्धशतके; पदार्पणात नंदिनीचे ३ बळी

। इंग्लंड । वृत्तसंस्था ।

चेम्सफोर्डमध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-२० मध्ये भारतीय महिला संघाने इंग्लंडचा ३८ धावांनी पराभव केला. भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. हरमनप्रीत कौरला विश्रांती देण्यात आली होती आणि स्मृती मंधाना कर्णधारपद भूषवत होती. भारताने ७ गडी गमावून १८८ धावा केल्या. प्रत्युत्तरात इंग्लंडला ८ गडी गमावून १५० धावाच करता आल्या. भारताकडून जेमिमा रॉड्रिग्सने ६९ आणि यास्तिका भाटियाने ५४ धावा केल्या. पदार्पणाचा सामना खेळणाऱ्या नंदिनी शर्माने ३ बळी घेतले.



नाणेफेक हरल्यानंतर फलंदाजीसाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. लॉरेन बेलने पहिल्याच षटकात स्मृती मंधाना आणि शेफाली वर्माला बाद करून भारताची धावसंख्या ७ धावांवर २ गडी अशी केली. यानंतर दोन वर्षांनंतर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतलेल्या यास्तिका भाटिया आणि जेमिमा रॉड्रिग्सने डाव सावरला.

एप्रिल २०२४ नंतर पहिला सामना खेळणाऱ्या यास्तिका भाटियाने आक्रमक फलंदाजी केली. तिने इसी वोंगच्या षटकात ४ चौकारांसह २७ धावा जमवल्या आणि सोफी एसलस्टोनवर षटकारही मारला. यास्तिकाने ३१ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण केले. जेमिमा आणि यास्तिकाने तिसऱ्या विकेटसाठी ७६ चेंडूंमध्ये १२६ धावा जोडून भारताला मजबूत स्थितीत आणले. लॉरेन बेलने इंग्लंडला सुरुवातीची यश मिळवून दिली. मात्र, खराब क्षेत्ररक्षणामुळे भारतीय फलंदाजांना धावा काढण्याची संधी मिळाली.

टिली कॉर्टिन-कोलमॅनच्या थ्रोवर यास्तिका धावबाद झाली, तर जेमिमा चार्ली डीनच्या चेंडूवर बाद झाली. शेवटच्या षटकांमध्ये ऋचा घोष आणि भारती फुलमाळी लवकर बाद झाल्या, पण दीप्ती शर्माच्या २२ धावांच्या खेळीमुळे भारताने मोठी धावसंख्या उभारली.

१८९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात खराब झाली आणि संघाने ३७ धावांवर २ विकेट गमावल्या होत्या. यानंतर एमी जोन्स आणि हीथर नाइट यांनी ६४ धावांची भागीदारी केली. एमी जोन्सने ४८ चेंडूत ६७ धावा केल्या, पण तिला दुसऱ्या टोकाकडून साथ मिळाली नाही. हीथर नाइट इंग्लंडकडून सर्व फॉरमॅटमध्ये सर्वाधिक ३१० सामने खेळणारी खेळाडू ठरली.

पदार्पण करणाऱ्या नंदनी शर्माने आपल्या पहिल्याच षटकात ३ विकेट घेतल्या. तिने एमी जोन्स आणि डॅनी गिब्सनला सलग चेंडूंवर शेफाली वर्माकरवी झेलबाद केले. नंदनी हॅट्ट्रिकवर होती, पण चार्ली डीनने पुढचा चेंडू रोखला.

यानंतर दोन चेंडूंनी नंदनीने इसी वोंगला बोल्ड करून सामना भारताच्या बाजूने फिरवला. इंग्लंड यानंतर पुनरागमन करू शकले नाही आणि भारताने ३८ धावांनी सामना जिंकला.

नहुष बोराडेला दिनेश लाड क्रिकेट फाऊंडेशनचा आधार

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील एकसल येथे राहणारा आणि वायएससीसी अकॅडमी कर्जत येथे क्रिकेटचे प्रशिक्षण घेणारा अवघ्या ६ वर्षांचा होतकरू क्रिकेटपटू नहुष बोराडे याच्या पुढील शिक्षणाची तसेच क्रिकेट प्रशिक्षणाची संपूर्ण जबाबदारी प्रसिद्ध क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांच्या क्रिकेट फाऊंडेशन तर्फे स्वीकारण्यात आली आहे.

भारतीय माजी कर्णधार रोहित शर्मा आणि शार्दूल ठाकूर यांसारखे उत्कृष्ट खेळाडू घडवणारे प्रशिक्षक म्हणून दिनेश लाड संपूर्ण देशभर ओळखले जातात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक युवा खेळाडूंनी क्रिकेट क्षेत्रात मोठे यश मिळवले आहे. लहान वयातच नहुषने आपल्या क्रिकेट कौशल्याची छाप पाडली असून त्याच्या जिद्द, मेहनत आणि खेळातील आवडीमुळे त्याची निवड फाऊंडेशनतर्फे करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील अनेक गुणवंत खेळाडूंना आर्थिक अडचणींमुळे योग्य संधी मिळत नाहीत. मात्र अशा परिस्थितीत दिनेश लाड क्रिकेट फाऊंडेशनने नहुषला दिलेला आधार हा प्रेरणादायी ठरत आहे. फाऊंडेशनतर्फे त्याच्या शैक्षणिक खर्चासोबतच व्यावसायिक क्रिकेट प्रशिक्षणासाठीही आवश्यक मदत केली जाणार आहे.



■ शिक्षण आणि प्रशिक्षणाची स्वीकारली जबाबदारी

याबाबत फाऊंडेशनच्या वतीने सांगण्यात आले की, गुणवंत खेळाडूंना योग्य दिशा आणि संधी मिळाली तर ते निश्चितच देशाचे नाव उज्ज्वल करू शकतात. नहुषमध्ये उत्कृष्ट क्रिकेट क्षमता असून त्याला सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.

यावेळी नहुष बोराडे याने दिनेश लाड आणि फाऊंडेशनचे आभार मानत, माझ्या क्रिकेट प्रवासासाठी मिळालेला हा मोठा आधार असून मी अधिक मेहनत घेऊन चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न करेन, अशी भावना व्यक्त केली. क्रिकेट क्षेत्रात अनेक यशस्वी खेळाडू घडवणाऱ्या प्रशिक्षकांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, युवा खेळाडूंना यामुळे नवी प्रेरणा मिळत आहे.

आयपीएलमध्ये मुंबईची हाराकिरी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

इंडियन प्रीमियर लीगचा सीझन अंतिम टप्प्यात आला आहे. या सीझनमध्ये मुंबई इंडियन्स संघाची कामगिरी काही फारशी चांगली झाली नाही. सतत होणारे पराभव, खेळाडूंच्या चुका, ढिसाळा फिल्डींग, यामुळे एकेकाळी ५ वेळा आयपीएलची ट्रॉफी जिंकणाऱ्या मुंबईच्या संघाचा यंदा अतिशय खराब परफॉर्मन्स दिसून आला. यामुळे संघ व्यवस्थापन नाराज असून त्याचा फटका आता कर्णधार हार्दिक पंड्याला बसू शकतो.

मुंबई इंडियन्सशी संबंधित तीन व्यक्तींनी सांगितलं की, हार्दिक पांड्याला कर्णधारपद सोडावं लागू शकतं.एवढंच नव्हे तर, मुंबई इंडियन्सचा पुढचा कर्णधार कोण होणार याबाबत फ्रँचायझीमध्ये चर्चा सुरू असल्याचेही या अहवालात म्हटले आहे. आता प्रश्न असा आहे की, हार्दिक पांड्याकडून कर्णधारपद काढून घेण्याच्या अफवा का वाढत आहेत? आयपीएल २०२६ च्या १० संघांच्या स्पर्धेत मुंबई इंडियन्स नवव्या स्थानावर होता, केवळ याच कारणामुळे हार्दिक पांड्याला कर्णधारपदावरून हटवले जाईल, की यामागे आणखी काही कारण आहे? संघामध्ये यावर चर्चा सुरू होती, असं एका सूत्राने सांगितलं.

पांड्याच्या कर्णधारपदाखाली मुंबई इंडियन्सने आयपीएलमध्ये खूपच खराब कामगिरी केली. आयपीएलच्या इतिहासातील या सर्वात यशस्वी संघाने साखळी फेरीतील १४ पैकी १० सामने गमावले. त्या १० पैकी आठ सामने हार्दिकच्या कर्णधारपदाखाली गमावले होते. दुखापतीमुळे हार्दिक आयपीएल २०२६ मध्ये चार सामने खेळू शकला नाही.

कुस्तीपटू विनेशला सर्वोच्च दिलासा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।

कुस्तीपटू विनेश फोगाटला सर्वोच्च न्यायालयाने २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचणीत सहभागी होण्यास परवानगी दिली आहे.

विनेशला चाचणीत भाग घेण्याची परवानगी देणाऱ्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला भारतीय कुस्ती महासंघाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे कुस्ती महासंघाला मोठा धक्का बसला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने विनेश फोगाटला तात्पुरता दिलासा दिला असला, तरी तिच्या सहभागाला आव्हान देणाऱ्या कुस्ती म हासंघाच्या याचिकेवर तिचे उत्तरही मागवले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने विनेशला या चाचणीत खेळण्याची परवानगी दिली असली, तरी कुस्ती म हासंघाच्या मुख्य याचिकेवर पुढील आठवड्यात सविस्तर सुनावणी घेण्याचे निश्चित केले आहे.

या प्रकरणात उच्च न्यायालयाने ज्या पद्धतीने हस्तक्षेप केला, त्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली. अशा क्रीडाविषयक बाबींमध्ये वारंवार आणि तातडीने होणारा न्यायालयीन हस्तक्षेप अडचणीचा ठरू शकतो, असे खंडपीठाने नमूद केले.

आरडीसीए आयोजित तेवीस वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धा

रोशन क्रिकेट अकॅडमी अजिंक्य

। रायगड । प्रतिनिधी ।

जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तेवीस वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रोशन क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाने अंतिम विजयी संघ होण्याचा मान मिळवला आहे. अतिशय अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात रोशन क्रिकेट अकॅडमी संघाने पेण स्पोर्ट्स असोसिएशन संघावर अवघ्या दोन धावांनी विजय मिळवत स्पर्धेची चॅम्पियनशिप पटकावली आहे.



पेण संघाला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. स्पर्धेच्या अंतिम सामना २७ मे रोजी पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर खेळविण्यात आला होता.अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करतांना रोशन क्रिकेट अकॅडमी संघाने ३८.४ षटकांमध्ये सर्व गडी गमावत २०४ धावा काढल्या त्यामध्ये विघ्नेश देशमुख यांनी सर्वाधिक ५० धावा काढल्या तर आर्यन पालांडे ३४ रॉबिन वेल २७ धावा काढून संघाला योगदान दिले.पेण स्पोर्ट्स कडून हारदेव सिंह यांनी ४ श्रवण वडे यांनी बहुमूल्य २ फलंदाज बाद केले. प्रतिउत्तर देताना पेण स्पोर्ट्स संघाने शेवटपर्यंत कडवी झुंज दिली,नील कोळी ५६ हर्ष म्हात्रे ३३ निखिल भोईर यांनी ३२ धावांची खेळी संघासाठी केली.

जिंकण्यासाठी शेवटच्या ३ धावा हव्या असताना संघाचे सर्व गडी बाद झाले. रोशन क्रिकेट अकॅडमीकडून कर्णधार यश झावरे यांनी ५ पार्थ केसकर ३ व रॉबिन वेल यांनी २ फलंदाज बाद करून संघाला विजय मिळवून दिला. स्पर्धेतील मालिकावीर म्हणून पेण स्पोर्ट्स संघाचा अष्टपालू खेळाडू श्रवण वडे, उत्कृष्ट फलंदाज करण बोराडे, उत्कृष्ट गोलंदाज ओम कांबळे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यश झावरे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे.

वर्ल्ड नंबर-१ सिनर फ्रेंच ओपनमधून बाहेर

। पॅरिस । वृत्तसंस्था ।

वर्ल्ड नंबर-१ आणि स्पर्धेतील टॉप सीड खेळाडू जॅनिक सिनर फ्रेंच ओपन २०२६ मधून बाहेर पडले आहेत. गुरुवारी खेळल्या गेलेल्या दुसऱ्या फेरीतील एका सामन्यात अर्जेंटिनाच्या खेळाडू जुआन मॅन्युअल सेरुंडोलोने सिनरला पाच सेटमध्ये हरवले. तर, सर्बियाचा दिग्गज टेनिसपटू नोव्हाक जोकोविचने फ्रेंच ओपनच्या तिसऱ्या फेरीत स्थान मिळवले आहे.

सिनरला तिसऱ्या सेटदरम्यान वैद्यकीय टाइमआउट घ्यावा लागला. सिनर ५-१ च्या आघाडीसह विजयापासून काही इंच दूर होता. याच दरम्यान त्याला चक्कर येणे आणि डिहायड्रेशन झाल्याची तक्रार झाली. तो रॅलीदरम्यान आपली मांडी पकडताना दिसला आणि त्याची हालचाल खूप मंदावली. सर्व्हिस गेममध्ये पिछाडीवर पडल्यानंतर सिनरने चेअर अंपायर आणि फिजिओचा सल्ला घेतला आणि वैद्यकीय टाइमआउट घेऊन काही वेळासाठी कोर्टबाहेर गेला.



मेडिकल ब्रेकनंतर परतल्यानंतर इटालियन खेळाडू पूर्णपणे अस्वस्थ दिसला. हालचाल अवरुद्ध झाल्यामुळे तो कोर्टवर नीट धावूही शकत नव्हता. याचा फायदा घेत जुआनने तिसरा सेट जिंकला. यानंतर सिनरने स्वतःला सामन्यात टिकवून ठेवण्यासाठी रणनीती बदलली आणि वेगाने विनर्स मारण्याचे धोकादायक शॉट्स खेळू लागला, पण त्याने चुका केल्या.

जान्हवी सोनेजीचा रेयांशविरुद्ध विजय

मुंबई : जान्हवी सोनेजी हिने एकेरी आघाडी मिळवलेल्या रेयांश व्यंकट याचा पराभव करत अखिल भारतीय बुद्धिबळ मुंबई मास्टर्सच्या चौथ्या सत्रात आघाडी मिळवली. यासह तिने अंतिम फेरीपूर्वी विजेतेपदाच्या शर्यतीत मोठी रंगत निर्माण केली.

या स्पर्धेत काळ्या मोहऱ्यांनी खेळताना जान्हवीने अत्यंत संयमी आणि परिपक्व खेळ केला. किचकट आणि गुंतागुंतीच्या चाली रचत तिने रेयांशला गोंधळवून ठेवले. यामुळे, त्याने केलेल्या चुकांचा फायदा घेत जान्हवीने विजय मिळवला. हा रेयांशचा या स्पर्धेतील पहिला पराभव ठरला.



मेस्सीच्या खांद्यावर कर्णधारपदाची धुरा | २६ सदस्यीय अंतिम संघाची घोषणा

अर्जेंटिना विजेतेपदासाठी सज्ज

। मेक्सिको । वृत्तसंस्था।

लिओनेल मेस्सी या वर्षीच्या फिफा विश्वचषक स्पर्धेत खेळणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. गतविजेत्या अर्जेंटिनानं २०२६ फिफा विश्वचषकासाठी आपल्या २६ सदस्यीय अंतिम संघाची घोषणा केली आहे. महान खेळाडू मेस्सी पुन्हा एकदा संघाचं नेतृत्व करेल. तो आपला सहावा विश्वचषक खेळणार आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत अर्जेंटिना सलग दुसरं विजेतेपद पटकावण्याच्या उद्देशानं सहभागी होईल.



अलीकडेच, ३८ वर्षीय मेस्सीला इंटर मियामीकडून खेळताना दुखापत झाली होती. त्यानंतर इंटर मियामीनं जाहीर केलं की त्याला हॅमस्ट्रिंगचा त्रास होत आहे. हा महान फुटबॉलपटू विश्वचषकात सहभागी होईल की नाही याबद्दल चाहत्यांना खात्री नव्हती. मात्र, अर्जेंटिनानं शुक्रवारी मेस्सीच्या सहभागाची पुष्टी केली. मुख्य प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी यांनी अनुभव आणि संतुलनाला प्राधान्य दिलं असून, कतारमध्ये २०२२ चा विश्वचषक जिंकलेल्या संघाचा गाभा कायम ठेवला आहे. अर्जेंटिनाच्या संघात २०२२ विश्वचषक विजेत्या संघातील १७ खेळाडूंचा समावेश आहे.

तरुण खेळाडूंवर दाखवला विश्वास

प्रशिक्षक स्कालोनी यांनी भविष्याचा वेध घेत अनेक तरुण खेळाडूंना संधी दिली आहे. व्हॅलेंटिन ब्राको, निकोलस पाझ आणि ज्युलियानो सिमिओन यांसारख्या तरुण चेहऱ्यांचा संघात समावेश करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, होसे मॅन्युएल लोपेझ आणि थियागो अल्माडा पहिल्यांदाच विश्वचषकाचा अनुभव घेणार आहेत. दुखापतीमुळं २०२२ च्या विश्वचषकातून बाहेर पडलेल्या जिओव्हानी लो सेल्सोचं पुनरागमनही महत्त्वपूर्ण मानलं जात आहे. अर्जेंटिना १६ जून रोजी अल्जेरियाविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. त्यानंतर गट टप्प्यात संघ जॉर्डन आणि ऑस्ट्रियाचा सामना करेल. मेस्सी अर्जेंटिनाला सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकून देईल की नाही याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)